१८६३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ८५२०

# प र्या

लेखिका :

सौ. विजया शेवडे,
कर्णावती.

REFBK-0013099

चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणें २.

३७०५६
१७.८.६४.
सं. शा.
निबंध
१५२०.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३७०५५ दि: १०/८/६४
क्रमांक १५२० नों. दि: २०-३-६४

# पर्या

लेखिका :

सौ. विजया शेवडे,
कर्णावती.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१३०९९
REFBK-0013099

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

मुद्रक व प्रकाशक :

दा. त्र्यं. जोशी, बी. ए. (टिळक),
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
५६२, सदाशिव पेठ, पुणें २.

• • •

प्रथमावृत्ति : १९६३.

☆

सर्व हक्क प्रकाशकाधीन.

• • •

मूल्य : २ रु. ५० न. पै.

माझ्या इतकीच आमच्या पर्यांची ओढ असणाऱ्या माझ्या

## ताईच्या पूज्यपदीं

माझी ही कृति सादर समर्पण.

● ❁ ●

आहे पुरतें माहित मजला
माझा पर्या असे न सागर
रत्नं, मौक्तिकें इथें न असती
शंख, शिंपले वा वाळूवर १

अधीर होतें तरिही मम मन
बघण्या ह्याच्या अवखळ लीला
ह्याच्या स्पर्शें फुटति धुमारे
मरगळलेल्या कल्पतरूला २

☆

# हृद्गत आणि आभार

प्रिय रसिक वाचक—

माझा हा 'पर्या' आज आपल्या हातीं देतांना मला अत्यानंद होत आहे.

जवळ जवळ गेलीं वीस वर्षे मी थोडंफार ललित साहित्य लिहितें आहें. ह्या दीर्घ कालावधीच्या मानानं मी फारच थोडं लिहिलं आहे. सवडीच्या अभावापेक्षां लिहिण्याचा आळस हेंच ह्याचं मुख्य कारण. आपणाला लाभलेल्या ईश्वरदत्त देणगीची आपल्या हातून हेळसांड होत आहे हें मला कळत असलं तरी तें वळवणं मात्र मला अजून शक्य झालेलं नाहीं.

आज प्रसिद्ध होत असलेल्या ह्या 'पर्या' तील चौदा लेखांपैकीं निम्मे लेख नवयुग व मराठा यांतून प्रसिद्ध झालेले आहेत. हे लेख नवयुगच्या संपादिका व माझ्या स्नेही सौ. शिरीष पै ह्यांच्या प्रेमळ आग्रहामुळेंच माझ्या हातून लिहिले गेले. शिरीषताईंची मी सदैव ऋणी आहें.

रसिक वाचकांनीं वारंवार पत्र पाठवून अशा प्रकारच्चंच साहित्य लिहायला मला प्रोत्साहन दिल्यामुळें लिहिल्या गेलेल्या साहित्यापैकीं जास्त कोंकणवरच्च लिहिलं गेलं आहे. त्या साऱ्या रसिक व चाहत्या वाचकांची मी फार फार आभारी आहें.

विविध प्रकारच्चं साहित्य 'पर्यांत' एकत्र करण्याचं सारं श्रेय चित्रशाळा प्रेसचे व्यवस्थापकद्वय श्री. जोशी व व. ग. देवकुळे ह्यांना आहे. ह्यांच्या अमोल सहकारामुळेंच हा संग्रह आज आपल्या हातीं पडत आहे. श्री. वसंतरावांचे आभार मानावे तेवढे थोडेच्च आहेत.

पुन्हां एकदां आपणां सर्वांचे आभार मानून लोभ व सहकार पहिल्याप्रमाणेंच कायम ठेवा अशी विनंती करतें.

—सौ. विजया शेवडे

# आम्हीं म्हणतों —

सौ. विजया शेवडे ह्या अहमदाबादसारख्या मराठी भाषा नसलेल्या मोठ्या शहरांतील मराठी साहित्यिक आहेत. त्यांचें मराठी भाषेवरील प्रभुत्व पट्टीच्या शास्त्रीय गायकाप्रमाणें भासमान होतें. मराठी भाषेचें गुणग्रहणात्मक निबंधवाङ्मय ह्या विभागांत सौ. विजयाबाई ह्यांनीं जरूर ती सहजता प्राप्त करून घेतली आहे. पुस्तकाचें नांव 'पर्या' सुचवितांना त्यांनीं अवघड जागेंतून संथपणें, सातत्यानें वाहणाऱ्या ओढ्याचें जें वर्णन केलें तेंच जसेच्या तसें सौ. विजयाबाईच्या भाषाशैलीस लागू करावें लागेल.

कवीच्या प्रतिभाशाली व जातिवंत भावनेस एखाद्या दृश्यामध्यें वा चित्रणामध्यें ज्याप्रमाणें कल्पनांचें व उपमांचें साम्राज्य दिसूं लागतें त्याप्रमाणें 'पर्या' च्या ह्या साहित्यिक संग्रहामध्यें अभिजात कल्पनाविलास योग्य तऱ्हेनें प्रत्ययास येतो. भारतीय संस्कृतीशीं समरस होऊन विचार करणारी वाङ्मयोपासक ललना या नात्यानें सौ. विजयाबाई यांनीं भारतीय संस्कृतीच्या सहृदयतेचें, परसहिष्णुतेचें व सुखसंवेदनेचें जें चित्रण केलें तें अनुपमेय आहे.

या संग्रहांतील शिष्टाचार ( महाराष्ट्र विस्तार ), गौरी गणपति ( दै. मराठा ), काय मा बात्री ( स्त्री ), यमदूत ( नवयुग ), त्याचा संकोच ( समाज पत्रिका ), कवि व त्याचें काव्य ( नवयुग ), माझ्या स्फूर्तिदेवता ( महाराष्ट्र विस्तार ), सुगंधी माहेर ( नवयुग ), पर्या ( अमृत ), मनी ( यशवंत ), दिवाळी, दिवाळी आऽऽली ( मराठा ). हे निबंध निर्देशा-प्रमाणें पूर्वप्रकाशित आहेत.

मराठी वाचक सौ. विजयाबाईंचें वाङ्मय वाचीत आलेच आहेत. तथापि वेळोवेळीं लिहिलेल्या लेखांचें, निबंधांचें व कथांचें असें हें संकलन करण्याची संधि आमच्या संस्थेस मिळाली याबद्दल आम्हांस आनंद होत आहे. भारतीय संस्कृतीमध्यें सुवासिनींचें महत्त्व फारच वर्णिलें जातें व त्या दृष्टीनें सौ. विजयाबाई यांच्या संग्रह प्रकाशनाचें मोल आम्ही मानतों व मराठी भाषेच्या अभ्यासकांनीं ह्या वाङ्मयसंग्रहाचें योग्य तें स्वागत करावें अशी विनंती करतों.

देवदिवाळी १८८५. — प्रकाशक

# अ नु क्र म


| | | |
|---|---|---|
| १. श्रावण | : | १ |
| २. घरजावयांत म्हाळसाकाकू | : | १३ |
| ३. कोल्हाटी | : | १९ |
| ४. शिष्टाचार | : | २७ |
| ५. गौरी आणि गणपति | : | ३३ |
| ६. काय मा बाबी | : | ३९ |
| ७. यमदूत | : | ५१ |
| ८. त्याचा संकोच | : | ६१ |
| ९. कवि आणि त्याचें काव्य | : | ६५ |
| १०. माझ्या स्फूर्तिदेवता | : | ७१ |
| ११. सुगंधी माहेर | : | ७७ |
| १२. पर्या | : | ८३ |
| १३. मनी | : | ९१ |
| १४. दिवाळी, दिवाळी आऽऽली | : | ९७ |



श्रावण

संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३००५५ दि. १०/८/
क्रमांक १५२०

# १ : श्रावण

आपल्या सणांची खरी भाऊगर्दी होते एका श्रावण महिन्यांत. उत्साही ओला श्रावण सर्व सणांचं अगत्यानं स्वागत करायला अधीर असतो.

झांकळलेल्या नभांतून श्रावणसरी धो 'धो कोसळत असतात. पऱ्हे, सारणी गढूळलेल्या तांबूस पाण्यानं तुडुंबलेले असतात, त्यावर घातलेले साकव ( चालचलाऊ लांकडी पूल ) चालायला लागलं म्हणजे लपाक लपाक वरखालीं हालतात. नव्या नवऱ्या नवख्या सुखानं सुखावलेला आपला जीव मुठींत धरून माघारीं आलेल्या गड्याच्या आधारानं हे साकव डोळे मिटून ओलांडतात आणि सासर–माहेरामधें पसरलेलें गांव तुडवून श्रावणांतल्या मंगळागौरी पुजतात, जागवतात. श्रावणाच्या हिरव्यागार अणूरेणूंतून फुलं, पत्री हुडकून आणतात. श्रावण रोमारोमांतून अंकुरलेला असतो. नळ्यांचं छप्पर असणाऱ्या घरांच्या डोक्यावर रंगीबेरंगी फुलांनीं फुललेल्या वाळ्या-तिरड्यांचा मुगुट असतो. गांवांतील एकूण एक बांध, गडगे तऱ्हेतऱ्हेच्या वनश्रीनं नटलेले असतात. प्रत्येक वाराची पत्री त्यांतून शोधून आणावी लागते. आदित्यवारीं सुप्रभातीं कावळा ओरडायच्या आंत केस उगवून अंगधुणं उरकावं लागतं. दिवस उगवल्यावर केस उगवले तर आपली गुंतवळ सूर्यनारायणाच्या जेवणांत जाते म्हणे. लवकरच्च अंगधुणं उरकून तबकडीभर गंध व अर्धी तबकडी रक्तचंदन उगाळून ठेवावं लागतं. सुकलेल्या तुळशीचं काष्ठ घेऊन आई मग एका पाटावर रक्तचंदनानं चंद्र व साध्या गंधानं आदित्य काढून ठेवते. आदित्याची पत्री आणायचं काम असतं पोरासोरांचं. पऱ्ह्याच्या वाटेनं निघालं कीं दोन्ही बाजूच्या बांधावर हवी तितकी पत्री उगवलेली असते. घोड्याचीं पावलं, घोड्याच्या छत्र्या, घोड्याच्या जिभा अशी पत्री आदित्यवारीं आणावी लागते. मंगळवारीं गौरीच्या फण्या, गौरीचं काजळ असे कितीतरी प्रकार शोधावे लागतात.

फुलं मात्र मुळींच शोधावीं लागत नाहींत. आईला लक्ष वाहण्यासाठीं हरतऱ्हेचीं फुलं जमवून देणं ह्याच महिन्यांत सोयीचं असतं.

एका श्रावणांत मी दिलेल्या पारिजातकाच्या फुलांचा आईनं बाळकृष्णाला लक्ष वाहिला आणि त्या सफेद, शेंदरी, टुपटुपीत, सुगंधी फुलांखालीं दडपलेला बाळकृष्ण मात्र काळाठिक्कर पडला. पावसापाण्यांतून आणलेलीं फुलं आम्हीं निथळवत होतों. सुक्या कपड्यावर पसरून हलकवत होतों. तरी सुद्धां सुवासिक राशींतला देव दुसऱ्या दिवशीच्या पूजेपर्यंत बरबटून निघायचा. यानंतर मात्र आईनं सोनतळीच्या चिमुकल्या पिवळ्या फुलांचा लक्ष घातला, तो नीटपणें पार पडला. बिनवासाच्या फुलांचा लक्ष वाहणें मला मात्र मुळींच आवडत नाहीं. लक्ष वाहणाऱ्याला काय वाटतं देव जाणे! पण फुलं गोळा करणाऱ्याला गंधाची धुंदी लुटतां येत नाहीं. तशीं घरींदारीं वाशीक फुलं चिक्कार असतात. परडी परडी गुलाब रोज निघतात. सोनचांफे तर उतावळ्या नवऱ्यांसारखे पिवळेधम्मक होतात. पावसानं बुळबुळीत झालेल्या ह्या सरळसोट उंच झाडांवर चढायला कुणी धजत नाहीं. वाडींतून जातां येतांना ह्याचा उग्र वास जीवाला बेहोष करतो. वाडींत फुललेल्या पाकळ्यांचा गालिचा अंथरलेला असतो. पायदळीं पडलेल्या फिकट पाकळ्या काळ्या पडतात, त्यांचा चिखल होतो. चिखलांतून सतत चालावं लागलं म्हणजे बोटाच्या बेचक्यांतून चिखल्या होतात. पण श्रावणांत शक्यतोंवर पऱ्ह्यावर जायचं आम्हीं टाळतोंच. पहिला जोराचा पाऊस आला कीं पऱ्ह्याला हौर (पूर) येतो. उन्हाळ्यांत ठिकठिकाणीं बांधलेलीं धरणं हौर घेऊन जातो. दारांत येणारं पाटाचं पाणी येईनासं होतं. पावसानें वहात आणलेल्या रदाळ्यानें पाट होरून जातात. मग धुण्या-पाण्यासाठीं पऱ्ह्याचीच आराधना करावी लागते.

*   *   *

ज्येष्ठांत सुरू झालेला पाऊस श्रावणापर्यंत सारें कांहीं धुवून धुवून स्वच्छ करतो. घरांचीं धुपलेलीं कौलें लाल लाल झालेलीं असतात. पावसाची झड मारूं नये म्हणून पावळ्यांना शाकारी गवताच्या झड्या बांधलेल्या असतात. मागील पुढील दारीं पावळ्यांना ताडामाडाचे अगर पोफळीचे पोखर (पन्हळ) टांगलेले असतात. पोखरांतून पडणाऱ्या पावसाच्या पाण्याच्या

झोताखालीं एखादी टाकी, पिंप, सतेलं, पातेलं असं कांहींतरी सांठवणीचं भांडं टाकलेलं असतं. जवळच टाकलेल्या पायरीवर ह्या दिवसांत धुणींभांडीं उरकायचीं असतात. मागील पडवींत घातलेल्या पानचुलीवर सतेलांत अंघोळीचें पाणी तापत असतें. अंगधुणींहि घरांतल्या घरांतच उरकायचीं. मोठी सर आली कीं घागर–कळशीचीं तोंडं स्वच्छ फडक्यांनीं बांधून गाळलेलं पावसाचं पाणी पिण्यासाठीं व स्वयंपाकासाठीं वापरायचं. शक्यतों सारे व्यवहार आढ्याखालींच उरकायचे. ह्या महिन्यांत आगरा–परसवांतून फारसें हिंडावें लागत नाहीं. आंबे, गरे आपआपल्या घरीं केव्हांच परत गेलेले असतात. पोफळीचीं शिपटं पिकायला अजून सुरुवात झालेली नसते. पावसानं कधीं जरा उघडीप दिली तर खळ्यात घातलेल्या पडवळाच्या वेलावर किती वाती पडल्या त्या मोजायच्या. मात्र मोजतांना फुलांतून बाहेर पडणाऱ्या वातींकडे बोट न दाखवतां हाताची किरंगळीच दाखवायची, बोट दाखवलं तर वातीचं पडवळ न होतांच वात गळून पडते. मग पुढील मागील खळ्यांतून रांगणाऱ्या तौशीणीच्या वेलावर किती किरळ्या पडल्या आहेत त्याचा शोध लावायचा. आपल्याला हुलकावणी देऊन काकडीच्या मोठ्या पानाआड लपलेल्या एखाद्या किरळीचा मुरटा बनलेला मधूनच आढळतो. मग मज्जा येते. चिमणीच्या दांतांनीं त्याचे तुकडे करून आपआपसांत वांटून घ्यावे लागतात. या दिवसांत अबरचबर खाणं मिळणं जरा दुर्मिळ असतं. तौशी, चिबूड गौरी-गणपतीकडे तयार होतात. भाजी-पालाहि त्याच सुमाराला मिळूं लागतो; पण ओ येईपर्यंत भाज्यांचे घरांत ढीग पडतात, पक्षपंधरवड्या, नवरात्राकडे. श्रावणांत उपासातापासाला वाळवलेल्या आठळा आणि तेरं आळू ह्यावरच सारा भर द्यावा लागतो. उकडलेले गरे व नाचण्याची आंबील खाऊन उन्हाळा कसाबसा ढकललेला असतो. पावसाला सुरुवात झाली कीं कणग्यांची लिपण काढावी लागते. अख्खा दिवस शेतावर काबाडकष्ट करायचे तेव्हां सकस पोटभर अन्नाची गरज असते.

* * *

श्रावणांत तर बहुतेक सण माहेराला यायचे. रोज कांहीं ना कांहीं गोडधोड व्हायचंच. ते वेळेवर खायला मात्र घरीं कुणी नसायचं. उजाडण्या-

पूर्वीच जोतं व बैल घेऊन सारीं माणसं रानावनांत जातात. जांगळी गुरं घेऊन पऱ्ह्यापलीकडे जातात. घरांत फक्त बायकांपोरंच उरतात. कोंकणांत ह्याच दिवसांत शाळांना सुटी असते. भल्या पहाटेच तयार झालेल्या भाकरी व कालवण घेऊन जाणतीं जुणतीं पोरं जोत्याबरोबरच शेतावर जातात. कुणी घरीं न्याहरी उरकून जातात तर कुणी ती बरोबर नेतात व रानांत उरकतात. दुपार परतली कीं शेतावरून गडी व रानांतून जांगळी दुपारचं जेवण न्यायला येतात. हारे भरभरून सर्वांचं जेवण त्यांच्या स्वाधीन करावं लागतं. तिन्हीसांजा काळोख पडतां पडतां परत घरं गोठे गजबजतात. ह्या दिवसांत सकाळऐवजीं रात्रीं अंघोळी होतात. दिवसभर पावसाच्या गार पाण्यानं गारठलेलीं, शेतांतल्या चिखलानं बरबटलेलीं अंगं पानचुली-वरच्या गरमागरम पाण्यानं शेकलीं जातात. प्रत्येक जोत्याला एकदोन सतेलीं तरी पाणी लागतें. मग ऊनऊन ताजं जेवण जेवून शेतकरी परशांत जळणाऱ्या टोणक्यांना हातपाय लावून शेकत बसतात. परशावर टांगलेल्या मांडवीवर आपल्या दिवसभर भिजलेल्या घोंगड्या, गोणते वाळवतात. ह्या दिवसांत पोरांपेक्षां ढोरांचीच निगा जास्त राखली जाते. रात्रीं दोन तीनदां उठून जोतांच्या बैलांना भात्यानं गवत घालावं लागतं. अंवशी पहाटें तानप्या गाई, म्हशींच्या धारा काढाव्या लागतात. श्रावणापर्यंत रानांत चरीव ब्र्यांपैकीं आलेला असतो, पण चाऱ्याबरोबर गुरांच्या पोटांत पाणीहि फार जातं. मग तीं बुळकायला लागतात. तानप्या वासरा-रेडकांना जंत होतात. त्या सर्वांचं औषधपाणी करतांना आणि शेणगोठे निपटतांना वेळ अपुरा पडतो. ह्या दिवसांत मुख्य काम असतं पिठं दळायचं नि भाकऱ्या बडवायचं. सदार्पलेलीं धान्यें परशाच्या आचेवर शेकवून दळण दळतांना नि भाकऱ्या भाजतांना घरणी अगदीं बेजार होऊन जातात. सणावारीं आणि उपासातापासाच्या दिवशीं भाकऱ्यांना रजा दिली जाते. श्रावणांतल्या कांहीं दिवशीं जोतें बांधायचीं नसतात. नागपंचमी हा एक त्यांपैकीं दिवस. पण हा दिवस फार गोंधळ्या असतो. माझ्या आठवणींतील प्रत्येक नागपंचमीला पावसानं गोंधळ घातलेला आहे. नागपंचमी जर उपासाच्या दिवशीं आली असेल तर मग विचारायलाच नको. श्रावणांतले सोमवार, गुरुवार, शनिवार सारखे बहुतेक उपास संध्याकाळचे सुटतात.

मग देवांचा नैवेद्य, सोवळ्याचा स्वयंपाक वगैरे राडा संध्याकाळचाच असतो. दुपार कलली कीं चार तांब्े अंगावर ओतून, मुकटे आडवे वेढून घेतात व घरणी चुलीवायलाला शिजत लावतात न लावतात तोंच काळवंडलेला आकाशाचा घुमट फोडून श्रावणसरी मुसळधारांनीं कोसळायला सुरुवात करतात. पाऊस उघडीप देण्याचं चिन्ह दिसत नाहीं. आमची आई, शेजारच्या काकू, गांवांतील साऱ्या घरधानिणी काळजींत पडतात. फुरसद मिळालेले जोते तुंबलेल्या महत्त्वाच्या कामासाठीं बाहेर गेलेले असतात. जोतांचे बैल गुरांबरोबर अगर वेगळे चरायला रानांत गेलेले असतात. कधीं कधीं ते घरांतच दाव्यावरहि बांधलेले असतात. गांवांतील बहुतेक सारे जांगळी आपआपलीं गुरं घेऊन भरपूर चरीव असेल अशा एखाद्या ठिकाणीं जमलेले असतात. एकत्र गुरं चरवतात. बरोबर आणलेल्या न्याहाऱ्या एकत्र बसून करतात. लुसलुशीत रोवणांचे ( जमिनीचीं फुलें असेंहि याला म्हणतात ) कुंभ्यांच्या पानांत बांधलेले पुडे घरीं आणून परशांत भाजतात व भाकरीसंगें कालवणाला घेतात. दुपार परतली कीं, आळीपाळीनं दोन दोन जांगळी गांवांत येऊन घरोघर जातात व प्रत्येक जांगळ्याचं जेवण घेऊन परत रानांत जातात.

* * *

दाही दिशा अंधेरून आल्या नि ठोंब पाऊस बसला कीं अनुभवानं शहाणे झालेले जांगळी उमजतात, सकाळीं पऱ्ह्यापलीकडे आणलेलीं गुरं पऱ्ह्या ओलांडून घरीं आणण्यासाठीं आटापिटा करतात. प्रसंग ओळखून तान्हव्या गायी घराच्या दिशेनें पळूं लागतात. तर कोंवळ्या लुसलुशीत चाऱ्याला चटावलेलीं अजाण वासरं खालीं मुंडी घालून, डोळे मिटून पाठीवर बसणारा मार मुकाट्यानं खातात, पण चरीवांत खुपसलेलं तोंड उचलत नाहींत कीं मागं फिरत नाहींत. जांगळ्यांची अशा वेळीं त्रेधा-तिरपीट उडते. सारीकडून तांबड्या गढूळ पाण्याचे लोंढे पऱ्ह्याला जाऊन मिळत असतात. हां हां म्हणतां पऱ्ह्याला हौर येतो. पुरुष दीड पुरुष पाणी असलेला पऱ्ह्या कुणालाच उतार देत नाहीं. गांवांत हौरांचा आवाज घुमूं लागतो. पऱ्ह्यापलीकडे खडकलेलीं गुरं हंबरडे फोडूं लागतात. तान्हव्या वासरांकडे ओढ घेणाऱ्या गाई हौरांत उडी टाकण्यासाठीं धांवूं लागतात.

गोठणीवर जमलेले जांगळी एकीकडे गुरांना आवरत असतात, एकीकडे तोंडानं कुकारे करून गांवकऱ्यांना मदतीला बोलावत असतात. दोऱ्यांची मोठमोठी जुंपण एकत्र करून सारे गांवकरी बाप्ये पऱ्ह्याकांठीं एकत्र जमेपर्यंत दिवेलागणी होते. जिथें पऱ्ह्याला ओढ कमी आहे, जिथें त्याची रुंदी कमींत कमी आहे, जिथें पऱ्ह्याच्या पात्रांवर थोरल्या आंब्याच्या भक्कम फांद्या आडव्या कलल्या आहेत, तें ठिकाण उतारासाठीं पसंत करण्यांत येतं. आंब्याच्या फांद्यांना जुंपण बांधून त्यांचीं दुसरीं टोंकं पोहतां येणारे गांवकरी आपापल्या कंबरांना अगर खाकांतून बांधून घेतात. अशा बाप्यांची एक सांखळीच्या सांखळी पऱ्ह्याच्या बेफाम हौराच्या ओघांत आडवी राहते. मग पलीकडून जांगळी गुरं हौरांत वरच्या अंगानं लोटतात. प्रथम अनुभव असलेलीं पण तयार (तरणी) गुरं, मग शहाणीं पण म्हातारीं ढोरं व शेवटीं अजाण वासरं असा क्रम लावतात. शेपट्या वर करून हौराशीं झुंजत गुरं अलीकडे येतात पण एखादे वेळीं एखाद्याचा दमछाट होऊन तें गुरं हौराच्या पाण्याबरोबर वाहूं लागतं. अशा वेळीं ओघाच्या खालच्या अंगानं उभे असलेले बाप्ये त्याला आधार देतात व ढकलत ढकलत अलीकडे आणतात. क्वचितच एखादं ढोर वाहून जातं व दूर कुठेंतरी फुगून वर आलेलं आढळतं. नेहमीं मात्र पावसानं खडकवलेलीं गांवांतील सारीं गुरं अशा प्रकारेंच उतरवलीं जातात. घरीं आल्यावर थंडावल्या गुरांना गोडं तेल पाजावं लागतं. फार करून अशा दिवसांत लहान वासरं गुरांबरोबर रानांत पाठवत नसतात. त्यांच्या चिमुकल्या पोटांपुरता चरीव आजूबाजूच्या फडापरसवांतून तयार असतो. शेजारपाजाराचीं तीन चार पोरं मिळून म्हशी, वासरं अशीं ढोरं पऱ्ह्यापलीकडे न लावतां अलीकडेच चरवतात. पण वासरं गुरांबरोबर जाण्यासाठीं जीव काढतात. अधूनमधून डोळा चुकवून गुरांतून जातात व मग एखादेवेळीं अशीं हौरांत सांपडतात. कोंवळ्या, थंडीनं कुडकुडणाऱ्या वासरांना हौरांत लोटायला जांगळ्यांचा जीव धजावत नाहीं. अशा लहान वासरांना उचलून साकवावरून घेऊन येतात. घरीं आणल्यावर घोंगडीच्या फडक्यांत गुंडाळून परशाच्या उबेला बांधतात तेव्हां कुठें स्वारी गवत खाऊन रवंथ करायला लागते.

बाप्ये व जांगळी अतिश्रमानं थकलेले व कावलेले असतात. सर्वांच्याच

पोटांत कावळे कोकलत असतात. सणाच्या आनंदावर विरजण पडलेलं असतं. गाई, वासरांचं, गुरांढोरांचं यथास्थित झाल्यावर पूजा-नैवेद्य होतो. गारगोट्या झालेलं अन्न गरम केलं जातं. सगळीजण गप्प असतात. जेवण मुकाट्यानं उरकतात. तोंच कंदिलानं बातमी येते. अमक्याचा बैल हौरानं नेला. तमकी पोरग्यासंगें सारणींत वाहवली. वार्ता ऐकून सारीं जण चुकचुकतात, हळहळतात. अधिकच अप्रसन्न असलेल्या वातावरणावर खिन्नतेची दाट छाया पसरते.

नागोबासाठीं उगाळलेलं गंध व सुगंधी जाईजुईचीं फुलं आम्हीं पोरीबाळी दारांच्या आड कोनाकोपऱ्यांत नेऊन ठेवतों. अगदीं हलक्या हातानं दार लावतों. न जाणो आम्ही ठेवलेल्या लाह्या दूध खाण्यासाठीं, फुलांचा वास घेण्यासाठीं, चंदनांत लोळण्यासाठीं तिष्ठत असलेल्या नागोबाची शेपटी एखादेवेळीं दारांत चिरडायची. आज त्याला दुखापत होतां कामा नये. आज तो आमचा भाऊ असतो, मामा असतो, देव असतो. घराघरांतून मुरमाच्या मातीची नागीण पिलाकुळांसह केलेली असतेच. शिवाय रानांत, बागेंत असलेल्या भोंबाडांची (वारूळ) पूजा दिवसा सकाळींच झालेली असते. तिथें दूध, लाह्या वाहिलेल्या असतात. तरी सुद्धां रात्रीं दार लावतांना प्रत्यक्ष नागोबाचं दर्शन व्हावं अशी इच्छा कुठून तरी खोलांतून अंकुरते. नागपंचमीच्या दिवशीं नेहमींप्रमाणें जीवाणवांची धास्ती वाटत नाहीं.

पावसाळा सुरूं झाला, सगळीकडे गार गार झालं कीं मालांडू, दुतोंडी ह्यांसारख्या जीवाणूंचीं धूडंच्या धूडं घराच्या वळचणीच्या आसऱ्याला, उबेला येऊन बसतात. दिवसभर कामाचा राडा उपसून श्रमलेल्या देहाला लवंडण्यासाठीं बांकड्यावर ठेवलेली घोंगडीची वळकटी उचलावी तों त्यावर मातट, काळपट रंगाच्या जीवाणूंचं पेंढण ऊब घेत पडलेलं दिसावं. मग आपण पेंढणासकट वळकटी फेकून देऊन किंचाळी फोडतों. ती ऐकून पेंढण लांब होऊन वळवळूं लागतं. तोंपर्यंत परशावर कणा शेकत बसलेले बाप्ये, गडी, काठ्या, सोटे घेऊन घरांत येतात. आई कंदील आणून जीवाच्या समोर ठेवते. त्या उजेडानं जीवाणूं दिपावतें. कोणत्या दिशेनं पळावं ह्याची त्याला उमज पडत नाहीं. अखेर त्याला शेवटाचा मार्गच धरावा लागतो. पावसाळ्यांत कितीतरी जीव वाटेंत, पायांत आडवे येतात. बहुतेक सारे

मारले जातात व नंतर ते किती भयंकर होते हें कळतं. क्वचित् एखादा नाहींसा होतो. क्वचित् एखादा चावतो. पण त्यावर औषधेंहि तितकींच जालीम असतात.

पऱ्ह्याचा हौर ओसरला कीं पऱ्ह्या उतार देतो. ढोरं व बाप्ये मग पऱ्ह्यापलीकडे जाऊं शकतात. बाया-बापड्यांच्या बखोट्या धरून बाप्येच त्यांना पऱ्ह्यापलीकडे असलेल्या शेतांत काम करण्यासाठीं घेऊन जातात व सांजेला बखोट्या धरूनच अलीकडे घेऊन येतात. रात्रभर धुडगूस घालून जागवलेली मंगळागौर उजाडत कावळा ओरडायच्या आंत पऱ्ह्यांत सोडून कळसवावी लागते. भल्या पहांटे अंगधुणीं उरकून मंगळागौरीचें निर्माल्य व साहित्य हारे भरभरून आम्ही पऱ्ह्यावर घेऊन येतों. गौर पाण्यांत कळसवली कीं रंगीबेरंगी फुलं, पत्री ओघाबरोबर तरंगत वाहूं लागतात. तांदुळाच्या उकडीचं गौरीसाठीं तयार केलेलं बोन, नैवेद्य व अक्षता पाण्याच्या तळाकडे निघतात. पाणी निवळलेलं असेल तर अक्षता खाण्या-साठीं माशांची चाललेली चमकती चपळ धांवपळ बघतां बघतां चांगलं फटफटीत केव्हां उजाडतं तें लक्षांतहि येत नाहीं. श्रावण शनिवारींहि असंच पहांटे स्नान उरकून कावळा ओरडायच्या आंत पिंपळाला जायचं असतं. पण मुंज झालेला पिंपळ आहे पऱ्ह्यापलीकडे. काकू, आई काठीच्या आधारानं पऱ्ह्या पार करतात. पण आम्हां पोरीसोरींना मात्र केलेलं धाडस भोंवतं. परमेश्वरावर भरंवसा टेवून आम्ही पऱ्ह्यांत शिरतों. पण मध्यावर आल्यावर तळापासून पाय उपळूं लागतात व काय होत आहे हें कळायच्या आंतच तोल जाऊन नाकातोंडांत पाणी शिरतं व जीव गुदमरूं लागतो. मग बळकट हाडापेरांची उंचेली काकू आमचे बुचवडे, शेपटे, बखोटी जें हाताला लागेल तें धरून आम्हांला बाहेर खेचते. पऱ्ह्याला पाणी फार नसतं, पण ओढ फार असते. पिंपळाची पूजा व प्रदक्षिणा उरकायच्या असल्यामुळें अशा प्रसंगीं गड्या जांगळ्या अगर पारोशा बाप्यांचा विटाळ होतो. पहांटे गरम गरम पाण्यानं स्नान केल्यामुळें आलेला उत्साह व प्रभातकाळच्या देखाव्यानं फुललेलं मन पऱ्ह्याच्या थंडगार पाण्यांत लोटांगण घालावं लागल्यामुळें शहारतें, हिरमुसतें. परत अलीकडे येतांना मात्र आम्ही एखाद्या गड्याचा भक्कम आधार घेतों.

एखाद्या श्रावण सोमवारीं सर्वांनीं मिळून सतेश्वराला जायचा बेत नक्की ठरतो. हा स्वयंभू शंकर गांवाच्या एका टोंकाला रानांत, गर्द राईत वसला आहे. गांवकऱ्यांनीं त्याचं चांगलं चिरेबंदी ऐसपैस देऊळ बांधलं आहे. देवळाबाहेर चांगल्या दोन दीपमाळा आहेत. कार्तिकींत सारा गांव देवळांत जमा होतो. पौर्णिमेला तर साऱ्या गांवचा उत्साह बहरांत येऊन देवळाच्या आवारांत बागडतो. पण नेहमीं म्हणाल तर हांकेच्या आंत माणूस आढळणं दुर्मिळ. म्हणून दर्शनाला जायचं असेल तेव्हां शक्य तितक्या जास्त संख्येनंच एकत्र जमून आम्हीं निघतों. सकाळचीं कामं, दुपारचे फराळ वगैरे उरकून साधारण दुपार कलायच्या सुमाराला निघालं कीं दिवेलागणीपर्यंत सहज घरीं परत येतां येतं. या दिवसांत पाषाणहृदयी दगडांना सुद्धां अंकुर फुटतात. वृक्षांचाच रस शोधून त्यावर पोसणाऱ्या व फोफावणाऱ्या बांद्यांना (बांडगूळ) ह्याच दिवसांत निळ्या, जांभळ्या रंगांचे मोहक तुरे फुलतात. जिकडे दृष्टि टाकाल तिकडे सगळं कसं हिरवं हिरवं गार दिसतं. या दिवसांतील हिरवेपणा शेवाळी, पोपटी रंगाचा नसतो, तर जून, डोळ्यांना गारवा देणारा, घन मेघांनीं आणलेल्या अंधारांत भर घालणाऱ्या काळपट रंगाचा असतो. या दिवसांत वेळेचा अंदाज बांधणं महाकठीण. टाकळा हें या दिवसांतलं घड्याळ. टाकळ्याचीं पानं मिटूं लागलीं कीं घराकडे परतायची घाई करावी लागते. त्या सोमवारीं आम्हीं असेच सारे रमत गमत सतेश्वराला निघालों. वाटेंत नंदीसाठीं आघेडा तोडला. गणपतीसाठीं दूर्वांच्या जुड्या काढल्या. सतेश्वरासाठीं बेल व सोनचाफ्याचीं फुलं घेतलीं, पऱ्ह्यापलीकडून अगत्यानं आलेलं केवड्याचं कणीस घेतलं. देवळाजवळच बहारानं फुलणाऱ्या नागचांफ्याचीं फुलं काढवून घेतलीं. घाट्या, डोंगरांची चढण तुडवत मैल दीड मैल चालावं तेव्हां सतेश्वराची राई येते. नेहेमीं देवळापाठीमागें असलेल्या तळीवर पाय धुवून मग देवळांत जाण्याचा रिवाज आहे. पण पऱ्ह्याला बांधलेलं धरण वाहून पाट होरले कीं तळींत पाणी नसतं. या दिवसांत पाय धुण्याऐवजीं ते देवळाच्या कोपऱ्यांत गुरवानं धुमसवत ठेवलेला परसा चेतवून त्यावर थोडे सुकवावेच लागतात. त्या दिवशीं पावसानं सकाळपासून उघडीप दिली होती. आम्ही समवयस्क सात आठजण फुलांच्या मोहांत आणि गप्पांच्या नादांत पुरते गुरफटलों होतों. कुणालाच वेळेचं भान नव्हतं. गाभाऱ्यांत बसून निरांजनं ओवाळण्यांत, आरत्या, शिवस्तोत्र

म्हणण्यांत आम्ही गर्क झालों होतों. बाहेर दाही दिशातून भरून येणाऱ्या पावसाची आम्हांला दाद नव्हती. पाऊस मुसळधारांनीं कोसळूं लागला नि आम्हांला जाग आली. गाभाऱ्याबाहेर येऊन पहातों तों काय? सगळी-कडे काळ्याकुट्ट अंधाराचं साम्राज्य पसरलं होतं. प्रथम वाटलं, पावसाची काळोखी असेल पण अंधार उजाळण्याऐवजीं दाट होत चालला आणि आम्हां सर्वांच्या पोटांत भीतीचे गोळे उठले. आम्हीं सारीजणं पोरसवदाच होतों. आमच्याजवळ काठ्या अगर कंदीलहि नव्हते. आणि काठ्या-कंदील असते तरीहि तशा पावसांतून त्या काळोख्या रात्री, जवळपास मनुष्यवस्ती नसलेल्या त्या गर्द राईतून जायचा धीर आम्हांला झाला नसता. सर्वांजवळ मिळून दोनतीन काडेपेट्या मात्र होत्या. परशावर भरपूर टोणकीं होतीं. संकट गळ्याला येऊन भिडलं कीं उपाय सुचतात. बाकी तशा त्या भयाण रात्रीं उपाय तरी कोणते करणार म्हणा? गांवांतून कुणीतरी घेऊन जायला येईपर्यंत किंवा उजाडेपर्यंत देवळांत तिष्ठत बसण्याखेरीज गत्यंतर नव्हतं. देवळाच्या कोपऱ्यांत परसा धुमसत होता. हीच ईश्वरकृपा म्हणायची. सोमवारचा उपवास संध्याकाळीं सुटणार होता. तो कडकडीत घडला. परमेश्वराची इच्छा समजून परसा पेटवला व त्याभोंवतीं कोंडाळं करून गप्पा मारीत बसलों. पोटांत कावळे कोकलत होते. चावरे वारे अंगाला झोंबत होते. परशाच्या उजेडांत नाचणाऱ्या आमच्याच सावल्या आम्हांला भिवडवीत होत्या. गप्पा मारत होतों त्यासुद्धां जपून, तोलून, मापून. न जाणो चटकन् भुताखेतांचा विषय निघायचा. तोंडानं बोलत नसलों तरी मनांत मात्र तेच विचार गोंधळ घालीत होते. आम्हीं लहानपणापासून ऐकत आलों होतों कीं, मध्यरात्रीला वेताळाची पालखी शिवदर्शनाला येते. श्रावण सोमवारची पर्वणी साधून याच रात्रीं वेताळ सतेश्वराच्या दर्शनाला आला तर? वेताळाची पालखी दिसली तर आजूबाजूला नाचणाऱ्या पिशाच्चांना न घाबरतां धांवत जाऊन पालखीचे खूर धरावे म्हणे, म्हणजे वेताळ प्रसन्न होऊन आपण मागूं तें देतो. वेताळाची पालखी एकदां तरी दिसावी म्हणून आम्हीं देवाला कितीतरी वेळां आळवलेलं होतं, पण त्या रात्रीं मात्र ती पालखी न यावी म्हणूनच देवाला आळवत होतों. घरीं सुखरूप परत जाण्याइतकी दुसरी कोणतीच गोष्ट त्या वेळीं महत्त्वाची नव्हती. गप्पा मारायला बसलों कीं नेहमीं वेळ अपुरा पडायचा; पण त्या

रात्रीं गप्पाच अपुऱ्या पडल्या. वेळ जातां जाईना. बाहेर पाऊस धों धों ओततच होता. त्याच्या आवाजांत इतर सारे आवाज लुप्त झाले होते. देवळाच्या वरच्या अंगाला असलेल्या डोंगरांतील वाडींतून कोंबडा आरवलेला ऐकल्यावर आमच्या जीवाला हायसं होणार होतं. एकदां कोंबडा आरवला कीं मग भुताखेतांची भीति नाहीं. मग पहांटे पहांटेला आमचीं आंबलेलीं शरीरं परशाच्या उबेंत लवंडवून आम्हीं थोडी डुलकी घेणार होतों. पण...!

मध्यरात्रीचाच सुमार असावा. पावसाची झिमझिम चालू असली तरी त्याचा जोर मंदावला होता. आतां पऱ्ह्याच्या हौराचा आवाज स्पष्ट ऐकूं येत होता. त्या नादमय आवाजाला छेदत एका पाठोपाठ एक अशा राईच्या दिशेनं कुकारे, किंकाळ्या ऐकूं येऊं लागल्या. धीरे धीरे त्या देवळाच्या दिशेनंच जवळ येऊं लागल्या. नक्की वेताळाची पालखीच येत असावी. आतां काय करावं ? कुठें लपावं ? आमच्या हृदयाचा थरकांप उडाला, घसे कोरडे पडले, हातपाय गारठले. शुद्ध जाणार असं वाटूं लागलं. तोंच आमच्या नांवानं मारलेल्या ओळखीच्या हांका ऐकूं येऊं लागल्या. प्रथम थोडी भीति कमी झाली, पण मग वाटूं लागलं कीं, हा सारा चाळेगर्ताचाच प्रकार असावा. भुतांना काय हवा तसा आवाज काढतां येतो व वाटेल त्यांचीं नांवं बरोबर ओळखतांहि येतात. पहिल्या तीन हांकांना ओ द्यायची नसते. चौथी हांक आली तर मग मात्र भूत बोलावत नसून माणूस बोलावत आहे असं समजावं. आम्हीं मनांतल्या मनांत रामनामाचा जप करीत करीत हांका मोजत डोळे घट्ट मिटून बसलों होतों. हालचाल करायला अंगांत त्राणच उरलें नव्हतें. देवळाच्या पायरीवर सोटे वाजले आणि वाटलं आली वेताळाची पालखी. मंदिराच्या दारांतून अप्पा, अण्णा, तात्या, काका अशी आमची वडील मंडळी कंदीलासह आंत आली, पण आम्हीं त्यांना मनुष्ययोनींतील मानायला तयार नव्हतों. अखेर त्या सर्वांनीं मिळून रामरक्षा म्हणायला सुरुवात केली आणि आम्हांला हुंदक्यावर हुंदके येऊं लागले. पावसानं खडकवलेल्या वासरांना गाईकडे घेऊन जाण्या-साठीं जांगळी आले आहेत, असं कांहींतरी वाटूं लागलं.

आईच्या हातचा पिठलंभात खाऊन तो श्रावणाचा सोमवार मंगळवारीं पहांटे पहांटे सोडला.

असा आहे गोंधळ्या श्रावण. • • •



• घरजांवयांत म्हाळसाकाकू

...ठी ग्रंथ संग्रहालय, [illegible]
अनुक्रम ३५०... [illegible]
[illegible]

# २ : घरजांवयांत म्हाळसाकाकू

इ. स. १९३५–३६ ची गोष्ट असावी. त्यावेळीं धंदेवाईक नाटक कंपन्यांतून स्त्रियांनीं कामें करायला नुकतीच सुरुवात केली होती. पण हौशी मंडळींचीं नाटकें मात्र कुठेंच मिश्र होत नसत. स्त्रियांनीं केलेल्या नाटकांत पुरुषपार्ट स्त्रियाच करीत व पुरुषांनीं बसवलेल्या नाटकांत स्त्रियांचीं कामें पुरुषच करीत. मोठमोठ्या सुधारलेल्या शहरांतील नाटकांची स्थिति अशी असल्यावर खेडेगांवांतील नाटकांचें वर्णन काय करावें ? पण आज मी तेंच करणार आहे.

रत्नागिरी जिल्ह्यांत असलेल्या आमच्या छोट्या खेड्यांत नाटक झाल्याचें निदान मला तरी आठवत नाहीं. खुद्द आमच्या गांवीं नाटक झालें नसतें तरी आजूबाजूंच्या खेड्यांतून कधीं शिवजयंतीच्या निमित्तानें तर कधीं रामनवमीच्या उत्साहाला नाटकें होत. पण निदान आमच्या पंचक्रोशींत तरी स्त्रियांनीं अगर मुलींनीं नाटकें केल्याचें माझ्या ऐकिवांत नव्हतें.

मी मात्र माझ्या मुंबईच्या शाळेंत होणाऱ्या प्रत्येक उत्सवाच्या वेळीं नाटक, संवादांतून मनसोक्त कामें करीत असें व सुट्टींत गांवीं आल्यावर एखादी नाट्यछटा अगर पाठ असलेलें भाषण हावभावासह आईला व शेजारपाजारच्या बायकांना करून दाखवीत असें. अशा कार्यक्रमांतूनच मागें पुढें आपण बायकांनींच एखादें छोटेसें नाटक बसवावें अशी एक कल्पना निघाली.

दिवाळीच्या व मेच्या रजेंत मी गांवीं आलें कीं नित्याच्या चाकोरींत फिरून कंटाळलेल्या बायकांचे चेहरे आशेनें उजळत. आतां नवीन कांहींतरी ऐकायला व पाह्यला मिळेल या विचारानें त्या सुखावत.

ठरल्याप्रमाणें एका रजेंत ‘घरजांवई’ नांवाची एक लहानशी एकांकिका मी घेऊन आलें. गांवांतील बायकांतून पात्रांची निवड करण्यांत आली.

दिग्दर्शिकेचें व मुख्य पात्राचें काम अर्थात्‌च माझ्याकडे आलें. कुणाला मुळींच वाचतां येत नव्हतें, तर कुणाला जोडाक्षरें तेवढींच नडत. एखादीला कांहीं केल्या भाषण पाठ होत नसे, तर एखादीला स्पष्ट उच्चारच जमेनात. गांवांत एकूण इनमीन साडेतीन बायका, त्यांच्याकडून नाटक बसवून घेतां घेतां माझ्या 'नाकीं नऊ आलं' कधीं लाकडांच्या खोपींत, तर कधीं गुरांच्या गोठ्यांत. कधीं गोपूकाकांच्या ओस पडलेल्या घरांत, तर कधीं जिकडे कुत्रासुद्धां फिरकायची धास्ती नव्हती अशा जाखाईच्या देवळांत. याप्रमाणें रोज दुपारीं आमच्या नाटकाच्या तालमी गुपचूप पण जोरांत सुरू झाल्या. पण म्हण आहे ना ? कीं म्हातारीनें कोंबडा कितीहि झांकला तरी शेवटीं तो आरवून गांवाला जाग आणतोच. आम्हीं डोळ्यांत तेल घालून जपत होतों तरी सुद्धां आजीला आमच्या नाटकाची कुणकुण लागलीच. आणि ती लागल्याबरोबर तिनें ओरडून आरडून सारें घर डोक्यावर घेतलें. आईला ती घालून पाडून बोलली व पुरुष मंडळी शेतावरून घरीं परत येतांच आमचे हे चाळे त्यांच्या कानांवर घालण्याचा तिनें आम्हांला धाकहि घातला.

अखेर बरीच खुशामत करून आम्हीं तिलाच आमच्या गटांत सामील करून घेतली. आमच्या नाटकांत पुरुषपार्ट तर स्त्रियाच करणार होत्या, पण हें नाटक पाहण्याचीसुद्धां पुरुषांना सक्त मनाई होती.

नाटकाचा नियोजित दिवस जसजसा जवळ येऊं लागला तसतशी आमची त्रेधा-तिरपीट उडूं लागली. नाटकांतील मुख्य नायिका जी कांता तिला पांचवारी पातळाची आवश्यकता होती. आणि त्या काळीं पांचवारी पातळ आमच्या गांवांतच नव्हे तर आजूबाजूच्या पांच सात खेड्यांतहि शोधून सांपडणें शक्य नव्हतें. शेवटीं आजीनेंच आपल्या सांठ्यांतील रुंद रुइफुली रेशमी कांठाचें धोतर आम्हांला वापरायला दिलें. त्या धोतराच्या एका शेवाला आमच्या जवळच्या रेशमी रिबीना आडव्या शिवून आम्हीं पदराचा आभास निर्माण केला. आमच्या ठकूच्या कानांतील मुद्यांना उमाकाकूंच्या कानांतील कुडूं दोऱ्यानें गच्च बांधून कांतेच्या कानांतील इअरिंग्जची व्यवस्था केली. याप्रमाणें एकीकडे वेषभूषेंतील प्रत्येक वस्तूची जमवाजमव चालू असतांनाच दुसरीकडे रंगमंचकावरील मांड मांडण्यासाठीं

आम्हांला धांवपळ करावी लागत होती. स्टेजसाठीं शेजारच्या जुन्या पण भव्य वाड्यांतील कोठाराच्या घराची आम्ही निवड केली होती. हा वाडा भरभराटींत असतांना ह्या कोठार-घराला चारी बाजूंनीं मजबूत भिंती होत्या म्हणे, पण सध्यां मात्र एका बाजूला लोखंडी गजांचा ऐसपैस दिंडी दरवाजा असून त्यापुढें विस्तीर्ण अंगण आहे. दिंडी दरवाजाच्या मागील भिंतीला एक लहानसें दार असून बाजूच्या दोन्ही भिंतींना गजांची एक एक खिडकी बसवलेली आहे. कोठाराच्या तक्तपोशीला दोन दारें असून त्यांत प्रत्येकीं एक एक पाट बसवलेला असतो. पेटाऱ्याच्या दाराप्रमाणें पाटरूपी हीं दारें उघडतां अगर बंद करतां येतात. ऐन अमदानींत या कवाडावाटेंच कोठारांत धान्य ओतीत व मग ह्या पाटासारख्या दारांना वरच्या बाजूनें कडी–कुलूप लावीत. हीं दारें सध्यां बंदच असत. वेळ प्रसंगीं जास्त प्रकाशासाठीं यांचा झरोक्याप्रमाणें उपयोग करीत. आमचें नाटक रात्रीं होणार असल्यामुळें या झरोक्यांकडे आमचें लक्ष वेधण्याचें कारण नव्हतें. दिवसा हें ठिकाण वर्दळीचें असल्यामुळें आमच्या तालमी येथें होणें अशक्य होतें.

शेवटीं एकदांचा नाटकाचा दिवस उजाडला. खोतांकडचें मोठें जाजम आणून त्याचा पडदा करण्यांत आला. तो कसा ओढायचा ह्याचें शिक्षण सोनी गुरवणीच्या चेडवाला म्हणजे ठमाला चार दिवस आधींपासूनच दिलें जात होतें. त्या रात्रींपुरती शिंदेवाडच्या खेळ्यांकडून आम्हीं आगिनी ( बत्ती ) मागून आणली.

कुठें आगिनी टांगून दे तर कुठें पडदा बांधून दे, अशीं किरकोळ कामें पांडू धाडी, हरी बारा व जानू कोतरा ह्यांच्या मार्फत करून घ्यावीं लागत. पुरुषांपासून सर्वस्वीं अलिप्त असलेल्या आमच्या या नाटकांत नाहीं म्हटलें तरी अशा प्रकारें आम्हांला पुरुषांची थोडीतरी मदत घ्यावीच लागली.

गुरवांच्या ठमानें ठरल्याप्रमाणें पुरुषांच्या कानावर न जाईल याची दक्षता घेऊन गांवांतील एकूणएक बाईला नाटकाचें आमंत्रण दिलें. साऱ्या गांवांत मिळून मिळालेल्या चार पांच मोडक्या तोडक्या खुर्च्या आम्हीं गड्यांकडून दिवसाउजेडींच आणवून घेतल्या. कोठाराची जमीन सारवून

घेतली. आगिनींत तेलवात आहे कीं नाहीं तें पाहून घेतलें. अशा धांवपळींत दिवस डोंगराआड केव्हां लपला तें आमच्या लक्षांत सुद्धां आलें नाहीं.

आमच्या आजीनें आम्हां नटमंडळींसाठीं मुद्दाम तयार केलेलें कण्यांचें आटवल कुळथाच्या पिठल्याबरोबर आम्हीं सर्वांनीं दिवेलागणीपूर्वींच खाऊन घेतलें. आईनें सर्व गड्यांना मागच्या पडवींत आमच्या बरोबर जेवायला वाढलें. आमच्या जांगळ्यासह (गुराख्यासह) सर्व गडी निघून गेल्याची खात्री होतांच आम्हीं 'थिएटरां'त प्रवेश केला.

आमची वेषभूषा चालू असतांना मागच्या पडवींत बांधलेला कपिलेचा बाळा पाडा कान टवकारून मागच्या छोट्या दारांतून आमच्याकडे पाहात असल्याचें माझ्या लक्षांत आल्याबरोबर मी ठमाकरवीं आधीं त्याला गोठ्यांत नेऊन बांधवला. माझा लाडका बोका प्रेमानें खिडकींत गुरगुरत बसला होता. अण्णासाहेबांचा पोशाख करीत असलेल्या शांताताईनीं स्वतःच्या हातांत घेण्यासाठीं घेतलेली वेताची वांकडी काठी त्याच्या पेकाटांत अशी जोरानें मारली कीं बिचारा लंगडतच बाहेर पळाला.

बाहेर अंगणांत बायकांची तुफान गर्दी झाली होती. लांबून कंदिलानें आलेल्या बायका जागेवर बसतांच कंदील बारीक करून तो पाठीमागें ठेवण्याची खबरदारी घेत होत्या. चूड घेऊन येणाऱ्या कुडवाळणीपैकीं एखादी कुडवाळीण जळती चूड तशीच हातांत घेऊन दूर उभी राही, पण तिकडे लक्ष देण्याचें आम्हांला कारण नव्हतें, कारण आमच्या नाटकांत चुडीला मज्जाव नव्हता.

राघू गुरवाला चार सुपाऱ्या देऊन जाखाईच्या देवळांतून आणलेलो घंटा तिसऱ्यांदा वाजतांच पडदा खेचला गेला.

मूळ नाटकांत गाणीं नव्हतीं. पण फारच छोटी असलेली ही एकांकिका जरा लांबावी म्हणून मी त्यांत एक दोन गाणीं घुसडलीं होतीं. पडदा बाजूला होतांच पिंजऱ्यांतील (पोपटाऐवजीं) मैनेला उद्देशून कांता गाऊं लागली. तिचे आईवडील जवळच खुर्च्यांवर बसलेले होते. अण्णासाहेबांच्या वेषांत असलेल्या शांताबाई थेट आपल्या भावासारख्या दिसत होत्या. रंगमंचकावर कांतेचें गाणें रंगत चाललें असतांनाच, प्रेक्षकांतून तावातावानें उठलेली आमची आजी कळकळूं लागली.

'मेऽल्यांनो! मज म्हणालांत नाटुकांत पुरुष घेणार नाहीं म्हणून. आणि आतां हा अण्णा पाध्या कसा गो खुर्चीत येऊन बसला?'

आजीचा गडगडाट सुरूं असतांनाच शांताबाई आपलें भाषण ठांसून बोलल्या, आणि अवसानानें उभी राहिलेली आजी बसतां बसतां कौतुकानें म्हणाली, 'अगो! हें तर शांते! मज वाटलें अण्णा आला कीं काय?'

या नाटकांत जांवयाची भूमिका माझ्याकडे होती. लिहितां वाचतां येणाऱ्या सर्व स्त्रिया स्टेजवर आल्यामुळें प्रॉम्प्टिंगचें कामहि मलाच करावें लागे. ती छोटी नाटिका माझ्या तोंडपाठ झाली होती. पण मीच स्टेजवर असलें म्हणजे मला स्वतःचें भाषण मोठ्यांदा म्हणून इतर वाक्यें प्रेक्षकांकडे पाठ करून हळूं आवाजांत म्हणावीं लागत. आम्हीं सर्वच्या सर्व पात्रें स्टेजवर असतांना पडद्यामागील व्यवस्थेवर लक्ष ठेवण्याचें काम म्हाळसा-काकूंकडे सोंपविण्यांत आलें होतें.

कधींकाळीं रामलीला व खेळे पाहणारा आमचा प्रेक्षकवर्ग प्रथमच दिसणाऱ्या या नाटकांत चांगलाच रंगला होता. एवढ्या खटाटोपानंतर का होईना, पण आमचें नाटक यशस्वी होत असलेलें पाहून मी समाधानाचा सुस्कारा सोडणार होतें तोंच वाराला टांगलेली आर्गिनी बदबदून पेटली व एक दोन आचके देऊन राम म्हणाली. स्टेजवर पूर्ण काळोख पसरला. बायाबापड्यांनीं अंगणांत गलबला माजवला. आईच्या पदराखालीं झोंपलेल्या पोरांनीं भोकाडें पसरलीं. अशा रीतीनें थिएटरांत एकच गोंधळ उडाला.

आर्गिनी परत पेटवावी व अर्धवट राहिलेलें नाटक पुढें चालूं करावें ह्या हेतूनें मी पायांखालीं खुर्ची घेऊन वाराला टांगलेली आर्गिनी सोडण्याचा प्रयत्न करीत होतें, इतक्यांत अंतरगृहांतील व्यवस्थापिका म्हाळसाकाकू यांनीं स्टेजवर प्रवेश केला.

म्हाळसाकाकू अडाणी असल्या तरी मोठ्या जहांबाज होत्या. त्या आपला गरिबीचा संसार अतिशय काटकसरीने करीत. नऊ दहा चिल्ल्या-पिल्ल्यांनीं रात्रभर केलेल्या वर्षावानें लुगडीं कुजतात म्हणून त्या बारा मास तेरा काळ रात्रीं उभें लावणें लावूनच झोंपत. आम्हीं केलेल्या विनवण्यांना

दाद न देतां त्या रात्रींहि त्यांनीं आपला हा शिरस्ता सोडला नव्हता. सौंदर्याचें कोणतेंहि लक्षण न देणाऱ्या परमेश्वरानें त्यांना काळ्याभोर लांबसडक केसांची विपुल देणगी दिली होती. त्याच दिवशीं न्हायल्यामुळें त्यांनीं हा केश-संभार पाठीवर मोकळाच सोडला होता. उभें लावलेलें धुरकट वस्त्र त्यांच्या कळकट कायेला उठाव आणीत होतें. चिंचोळ्या कपाळावर लाल-चुट्टक चिरी उठून दिसत होती. डाव्या कडेवर अर्धवट झोंपेंतून उठलेलें नागडें मूल रडत होतें व उजव्या हातांत रॉकेलची मशालवजा उघडी चिमणी ढणढणत होती.

स्टेजवर म्हाळसाकाकूंची एन्ट्री होतांच इतर सर्व पात्रें एकदम उठून उभीं राहिलीं. इतका वेळ रडणाऱ्या पोरांनीं आपले डोळे गप्कन् मिटून घेतले नि तीं एकदम गप्प झालीं. भेदरलेल्या बायकांनीं इतका वेळ पाठीशीं बारीक करून ठेवलेले कंदील पुढें घेऊन मोठे केले. आणि बरोबर त्याच वेळीं कोठाराच्या छताला असलेल्या त्या दोन्ही झरोक्यांसारख्या दारांतून बऱ्याच पुरुष मंडळींनीं स्टेजवर आपल्या मोकाट हास्याचा वर्षाव केला.

• • •

# ३ : कोल्हाटी

सुकलेल्या पोफळांतले रोठे काढीत मी पडवींत बसलें होतें. पुढच्या खळ्यांत हातरी पसरून त्यावर ओलीं पोफळं वाळत घालायचं काम बाबी करीत होती. हातानं काम चाललं होतं, तोंडानं गोड गळ्यानं ती गात होती.

सहज सख्या ! एकदांच येई सांजवेळीं
वाट तुझी पाहीन, त्या आम्रतरूखालीं,
सहज सख्याऽऽ !

बाबी तल्लीन होऊन गात होती. तिची पूर्ण तंद्री लागली होती. तोंच मी ओटीवरून ओरडलें, "बाब्या ! सांजच्या वेळीं गो कशास सख्यास बोलावतेय्स ! " माझा प्रश्न कानावर पडतांच वाऱ्यावर तरंगण्यासाठीं झेप घेणारे स्वर बाबीच्या कंठांतच रुतून बसले. गाण्याचा अर्थ लक्षांत येतांच तिनं आपली लालचुटुक जीभ चटकन् बाहेर काढली. आपला ओशाळा मुखडा दोन्ही हातांच्या ओंजळींत लपवला आणि माझ्यासमोरून काढता पाय घेतला. गडग्यावर धुण्यानं भरलेला हारा होता. पंचाची चुंबळ बनवून बाबीनं ती आपल्या टाळूवर ठेवली, मग धुण्याचा हारा डोक्यावर घेतला आणि पोफळं वाळत घालायचं अर्धवट राहिलेलं काम माझ्यावर सोपवून तिनं पर्याची वाट धरली, बाबी पर्यावर पोहोंचण्यापूर्वीच मी मात्र खूप मागें भूतकाळांत जाऊन पोंचलें.

तेव्हां मी दहा अकरा वर्षांची असेन–नसेन. बाबीचा बापूस तेव्हां अवघा सात आठ महिन्यांचा होता. आईनं त्याला न्हाणून, माखून कुंचींत गुंडाळला नि पाळण्यांत निजवून पाळण्याची दोरी माझ्या हातांत दिली. गुरांचा गोठा लोटण्यासाठीं आई शेतांत निघून गेली. आजी घरांत



• कोल्हाटी

केर-धोतरं उरकीत होती. मी रोजच्याप्रमाणें धावे, ओव्या म्हणून बाळाला झोपीं काढत बसलें होतें. पण त्या दिवशीं त्या गुलामाची न्हाण-नीज कुठें पळाली होती कोण जाणे. मी गायची थांबलें कीं हुंकार देऊन तो दुसरं गाणं म्हणायला सांगायचा. माझ्या सांठ्यांतलीं सारीं गाणीं संपतांच मी तमाशांत ऐकलेली लावणी म्हणूं लागलें.

कृष्णा ! येतें माघारीं जरा थांब
थांब थांब
सोन्याचा पाळणा, रेशमाची दोरी ।
झोका देतांना, गेला झोका लांब
लांब लांब ।
कृष्णा ! येतें माघारीं जरा थांब
थांब थांब ।

उंचावलेल्या सुरांतलं तें गाणं ऐकतां ऐकतां बाळाचीं ताठलेलीं नेत्रकमळं हळूंहळूं मिटूं लागलीं आणि माझीं नेत्रकमळं ? तीं कमळं त्यजून त्यांतील दोन्ही भुंगे केव्हांच पसार झाले होते. बाळंतिणीच्या काळोख्या खोलींत असलेल्या पाळण्याला झोके देण्याचं काम माझे हात एखाद्या यंत्राप्रमाणें न थांबतां करीत असले तरी मी मात्र पाटलांच्या पडवींत रेज्यांच्या आडोशाला बसून इतर बायकांबरोबर रंगी कोल्हाटणीचा तमाशा पाहण्यांत दंग झालें होतें.

वेळ रात्रीची होती. पाटलांचं खळं गॅसच्या दिव्याबत्त्यांनीं उजळून निघालं होतं. माणसांनीं फुललं होतं. पैजणांनीं झणत्कारलं होतं. तुणतुण्यानं निनादलं होतं. त्या धुंद वातावरणांत चवळीच्या शेंगेसारख्या लवचिक बांध्याची काळीसांवळी पण मोहक व आकर्षक असलेली रंगी कोल्हाटीण वीजेसारखी लवत होती, चमकत होती. नाचत होती व सुरेल गळ्यानं

कृष्णा ! येतें माघारीं जरा थांब
थांब थांब ।

हें पालुपद घोळून घोळून म्हणत होती. तिथें जमलेले शें-पांचशें कान, जिवाचा कान करून ती लावणी एकाग्रतेनं ऐकत होते. आणि डोळे ?

कांहीं डोळे तिच्या नाचऱ्या पावलांचं कौतुक करीत होते. कांहीं तिच्या रेखीव चेहऱ्यावर स्थिरावले होते. कांहीं तिचे उन्नत हावभाव पाहून वखवखले होते व तिच्या अंग-प्रत्यंगाला खाऊं कां गिळूं करीत होते. कांहीं इतके लुब्ध झाले होते कीं स्वतःलाच विसरले होते. कांहीं डोळे लहानमोठे होत होते, तिला खाणाखुणा करण्यांत गुंतले होते. ती मात्र नाचगाण्याशीं एकरूप झाली होती. नित्याच्या सरावामुळें म्हणा अगर कलेशीं एकजीव झाल्यामुळें म्हणा, पण तिचं लक्ष त्या शेंकडों डोळयांच्या चाळयांकडे नसावं असं निदान वरवर तरी वाटत होतं. बत्तीच्या उजेडांत हिऱ्यांप्रमाणें लकाकणाऱ्या तिच्या डोळयांकडे मी माझ्या कौतुकानं विस्फारलेल्या डोळयांनीं पहात होतें, तोंच माझ्या पाठींत मागून एका पाठोपाठ एक असे दणके दणादण बसूं लागले. ‘ तमाशा ऐन रंगांत आला असतांना मधेंच हें काय अरिष्ट उद्भवलं ’ म्हणून मी मागं वळून बघितलं. आजी पोतेऱ्या हातानंच मला बदडीत होती व शिव्या देतां देतां विचारीत होती, ‘ घूडग्या लावणी म्हणतेयस वाटतं. कोल्हाटीण बनून तमाशांत जाणार आहेस कीं काय ? ’ रागानं आजीची काया थरथर कांपत होती. डोळे आग ओकीत होते.

खरंच कोल्हाटणीच्या तोंडची लावणी म्हणण्याचा अक्षम्य अपराध माझ्या तोंडून घडला होता ?

खेळांत येणारीं अचकट विचकट सोंगं पाहायला कोंकणांत बायकांनाहि सूट असते. कोल्हाटणीचा तमाशा असला कीं पुरुषांबरोबरच बायकांनाहि त्याचं आमंत्रण असतं. तान्ह्या पोरासुद्धां झाडून सारा गांव नग्न शृंगार पाहायला एकत्र जमतो. केव्हांहि आडपडदा म्हणून नसतो. पण त्यांतील लावणीचा अगर बतावणीचा उच्चार करणं मात्र महापाप समजलं जातं. आणि मनन होत असतं, त्याची काय वाट ? पण तें बाहेर दिसत अगर ऐकूं येत नाहीं ना ? नाहींतर मी म्हणत होतें ती लावणी नसून माझ्या अंदाजाप्रमाणं भक्तिगीतच आहे. तान्ह्या कृष्णाला लांब झोका देऊन कामाला जाणारी गोपी त्याला “ रडूं नको. मी लवकरच परत येतें. थोडा वेळ थांब ” असं सांगते आहे. ह्यांत अभद्र काय आहे हेंच मला कळत नाहीं. तें गीत कोल्हाटणीच्या तोंडून निघालं म्हणून लावणी ठरलं इतकंच.

आमचं घर कोंकणांत असलं तरी आईचं माहेर घाटावरचं आणि लग्नानंतरच तिचं राहणं मुंबईतलं. आमचे वडील मास्तर; त्यामुळें जीवन कष्टाळू आणि गरिबीचं. कोंकणचं घर व शेती, आजी व धाकटे काका मिळून सांभाळत. मोठे काका धर्मप्रचार व शुद्धीकरणाच्या निमित्तानं गांवोगांव हिंडत असत. दोघांहि काकांनीं लग्न केलं नसल्यामुळं आजी कैलासवासी होतांच मुंबईतलं बिऱ्हाड मोडून आईला आम्हां मुलांसह कोंकणांत जावं लागलं. वडील मुंबईत एकटे राहिले.

कोंकणांत आमची सहा आणे हिश्शाची खोती होती. खोतीचं उत्पन्न किती होतं? फायदा होता कीं तोटा होता तें देव जाणे. पण मान मात्र मोठा होता. मुगभाटांत जयराम कानजीच्या चाळींत राहणाऱ्या आम्हां लोकांना कोंकणांत येतांच आपण कुणीतरी बडे असामी असल्याची खात्री पटली. कोंकणांत आई नवखी होती. गांवकऱ्यांच्या शिकवणीप्रमाणं ती वागे.

एकदां गांवांत असंच एक लग्न होतं. वरातीच्या वेळीं नवऱ्यामुलीला साडे नेसवायचा एक विधि कोंकणांत असतो. आणि हा मान असतो खोतणीचा. आई लग्नघरीं आम्हां मुलांना घेऊन गेली होती. रात्र चढत चालली तरी वरात निघेना. साडे नेसवण्याबद्दल कांहीं कुरबूर चालली होती म्हणे. वरातीच्या वेळीं नवऱ्यामुलीला जें भारी लुगडं नेसायला देतात, त्याचा पदर नवरीच्या खांद्यावर खोतणीनं घालायचा असतो आणि त्याबद्दल त्या लुगड्याच्या पदराला बांधून ठेवलेला मानाचा रुपया खोतणीला मिळतो. लग्नघरच्या मंडळींचा बेत खोतणीला डावलून हा विधि पार पाडायचा होता. हा बेत गांवकऱ्यांच्या कानावर जातांच ते आईला लग्नघरांतून रुसून जायला सांगूं लागले. एका रुपयासाठीं असं रुसून जाणं आईच्या शहरी वातावरणांत वावरलेल्या मनाला पटेना. प्रश्न एका रुपयाचा नसून मानाचा होता. आई रुसून जात नाहीं असं पाहून गांवच्या इतर मानकऱ्यांनीं आम्हां मुलांना गड्याच्या खांद्यावर बसवलं व हातांत कंदील घेऊन आमच्या घरची वाट धरली. मनाला पटत नव्हतं तरी आई आमच्या मागोमाग मुकाट्यानं घरीं आली. अपमान झाल्यामुळें खोतीण लग्नघरून रुसून गेली व वरातींत बखेडा उत्पन्न झाला. थोड्याच वेळांत लग्नघरचे मुख्य गृहस्थ नारळ घेऊन आमच्या घरीं आले. त्यांनीं आर्जवून आईला

साडे नेसवण्याचं आमंत्रण दिलं. आई मानापानानं लग्नघरीं गेली. तिनं साडा नेसवल्यावरच अडलेली वरात निघाली आणि आपण पहिल्या मानाची मानकरीण असल्याची आईची खात्री पटली. आई गांवकऱ्यांना मानूं लागली.

गांवांतील इतर घरांच्या मानानं आमचं घराणं सोवळं, कर्मठ. घरोघरीं होणारे तमाशे, कुडवाळ्यांच्या खळ्यांत नाचणारे खेळे पाह्यला आम्ही पोरंबाळं जात असलों तरी बाकीच्या घरांतील बायकांप्रमाणें आमची आजी अगर आई अशा ठिकाणीं कधींच जात नसत. आमच्या खळ्यांत खेळे मात्र न चुकतां दरवर्षी नाचत, अजूनहि नाचतात. पण तमाशा मात्र कधींच झाला नव्हता. आमच्या एकुलत्या एक घराचा हा वेगळेपणा गांवाच्या डोळ्यांत सले.

आमचं घराणं रामदासी पंथाचं. घरीं असणाऱ्या धाकट्या काकांना आजुबाजूच्या गांवांतून उत्सवानिमित्त कीर्तनाचीं आमंत्रणं येत. सहसा ते तीं नाकारीत नसत.

एकदां असेंच ते कीर्तनानिमित्त बाहेरगांवीं गेले असतांना गांवांत जनी कोल्हाटणीचा तमाशा आला. गांवांतील सारे मानकरी आमच्या खळ्यांत जमले व पहिल्या मानाचे मानकरी खोतच असल्याचें आईला पटवून देऊं लागले. 'साडे नेसवणें' प्रकरणीं तिला तें पटलेलं असलं तरी घरची जबाबदारी सर्वस्वीं तिच्याचवर असतांना आपल्या खळ्यांत कोल्हाटणीचा तमाशा करूं द्यायला ती तयार होईना.

'अगे! तूं कशा घाबरलेली? बापू रागेला त आमी हौत.' एका मानकऱ्यानं काकांच्या रागाची हमी घेतली.

"असा बग बामणी, तुज पटत नसला तर तूं आपली डोळं गापकन् मिटून झोपून जा कशी. तुज्या दारांत गांव जमेल नि तमाशा बगून जायल." दुसरा मानकरी बोलला आणि आईचा नाइलाज झाला.

पोलिस पाटलानं खोतांच्या खळ्यांत जनी कोल्हाटणीचा तमाशा असल्याची वर्दी गांवांत फिरवली.

फौजदाराच्या मैन्यानं दाट शेणकाल्यानं आमचं पुढचं खळं सकाळींच सारवून ठेवलं.

दिवेलागणी टळते न टळते तोंच पुढच्या खळ्यांत गांवांतले मुख्य मुख्य मानकरी जमले. देवळाच्या कोठारांतील हडप्यांतून गांवकीसाठीं वापरलीं जाणारीं जाजमं आणून बैठक घालण्यांत आली. गॅसच्या बत्त्या लावून लखलखाट करण्यांत आला. कुणी कंदीलांनीं आले तर कोणी चुडीनं आले. हां हां म्हणतां अख्खा गांव आमच्या दारांत जमा झाला. तमाशा पाहण्यासाठीं नेहमींच दुसऱ्यांच्या दारांत जाणारीं आम्ही मुलं त्या दिवशीं अभिमानानं फुगून गेलों होतों.

गांवांतील झाडून साऱ्या बायका पुढच्या पडवींत रेज्यांच्या आडोशाला बसून तमाशा पाहण्यांत गुंगल्या होत्या. आई मात्र माजघरांत देवापुढें घोंगडी टाकून त्यावर लवंडली होती. आपल्या खळ्यांत चाललेला प्रकार तिला पसंत नव्हता. उद्यां पुरुष आपली चांगली खावड काढतील ही धाकधुकीहि होतीच. दारीं जमलेल्या ब्राह्मण मंडळींसाठीं आणि मानकऱ्यां-साठीं चहा करणं प्राप्त असल्यामुळें अखेर ती स्वयंपाकघरांत जाऊन त्या उद्योगाला लागली.

तमाशा पाहण्यांत आई भाग घेवो अगर न घेवो, पण तो आमच्या सोवळ्या घराच्या खळ्यांत नाचल्याचा आनंद विघ्नसंतोषी लोकांना लाभला होता. कल्पनेप्रमाणें आईला पुढें झाडून घरच्या साऱ्या लोकांचीं बोलणीं खावीं लागलीं. आणि त्या पहिल्या मानाच्या मानकरणीनं तीं सारीं निमुटपणें सोसलीं. त्यानंतर आमच्या खळ्यांत कधींहि तमाशा झाला नाहीं. गांवांत तमाशा आला कीं ते लोक आमच्या घरासमोर असलेल्या रिकाम्या मळ्यांत उतरायचे. आमचंच घर जवळ असल्यामुळें कांहीं ना कांहीं मागायच्या निमित्तानं सारखे आमच्याकडे यायचे. वयस्कर कोल्हाटणी तोंडीं लावायला कांहींतरी मागायच्या निमित्तानं यायच्या व इतर सर्वसाधारण बायकांप्रमाणेंच लेका–सुनेच्या चहाड्या व लेकी–जावयाचं कौतुक आईपाशीं करीत बसायच्या. तरण्याताठ्या कोल्हाटणी, ज्या रात्रीं नाचून, गाऊन तमाशा रंगवीत, त्या दिवसा आपल्या पोरांबाळांच्या खस्ता काढायच्या. तीन दगडांच्या चुलींत चार कांटक्या पेटवून भाकऱ्या बडवायच्या, अन्न रांधायच्या आणि

उरलेल्या वेळांत हातांत तुणतुणें घेऊन पेटीवाल्या साथीदाराबरोबर घरोघर गाणं म्हणत हिंडायच्या आणि भिक्षा मिळवून आणायच्या.

ही मंडळी उन्हाळ्याच्या दिवसांत यायची. सकाळीं खूप उशीरा झोपून उठायची. क्वचित् एखाद्या घरचा एखादा उडाणटप्पू कोल्हाटणीच्या नादी लागे आणि मग त्याच्या माळ्यावरील धान्यानं भरलेल्या कणग्या बघतां बघतां खाली होत. अशा एखाद दुसऱ्या गुणांनींच आपणापेक्षां वेगळी असणारी ही कोल्हाटी मंडळी आतां कुठें गडप झाली! कोण जाणे.

● ● ●

## ४ : ‘ शिष्टाचार ’

“ ओ ऽ हो ! यावं यावं, आज स्वारी इकडे कुणीकडे वाट चुकली ? ”

मी बंगल्याच्या पायऱ्या चढत असतांनाच माझ्या बालमैत्रिणीनं माझं स्वागत केलं.

खरं पाहतां आम्ही एका पाळण्यांत झोंपलों, एका अंगणांत खेळलों आणि एकाच शाळेंतून शिकून बाहेर पडलों. पण इतक्या वर्षांच्या अवधींत तिनं मला असं कधीं आपण-तुपण म्हटलं नव्हतं.

आतां आमचे जीवनमार्ग भिन्न झाले असले तरी आम्ही नित्यनियमानं एकमेकींना भेटत होतों. एकमेकींचे गालगुच्चे घेऊन, एकमेकींला चिमटे घेऊन, चापट्या मारून बालपणींच्या आयुष्याचा निर्भेळ आनंद लुटीत होतों. पण...? कार्यबाहुल्यामुळें हल्लीं मी तिला पूर्वीप्रमाणें वारंवार भेटूं शकत नव्हतें. आज जवळजवळ दीड महिन्यांनीं मी तिच्याकडे येत होतें. आणि त्याबद्दलचा आपला रोष व आमच्यांत उत्पन्न होत असलेला परकेपणा व्यक्त करण्यासाठींच तिनं मला आपण-तुपण करून संबोधलं होतं. ‘ तूं आतां मोठी झालीस, आतां तुला अग कसं म्हणायचं ? ’ हाच भावार्थ त्यांत दडलेला होता. आणि तें कांहीं अगदींच खोटं नव्हतं. अलीकडे मी सगळ्याच बाजूंनीं पहिल्यापेक्षां मोठी होऊं लागलें होतें. परिस्थितीनं, ज्ञानानं, मनानं, वयानं व आकारानंसुद्धां. पण म्हणून काय झालं ? माझ्या जिवलग बाल-मैत्रिणीनंसुद्धां मला जिव्हाळ्यानं एकेरी हांक मारूं नये म्हणजे काय ? उलट मोठ्या व्यक्तीबद्दल एखाद्याच व्यक्तीला आपलेपणा न वाटतां सरसहा सगळ्यांनाच तो वाटतो व बहुतेक सगळेच लोक त्या व्यक्तीला एकेरी नांवानं हांक मारतात. वाल्मीकि, कालिदास, शेक्सपीयर, राम, कृष्ण वगैरेंना आपण एकेरी नांवानंच संबोधतों, नाहीं का ? जें आपल्या भावनांचं पृथःकरण करतात, जे समाजाच्या सुख-दुःखाशीं समरस होतात, ते समाजाला जवळच्या



• 'शिष्टाचार'

जिव्हाळ्या व्यक्तीइतकेच प्रिय वाटतात. तो आपलेपणा दर्शविण्यासाठींच आपण त्यांना एकेरी नांवानं संबोधतों.

प्रत्येक व्यक्तीला सर्वांत प्रिय व जवळची व्यक्ति म्हणजे आई. आईला-सुद्धां अहो म्हणणारे दुर्दैवी प्राणी ह्या जगांत नाहींत असं नाहीं. पण सर्व-साधारणपणें आपण सर्वजण आईला ' ए आई ! ' असंच म्हणतों. ह्या एकेरी संबोधनांत जो कांहीं आपलेपणा व भावनांचा गोडवा भरला आहे तो अवर्णनीय आहे.

आपल्यापैकीं बहुतेकजण आपल्या प्रिय व्यक्तीला एकेरी नांवानंच संबोधतात. कित्येक वेळां चारचौघांत वाईट दिसेल म्हणून आपल्याला तसं करता आलं नाहीं तर एकांतांत आपण त्याचा वचपा काढतोंच कीं.

प्रेम निराळं आणि आदर निराळा. अजाण मुलं आदराला पारखीं असतात. त्यांना फक्त प्रेमच माहिती असतं. म्हणून तीं सरसहा सगळ्यांनाच ' अरे ! कां रे ? ' म्हणतात. पण पुढें जनरहाटीप्रमाणें आई, आत्या, मामी, मावशी, काकीप्रमाणें काका, मामा, वडील वगैरेंना एकेरी नांवानं संबोधतां येत नाहीं. बायकांना तर सासरीं गेल्यावर, ज्याच्या त्याच्या मानाप्रमाणें कुणाला ' अहो ' तर कुणाला ' आपण ' म्हणावं लागतं. येथें प्रेमापेक्षां आदराचा व मानाचाच भाग जास्त असतो. आमच्या कोंकणांत तर ह्यालाहि वाव मिळत नाहीं. लग्न होऊन गांवांत येणाऱ्या नव्या सासुर-वाशिणीला, गांवांतील प्रत्येक वडील व्यक्तीला ' आपण ' म्हणावंच लागतं. मग त्या व्यक्तीबद्दल तिच्या मनांत आदर असो वा नसो.

रीतिरिवाज व मान बाजूला ठेवून जर भावनेच्या दृष्टीनं आपण ह्या संबोधनांचा विचार करूं लागलों तर त्यांत लपलेली जादू आपल्या लक्षांत येईल.

चार-सहा महिन्यांपूर्वीची गोष्ट. कांहीं तरी कार्यक्रम होता म्हणून मी हिंदीच्या कार्यालयांत गेलें होतें. सभागृहांत प्रवेश करतांच कार्याध्यक्षांनीं ' आईये, बैठीये ' म्हणून माझं विनंतीवजा स्वागत केलं. त्यांनीं दाखविलेल्या जागेवर स्थानापन्न होईपर्यंत जमलेल्या सगळ्यांच्या माना किंचित् कुतूहलानं माझ्या बाजूला कलल्या होत्या. आणि म्हणूनच मला अगदीं अवघडल्या-सारखं वाटत होतं. ह्या आपण—तुपणच्या बहुमानार्थी कुंपणांत मी कार्यक्रम

संपेपर्यंत संकोचून बसले होते. शिष्टपणाचा आव आणून, गंभीर चेहऱ्यानं, अवघडून बसायचं. मनसोक्त हंसण्यासारखा विनोद झाला असला तरी जास्त तोंड न उघडतां हळूच, थोडंसंच हंसायचं. कुणाशींहि हव्या तशा अघळपघळ गप्पा मारायच्या नाहींत. छेः, छेः ! किती कांटेरी कुंपण हें ! कार्यक्रम संपतांच दिसेल त्याला नमस्कार करीत व दुसऱ्यांनीं केलेले नमस्कार स्वीकारीत मी आस्तेकदम जिन्याच्या रोखानं पुढें सरकत होतें, तोंच माझ्या पाठीवर दणकट हातांची जोरदार थाप बसली. मी दचकून मागें वळून पाहिलं तों ज्यांच्या अंगाखांद्यांवर खेळत मी लहानाची मोठी झालें ते माझ्या वडिलांचे परमस्नेही विसूकाका माझ्या पाठीशीं हंसत उभे होते.

"काय ग पोरी ! कसं काय चाललंय् तुझं ?" त्यांनीं एकेरी नांवानं संबोधून विचारलेल्या ह्या प्रश्नाबरोबर गेल्या दोन अडीच तासांच्या तालमीनं तयार झालेले माझे हात त्यांना नमस्कार करण्यासाठीं जे उचलले जात होते ते आपोआप खालीं आले. त्यांच्याबरोबर झालेल्या पांच सात मिनिटांच्या भाषणानं माझं बालपण माझ्याकडे जणूं धांवत परत आलं होतं. इतका वेळ ठाण देऊन बसलेल्या संकोचाचा आतां कुठें मागमूसहि नव्हता. आतां मी हा जिना पूर्वीप्रमाणें धीमेपणानं न उतरतां दडदडत, धांवत उतरणार होतें. मग पाय सटकून पडले तरी हरकत नाही. नाहीं तरी आतां मी पोरच झालें होतें ना ?

हे सगळे भावनांचे खेळ आहेत हें मला पटतं. माझ्यासारख्या भावनेवर जगणाऱ्या व्यक्तींची हीच गंमत असते कीं, आम्हांला हें कळलं तरी वळवतां मात्र येत नाहीं. ज्या व्यक्तीबद्दल मला जिव्हाळा वाटतो त्या व्यक्तीला चार-चौघांत आपण-तुपण म्हणायची अगर तिऱ्हाइताला करतो तसा तोंडदेखला नमस्कार करायची वेळ आली कीं माझ्या जिभेला व हातांना सव्वा मणाच्या बेड्या घातल्यासारखा भार वाटतो. वाटतं, त्या व्यक्तीला काय वाटेल ? वास्तविक एक शिष्टाचार ह्याशिवाय दुसऱ्या कोणत्याच दृष्टीनं ती व्यक्ति ह्या क्रियेकडे पाहात नसते. पण मला मात्र माझ्याच दृष्टींतून जगाकडे पाहण्याची खोड लागल्यामुळें "आंधळ्याशीं जन अवघेची आंधळे" या काव्यपंक्तीप्रमाणें वाटतं कीं माझ्याप्रमाणेंच समोरच्या व्यक्तीच्या भावनाहि दुखवल्या जातील. ही आपत्ति टाळण्यासाठीं मग मी शक्य तोंवर त्या

व्यक्तीलाच टाळतें. क्वचितच बोलतें. बोलतांनाहि असं कांहीं अधांतरीं बोलतें कीं, 'तुम्ही कीं आपण' हा प्रश्नच उद्भवूं नये हो ! आपण म्हटलं तर माझ्या भावनांना धक्का लागायचा, आणि 'अहो' म्हटलं तर त्या व्यक्तीला वाटायचं 'काय उद्धट आहे हो ! साधा शिष्टाचार सुद्धां समजत नाहीं.'

तीच गोष्ट नमस्काराची. कुणी दिसलं रे दिसलं कीं कर त्याला नमस्कार. कुणी नमस्कार केला कीं प्रथम प्रथम मला 'आव जो' केल्यासारखं वाटायचं. इकडे गुजराथेंत आलेली व्यक्ति परत जायला निघाली कीं 'आव जो, म्हणजे 'या बरं का' अर्थातच हळूं जा, सांभाळून जा असं म्हणायची पद्धत आहे. नमस्काराबद्दल आरंभींच माझा असा गैरसमज झाल्यामुळें, समोरच्या व्यक्तीनं केलेला नमस्कार बघतांच मला बुचकळ्यांत पडल्यासारखं व्हायचं; व माझ्यापुढें प्रश्न उभा राह्यचा कीं, आतां ह्या व्यक्तीच्या घरांत जाऊन बसूं, हिच्याशीं चार शब्द बोलूं कीं आल्या पावलीं मागें फिरूं ? आतां सरावानं शिष्टाचाराचा हाहि प्रकार माझ्या अंगवळणीं पडला असला तरी प्रत्येक वेळीं वरील कल्पना माझ्या मनाला ओझरती तरी चाटून गेल्याशिवाय राहात नाहीं. परिचयाची व्यक्ति भेटतांच तिला नमस्कार करण्याऐवजीं मी आपली तिच्याकडे पाहून नुसतीच हंसतें. असं तोंडभर हंसून केलेलं स्वागत मला जास्त प्रसन्न व प्रशस्त वाटतं. आतां मला मात्र ते कितीसं जमतं व शोभतं तें मी कसं सांगणार ? तें ठरवायचं काम समोरच्या व्यक्तीचं आहे. नाहीं का ?

• • •



• गौरी आणि गणपती

# ५ : गौरी आणि गणपति

सणावारांनीं गजबलेल्या, कोसळणाऱ्या सरींनीं ओल्याचिंब झालेल्या श्रावणाला, उत्साही भाद्रपद खो देतो. मंगळागौरीच्या वशेळ्या घरोघरीं परतण्यापूर्वीं आवरणं येतं. आजूबाजूच्या गांवांत असणाऱ्या माहेरवाशिणींसाठीं आवरण्याकरितां म्हणून भाजीपाला, वाशिक, नाजूक तांदूळ, लोणकढं साजुक तूप पाठवलं जातं. हरतालिकेसाठीं पपनस, माहुलुंग, अननस, काकड्या, आगरची शहाळी आणि शेतचें चिबूड ह्यांनीं भरलेले हारे गड्यांच्या डोक्या-वरून पर्ये ओलांडतात, गांव तुडवतात. ऋषिपंचमीसाठीं कुदळ्याच्या वऱ्या, हातची भाजी व दूधदुभत्यांची हंडीं मडकीं इकडून तिकडे जातात. शक्यतों-वर संसारांतील साऱ्या अडचणी दूर सारून आवरण्याला साऱ्याजणी एकत्र जमतात. शेजारणीपाजारणी आपापसांतील वैर विसरून सहभोजनाचा बेत करतात. दुपारीं हंसत खेळत गोडाचं जेवण होतं. रात्रीं सारं भाजून शिजव-लेलं निर्लेपाचं खायचं असतं. रात्रींच्या ह्या फराळानंतर दांत घांसून काकडी खाऊन झोपायचं असतं. कारण दुसऱ्या दिवशीं हरतालिकेचा कडकडीत उपवास असतो. दांत घांसून काकडी खाल्ली कीं दांतांत अडकलेलं खरकटं-मरकटं निघून जातं.

मंगळागौरीचं व्रत फक्त नवोढांचंच असतं. पण हरतालिका साऱ्या सवा-ष्णींचं व्रत आहे. त्या दिवशीं म्हाताऱ्या-कोताऱ्या सवाष्णीहि पूजेला बसतात. त्यामुळें पत्री, फुलं खूपच काढायची असते. हा उपासहि कडकच करायचा असतो. फक्त शहाळीं आणि फळं खायची सूट असते. सुकवलेले कापे गरे व आंब्या-फणसांचीं साटंहि उपासाला चालतात. हें व्रत भक्तिभावानं ओथंब-लेल्या मनानं व मरगळलेल्या शरीरानं उजवलं जातं. मंगळागौरीच्या जागरणासारखा धांगडधिंगा घालायला ह्या रात्रीं अंगांत ताकद नसते. शिवाय लगेच येणाऱ्या गणपतीची तयारी करायला उत्साह कायम टिकवायचा असतो.

कोंकणांत ह्या सणांचें महत्त्व ब्राह्मणांपेक्षां कुडवाळ्या–माडवाळ्यांत फार असतं. ह्या दिवसांत त्यांच्या वाड्या-वाड्यांतून उत्साहाला उधाण आलेलं असतं. मोठमोठ्या शहरांतले पांढरपेशे लोक तिथले गणेशोत्सव सोडून खेड्यांत धांव घेत नाहींत; पण कुळवाडी मात्र गौर–गणपति आणि शिमगा, गांवीं येऊनच साजरा करतील. हिरव्यागार डोंगरावर गर्द रानांतून खळखळाट करणाऱ्या पर्यांतून माघाऱ्यासंगं माहेरवाशिणींची सारखी ये–जा चाललेली आढळते. उन्हाळ्यांत नव्या नवऱ्या लहर आली कीं माहेरीं पळून जातात. शहाणी समंजस बाई असली तरी एकदां तरी माहेरीं पळून जातेच. एकदांसुद्धां माहेरीं पळून गेलं नाहीं तर मेल्यावर म्हणे 'यम त्या बाईला आळ्याची अंब्रील करून पाजतो.' पावसाळ्यांत मात्र ओढाळ पर्या कुणाहि माहेर-वाशिणीला असलं धाडस करायचं धैर्य देत नाहीं. त्या वेळीं माघाऱ्याचीच मदत लागते.

ब्राह्मणवाडींत हरतालिकेची पूजा दुपारीं बारा वाजेपर्यंत तरी उरकतेच. कुळवाड्याकडे ही पूजा कुठें संध्याकाळीं तर कुठें रात्रीं असते. ह्या दिवशीं कुडवाळणी आघेड्याच्या फोकानं दांत घांसतात. आणि पऱ्याच्या गार पाण्यानं न्हातात. न्हाऊन घरीं जातां जातां ब्राह्मणवाडींत पूजलेल्या हरतालिकेला हळदकुंकू वाहून जातात.

ऋषिपंचमीचा उपास ब्राह्मण बायका आणि वृद्ध कुडवाळणी करतात. पण ह्या व्रताचं खरं माहात्म्य मांत्रिक लोकांत असतं. जीवजिवाणूंनीं दंश केला असतां विष उतरवण्यासाठीं मंत्र घालणारे मांत्रिक ऋषिपंचमीपर्यंत नवीन झालेला भाजीपाला खात नसतात. गांवांतल्या एखाद्या राईंत भोंबाडाच्या वारुळ-सान्निध्यांत मांत्रिक लोकांचे उभट दगडांचे कांहीं देव असतात. ऋषिपंचमीच्या दिवशीं सारे मांत्रिक कडक उपवास करतात व राईंत जाऊन ह्या देवांना भाजीपाला वाहतात, त्यांची पूजा करतात व मग दुसऱ्या दिवसापासून स्वतः भाज्या खायला सुरुवात करतात.

नारळी पौर्णिमेला दर्याची पूजा होऊन नारळ दर्यांत पडला कीं आगोटपासून खवळलेला सामिंदर शांत होतो. जेव्हां हल्लींसारखी थेट मुंबई-राजापूर एस्. टी. ची सोय नव्हती. तेव्हां मुंबईहून गौरीसाठीं येणारे चाकरमानी बोटनिंच येत. सहसा कुणीहि ह्या सणाला गांवीं आल्याशिवाय राहात नाहीं.

ज्यांना गांवीं येणं अगदींच शक्य नसतं ते घरीं पैसे पाठवितात. पंचांगांत लिहिल्याप्रमाणें गणपति–गौरी येतात. घरोघरीं गणपतीची आरास होते. गौरीच्या सणाला मात्र घरोघरीं बकरा कापला जातो. ओली सुपारी गौरीला वाहिल्याशिवाय स्वतः न खाण्याचा बऱ्याच जणांचा नेम असतो. गौरी आल्या कीं कुडवाळणीच्या जीवाची जी काय धांवपळ सुरू होते ती कांहीं विचारूं नका. झाडून साऱ्या बायका नवीं कापडं ( लुगडीं ) नेसतात. तेल माखून डोई उगवतात. बुचडयांत झेंडू, भुतांब्रीचे गजरे माळतात. आणि 'फुगडं' घालायला एकमेकींकडे जातात. कुणा एखाद्या घरच्या गौरी वाघानं खाल्लेल्या असतात. त्या घरची मंडळी ज्या घरीं गौरी आल्या असतील त्या घरीं जाऊन सण साजरा करतात. 'फुगडं' घालतां घालतां बेभान झालेल्या पोरीसोरींबरोबर बाप्येहि फुगडं घालूं लागतात. गौरीची गाणीं आणि फुगडं ह्यांनीं गौरींतल्या रात्री जागवल्या जातात.

काळ्याकभिन्न ढगांनीं काळवंडलेलं आकाश भाद्रपदांत बरंच निवळलेलं असतं. गगनाच्या घुमटांतून कधीं सूर्याचे सोनेरी किरण पृथ्वीवर डोकावतात, तर कधीं चांदण्याची चोरटी चाहूल धरणीला लागते. श्रावणांत निसरडीं झालेलीं खळीं, हळकलेलीं असतात. अशा खळ्यांतून मृदंगाच्या तालावर घुंगूर घुमूं लागतात. बाप्ये गणपति-गौरीचे नाच नाचत असतात. मृदंग वाजवणारा मधें बसतो. नाचणारीं पोरं त्याच्याभोंवतीं फेर धरतात. साऱ्यांचे घुंगूर बांधलेले पाय एका तालांत पडत असतात. सैल मोकळे सोडलेले हात एका लयींत मागेंपुढें हेलकावे घेत असतात. मोठ्या खडया आवाजांतील गाणीं वाड्यावाड्यांतून घुमूं लागतात. कोंकणचे गडी (मुंबईतले बाल्ये) ह्या नाचांतून विविध प्रकारचीं कसबी नृत्यं नाचून दाखवितात. जरासुद्धां न चुकतां एका तालासुरांत नाचलीं, गाईलीं जाणारीं हीं नृत्यं पाहतां पाहतां आपणहि धुंद होऊं लागतों. तोंच भाद्रपदांतील लहरी पाऊस सरसर धांवत येतो नि बेभान झालेल्या त्या गड्यांना आंघोळ घालतो.

एव्हांपर्यंत पर्यांचे होर ओसरलेले असतात. तरीसुद्धां कांडीकोंडींतून पुरुपभर पाणी सहज असतं. आमच्या घरांना जवळ असणाऱ्या खालच्या वाडीचे गणपति, गौरी पोंचवण्यासाठीं पर्यांच्या आमच्या उतरणावर आणले जातात. दिवस परतायच्या सुमाराला घराघरांतून गणपति–गौरी निघायला

सुरुवात होते. आमच्या घरामागचा डोंगरउतार बाया-बाप्यांच्या रंगीबेरंगी पोषाखांनीं फुलायला लागतो. बहुतेक साऱ्या गौरीचे मुखवटे लाकडी असतात. हात कागदी असतात. घोळदार लुगडं नेसलेली गौर खुर्चीत बसलेली असते. कुणाच्यातरी डोक्यावर बसलेली ही खुर्ची पर्याची वाट चालत असते. कुर्व्यां ( कुर्वं हें गांवाचं नांव ) तल्या रावांच्या कारखान्यांतले गणपति विविध प्रकारचे व कलात्मक असतात.

आमच्या खड्यांच्या गौरी व दीड नाहींतर तीन दिवसांचे गणपति केव्हांच घरीं गेलेले असतात. ओकं ओकं भासणाऱ्या त्या घरांत आम्हांला अगदीं सुनं वाटतं. मागीलदारच्या डोंगरउतारावरून सरकत येणाऱ्या त्या रंगीत मिरवणुकींत सामील होण्यासाठीं मग आम्हीहि तयार होऊं लागतों. तोंच पांडींतून हांक येते, " ताई ! बेगीनं चल गो. " मिरवणूक आम्हांला घेऊन पांडींतून पर्याच्या वाटेला लागते. पांडीच्या एका हाताला आमचं आगर आहे. दुसऱ्या हाताला आहे काकूचं भातशेत. दोन्ही गडग्यांवरचे वाळे, तेरडे आपलीं पानं जोडून घरीं निघालेल्या गणरायाला नमस्कार करतात. शेतांतलं पसवलेलं भात आपला माथा नम्रतेनं वाकवतं. आगरांतलीं पोफळं, पिकलेल्या शिपटांतील निवडक पोफळे गणपति-गौरीला अर्पण करते. कांहींजण गौरी, गणपति घेऊन कोंडींत उतरतात. उरलेले सारेजण पर्या-कडेच्या दुर्वांवर फेर धरून नाचायला सुरुवात करतात. एकीकडे बायकांचा फुगड घुमतो तर दुसरीकडे बाप्यांचा नाच रंगतो.

' श्रीकृष्ण बोले धर्मराजाला वो ! श्रीकृष्ण बोले धर्मराजाला '

अवो ! मंगलागौरीचा वरत कशाला ? वो ? मंगलागौरीचा वरत कशाला ?

अशा प्रकारच्या संथ लयींतील गाण्यानं नाचाला सुरुवात होते. शिमग्या-पासून माहेरवाशिणी ज्या सणाची आतुरतेनं वाट पाहात असतात तो हा गौरीचा सण संपलेला पाहून बायांचे डोळे पाणावतात. त्यांचा फुगड थांबतो आणि बाप्यांच्या नाचांत लय वाढवणारं गाणं सुरू होतं.

' ओ ! माझ्या मायरच्या सोनारदादा. ओ माज्या मायरच्या सोनार दाऽऽदा रं ! तुला घडाया दिल्या मी पुतल्या, तुला घडाया दिल्या मी पुतल्या रं ?

खंतावलेल्या माहेरवाशिणी चित्रागत उभ्या राहतात व आपल्या भावांचा तो नाच टक लावून पाहतात. सारींजणं मुद्दामच कोंडीकडे दुर्लक्ष करतात. उत्साहाला उधाण आणणाऱ्या त्या देवतांचा विरह कुणालाच सहन होण्यासारखा नसतो. प्रत्येकजण स्वतःला नाच-गाण्याच्या कैफांत झोंकून देत असतो. जाणते, विवेकी बाप्ये गौर–गणपति पोंचवून कोंडीबाहेर आलेले असतात. कोंडीच्या तळाशीं बसलेल्या गणरायांकडे कुणीच पाहात नाहीं. सारींजणं पर्यांवर पेंवणाऱ्या निर्माल्याकडे हळूच आपली उदास नजर टाकतात.

टाकळ्यांचीं पानं मिटून बराच वेळ झालेला असतो. चारी दिशांनीं पुढें सरकणारा अंधार आपल्याला वेढायला येत असतो. पर्याचा खळखळाट गंभीर होऊं लागतो. उदासवाणी मनं भरून येतात. जड झालेलीं पावलं घराच्या दिशेनं वळतात. तोंच नाचणारे बाप्ये साऱ्या विषण्णतेला, हुरहुरीला पुरून उरणारं जलदांतल्या जलद लयींतील गाणं सुरू करतात.

‘ हुंबरीबाय तुजी सारं गेली वाया
आरत घेऊन आली पुत्राची माया
देवाच्या आरती, गणेशा–पुढतीं
वोवाळूं या ऽ वो ऽ ऽ वोवाळूं या. ’

●∞●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 30055 दि. 10/8/65
क्रमांक 1520 नों दि. 25-8-65




● " काय मा बाबी "

## ६ : " काय मा बाबी "

झाडींतुनी, खिडकींतुनी कोण ग बघतो ?
लाखे माझा सावकार चंद्र डोलतो–
भांडूं नको, तंटूं नको तुमचे तुमाला
पदरीचा पैका देतो, झेंडू फुलला.
शाव शाव, साबूसातारा, घो म्हातारा,
ऐक रं मुड्या, चौरंग चुड्या
घाटी भयण फिरे नि कोंकणी भात यिरे,
नि शाव शाव...

भागं खणखणीत, गोड आवाजांत आपलं नेहमींचं गाणं गात होतं. दूरच्या त्रासदायक प्रवासाहून मी सकाळींच घरीं सुखरूप पोचलें होतें व दुपारचं जेवण आटोपतांच भागवटा घालवण्यासाठीं माजघरांत अमळ लवंडलें होतें. तोंच भाग्याचा परिचित, मंजुळ सूर खूप दिवसांनीं कानांवर आला. मी आलेली समजतांच भाग्यानं मला आवडणारं गाणं आळवायला सुरवात केली. तें आल्यावर असा लाघवीपणा करील हें आई ओळखून होती आणि म्हणूनच अंग धुतांनाच तिनं मला बजावलं होतं, " अगो, भाग्याच्या नांवचं धडोतं आणलं असशील तेंच नेस हो ! करड सडायला भागं दुपारीं येणार आहे—"

करड कांडतांना भागं मला आवडणारं गाणं आळवील, मी त्याच्या मंजुळ आवाजानं आकर्षिली जाईन, मग प्रेमानं ओथंबलेलं भागं मला आपल्या कवेंत घेईल आणि नंतर त्याच्या स्पर्शानं विटाळलेलं धडोतं मला बदलावं लागेल. भागं तें बदललेलं लुगडं धुण्यासाठीं म्हणून आपल्या घरीं घेऊन जाईल व दुसऱ्या दिवशीं स्वतःचं तें नेसूत, " माज्या बाबीनं

माझ्यासाठीं आणलान्" असं भेटेल त्याला सांगत, मिरवत येईल. मीहि वाटणारी हळहळ वर न दाखवतां माझ्या पायां पडणाऱ्या भाग्याचं कौतुक करीन. हें नेहमींच्या अनुभवावरून आईला आतां अगदीं पाठ झालं होतं.

आळस झाडून नि पासोडी सोडून मी मागच्या पडवींत आलें. पडवींतल्या वायनावर घातलेल्या करडीच्या घाणीशीं भाग्याच्या हातांतलं मुसळ झुंजत होतं. फार घालतांना वरखालीं होणाऱ्या त्याच्या हातांतील भरगच्च काकणांची किणकिणती लय त्याच्या गाण्याला होती. फार चुकवून घाणीबाहेर येणारी करड डाव्या-उजव्या पायानं परत फाराखालीं ढकलत भागं वायना-भोंवतीं गोलगोल फिरत होतं. त्याचं उफाळणारं तारुण्य आतां उताराकडे झुकायला लागलं होतं. पेहराव मात्र पहिल्यासारखाच होता. घामेजल्या गोऱ्यापान रुंद कपाळावर जासवंदीच्या पाकळीसारखी लालभडक कुंकवाची चिरी होती. केसांचं टोपूल बऱ्याच दिवसांत विंचरलेलं नव्हतं. नाजूक जिवणींतले पातळ ओठ पानतंबाखू खाऊन रापटलाल झाले होते. कानांत सोन्याच्या कुड्या-बुगड्या होत्या. अंगांत धारवाडी खणाची अंगभर चोळी होती. दंडांत चांदीच्या वाक्या होत्या. पायांत जोडवी, मासोळ्या होत्या. कुडवाळी पद्धतीनं नेसलेल्या सुडक्यांतून मांड्यापासूनचे पाय उघडे दिसत होते. भाग्याचं पहिलं दणकट, बांधेसूद शरीर आतां थोडं थलथलीत झालं होतं.

"काय गो ! बरं आहेस ना ?" माझ्या या प्रश्नासरसं भाग्याचं माझ्याकडे लक्ष गेलं आणि हातांतलं मुसळ कोपऱ्यांत ठेवून तें पहिल्याच ओढीनं माझ्याकडे धांवत आलं. "माजा बाब्री ता." असं म्हणून त्यानं मला आपल्या कवेंत घेतलं आणि पूर्वींप्रमाणंच माझे मटामट मुके घ्यायला सुरुवात केली.

त्याच्या त्या मगरमिठींत माझा जीव गुदमरूं लागला. त्याच्या तोंडाला येणारा पानतंबाखूचा दर्प मस्तकांत भरला. गुदमरणाऱ्या आवाजानं मीं त्याला दटावत विचारलं, "मेल्या, हें काय करतायस ? आतां काय मी लहान आहें ? माझे पोरगे बघतील तर तुला नि मला हसतील."

"अगो, काय मा बाब्री, त्यांची असशील ऐस, पण आमचा बाब्रीच हैस ना ?"

भाग्याच्या मिठींतून स्वतःची सोडवणूक करून घेण्यासाठीं मग मी त्याच्याशीं ऐसपैस गप्पा मारायला सुरुवात केली आणि मला सोडून तेंहि प्रश्नोत्तराच्या त्या खेळांत रंगून गेलं.

आमचं गांव हातपाय चांगलं ऐसपैस पसरून बसलेलं आहे. लोक पुंजक्यापुंजक्यांनीं वस्ती करून राहिले आहेत. डोंगरावर वसली ती वरची वाड, सपाटीवर वसली ती मधली वाड आणि खोलांत वसली ती खालची वाड. याशिवाय गुरववाड, सुतारवाड, सोनारवाड, ब्रामणवाड, महारवाड अशा कितीतरी वाड्या मिळून गांव बनलं आहे. गुरवांच्या भाग्याचं माहेर होतं आमच्या घरापासून जवळ असलेल्या वरच्या वाडींत, आणि सासर आहे मधल्या वाडींत. भाग्याचं लग्न झालं तेव्हां त्याचा घो तुकाराम मुंबईचा चाकरमानी होता. तो गौरी-गणपतीला किंवा शिमग्या–होळीला गांवीं यायचा. लग्न झालं असलं तरी भागं सासरीं मुळींच राहात नसे. तुका गांवीं आला कीं सासरचे लोक भाग्याला बळेंबळें घरीं घेऊन जात. लगेच तें रात्रीं काळोखांतून माहेरीं पळून येई. भाग्याला सासरीं नेल्याची बातमी आम्ही ऐकतों न ऐकतों तोंच फाटफटीला भागं दांतांना तंबाखूची मशेरी चोळत चोळत पऱ्ह्याच्या वाटेनं जातांना आम्हांला दिसे. मग आम्ही पोरं त्याच्या मागावर राहात असूं. तें पऱ्ह्याची दरड चढून वर येऊं लागलं कीं आम्ही त्याला विचारायचों, " भाग्या! भाग्या! भागलंस काय? संसाराला लागलंस काय?"

तें असेल तिथूनच ओरडून सांगे, " नाय गो बालांनो, अजून."

मग आम्ही विचारीत असूं, " कां गो?"

तें जवळ येऊन हलक्या आवाजांत सांगे, " काय मा बालांनो, तो गुरवाचा पोर लय चावट ना गो! काळोखांत माज्या पाठीस लागतो."

" मग तूं त्याच्या घरीं नांदायला गो कां जात नाहींस?" मी पाभळेपणीं विचारी.

" काय मा बाबी, अगो! बाप्याची जात, त्यांतून अंधारी रात–मी संगं नाय गो त्याच्या जायची—"

तालासुरावर हें गाणं गात भागं शिमग्यांत नाचणाऱ्या खेळ्यांतल्या गोमूसारखं नाचायला लागे. त्या वयांत ह्या गाण्यांत दडलेला अर्थ आम्हांला उमजत नसे. आम्हांला वाटे, भागं आतां कधींच सासरीं जायचं नाहीं. पण थोड्याच वेळांत भाग्याची निघालेली धिंड आमच्या पांडींतून जाऊं लागे. हातांत निगडीची शिमाशिमीत काठी घेतलेला तुका भाग्याला पुढं घालून आपल्या घराच्या दिशेनं चाललेला असे. त्याच्या उग्र चेहऱ्यावर ‘ बघा कशी वठणीवर आणली ’ असा भाव उमटलेला असे. खालीं मुंडी घालून त्याच्यापुढं चाललेलं भागं आपले टपोरे डोळे उचलून आमच्याकडे मिस्किल हसरी नजर फेकी व हातांतल्या पदराचा शेव तोंडावर धरून गालांतल्या गालांत गुलूगुलू हसे. त्या हसऱ्या नजरेचा अर्थ असे, ‘ काय मा बालांनो, आत्ताच्यानं सासऱ्यास गेलों तरी रातच्याला पळून येतों कीं नाय बघा. ’ भाग्यामागून ताठ्यांत चालणाऱ्या बिचाऱ्या तुक्याला आम्ही कां खिदळतों हें कळत नसे.

तारुण्यानं मुसमुसलेलं भागं म्हणजे एक उनाड मैना होती. अंगानं दांडगादुडगा, रंगानं कुळकुळीत काळा असा आडदांड तुका भाग्याला नवरा म्हणून मुळींच शोभत नसे. देखण्या भाग्याच्या मनांत तो कांहीं केल्या भरेना. तें त्याची डाळ शिजूं देईना; सासरीं नांदेना. मग गांवकऱ्यांनीं त्याला समजावून तुक्याबरोबर मुंबईला लावून दिलं. आपल्या देखण्या रूपानं वेडावलेल्या तुक्याला भाग्यानं हां हां म्हणतां स्वतःच्या मुठींत ठेवायला सुरुवात केली. भाग्यानं हट्ट धरतांच तुक्यानं आजूबाजूंच्या आयाबायांबरोबर एका कापडगिरणींत नोकरीवर जायला त्याला परवानगी दिली. तिथं म्हणे, या वयेनं गिरणींतल्या मुकादमाशींच सूत जमवलं. तुक्याची पडखाऊ वृत्ति लक्षांत आल्यावर मग तें नेहमींच असं गुण उधळूं लागलं. तरण्याताठ्या पोरांना नादीं लावून नासवूं लागलं. तुक्यानं अखेर कंटाळून त्याची परत गांवीं बोळवण केली.

मुंबईंत राहून भागं छानछोकी करायला शिकलं होतं. पण गांवीं रस-रशीत असलेली त्याची तब्बियत मात्र फिकुटली होती. मुंबईहून आल्यापासून त्यानं आपल्या भावाचीं शेळडं राखायचं काम पत्करलं. फावल्या वेळांत तें

बामणवाडींत दळणकांडण करी. कुणाचीं धुणीं-भांडीं करी, तर कुणाचे शेणगोठे लोटी. मधले वाडकरी म्हणत, "भाग्यास घो, संसार नको. त्यास बामणांचीं वायनं ( उखळ ) चाटाय गोड लागतात."

भागं दळायकांडाय असलं म्हणजे आम्हां पोरांना त्याला राखण बसावं लागे. एकीकडे आम्हांला गोडगोड गप्पा ऐकवीत, सुरेल गाणीं म्हणून गुंगवीत भागं आमच्या डोळयांत धूळ फेकी व लुगड्याच्या ओटी झोगल्यांत चोरलेल्या कण्या, तांदूळ लपवी. आमच्या आई, काकूनं कितीदां तरी त्याला त्याच्या ओटींतून चोरलेलं धान्य ओतायला लावलं आहे. असं कांहीं घडलं कीं आम्हांला वाटे, कीं आतां चारआठ दिवसतरी भागं आईला तोंड दाखविणार नाहीं. पण तें आपलं लगेच दुसऱ्या दिवशीं दारांत हजर होई व हसत डोळे मिचकावत विचारी, वैनी, काय काम हाय काय गे?" झालं गेलं विसरून बायकाहि त्याला लगेच काम सांगत. त्यामुळें भाग्याचं कांहीं चुकत आहे. असं कांहीं आम्हांला वाटत नसे. पण मधल्या वाडकऱ्यांना मात्र त्याचं वागणं खटके.

भाग्याला धडा शिकविण्याच्या विचारानं एका वर्षी मग मधल्या वाडकऱ्यांनीं खेळयांत भाग्याचं सोंग आणलं. तालासुरांत नाचणाऱ्या खेळयांची फळी फोडून अवतार केलेला व लुगडं नेसलेला बाप्या नाचत, गात बत्तीच्या उजेडांत आला. तो तालासुरांत गात होता. "अगो, अगो भाग्या! तुज दादला बोलावतोय."

हेंच पालुपद सोंग घेतलेल्या भाग्यापाठोपाठ दोनचार वेळां सर्व खेळयांनीं म्हटल्यावर मग बासनांतील कपडे घातलेले व डोक्याला रंगीत रुमाल बांधलेले दोघेचौघे पोरगेलेसे खेळे त्या भाग्याची समजूत घालूं लागले— "अगो भाग्या! तुक्यानं तुज वाकी नि इरकली कापड आणलंयन्. चल बायो सासऱ्यास— "

"मरूं दे तां तुका! मी नाय यायचा." सोंग घेतलेला बाप्या अंग घुसळत आणि किंचाळत साऱ्या खळयाभर थयथय नाचूं लागला आणि तें पाहून प्रेक्षक पोट धरधरून हसूं लागले.

प्रेक्षक बाप्ये जाजम घालून खेळयांसमोर खळयांतच बसले होते. सुतारासोनारांच्या व बामणांच्या बायका रेज्यांच्या आडोशानं ओटी, पडवींत

बसल्या होत्या. कुडवाळणी, माडवाळगी मागच्या खळ्यांत काळोखांत बसल्या होत्या. म्हारणी गडग्याचा आडोसा घेऊन पांडींत तर म्हार खळयाच्या गडग्या ( बांधा ) वर बसले होते. तमाशा, खेळे अगर भजन असलं कीं त्या ठिकाणीं सारा गांव हा असा गोळा होतो.

साऱ्या गांवासमोर आणलेलं आपलं हें सोंग भाग्याला सहन झालं नाहीं. तें काळोखांतील बसल्या जागेवरूनच शिव्या देऊं लागलं— " सोंग आनना-राचा जल्ला म्होरा, गुलामाच्या नांवावर पडला शिरा." आणि मग आजू-बाजूच्या कुडवाळणी, "अगो! चीप, चीप" म्हणून भाग्याला दटावूं लागल्या. मागल्या खळ्यांत माजलेल्या गलक्यानं पुढल्या खळयांत नाचणाऱ्या सोंगाला जास्तच चेव चढला. हसणाऱ्या प्रेक्षकांनाहि जोराच्या उकळ्या फुटूं लागल्या.

उन्हाळा हा असाच टिवल्याबावल्या करतांकरतां संपला. पावसाळ्यांत भाग्याचीं शेलडं गुरांबरोबर जांगळीच घेऊन जाई. मग भागं नांगरामागो-माग शेतांत जाई किंवा कुणाकडे पैर गोरवमें जाई.

कोंकणांत भात दोन प्रकारांनीं पेरतात. एक रोव पेरायचा व एक दाढ पेरायची. रोवाला काढणीलावणी नसते, पण दाढीला मात्र हे सर्व सोहाळे करावे लागतात. दाढ साधारण वाढली कीं ती उपटून काढतात. उपटलेल्या रोपांच्या बेताबेताच्या पेंढ्या बांधतात. ह्या पेंढ्यांचीं मुळं स्वच्छ धुवावीं लागतात. मुळं जितकीं स्वच्छ धुतलीं जातील तितके स्वच्छ तांदूळ होतात. नाहींतर तांबडट रंगाचेच राहतात. दाढ उपटलेल्या मळ्या नंतर चिखलवल्या जातात. या चिखलांत धुतलेल्या पेंढींतील अंदाजें चारपांच रोपांचा एक आवा याप्रमाणं अंतराअंरावर लावणी लावण्यांत येते. दाढ काढण्याचं व लावणी लावण्याचं काम बायका व म्हातारेकोतारे पुरुष मिळून करतात. एखाददुसरी तरणीताठी बाई कुदळयानं मळीचे कोनेकोपरे ( जिथं नांगर फिरूं शकत नाहीं ) खणते. दांडगे गडी जोत धरून मळ्या चिखलवतात. पांडी, सारणींतून वाहात जाणारं पावसाचं पाणी नीट बांधून शेतांत आणलेलं असतं. पाण्याच्या त्या झोताखालीं दाढीच्या बांधलेल्या पेंढ्या स्वच्छ धुवून चिखलवलेल्या मळींत लावणी लावणाऱ्यांच्या हातापर्यंत त्या नेवून पोचवण्याचं काम पोरासोरांचं असतं. लावणी लावणाऱ्या बायका आपआपलीं ठराविक

आव्यांचीं पातं धरतात. लहर आली कीं एकमेकीला नेत्र संकेत करून एखाद्या नव्या सासरेवाशिणीच्या आवर्तीभोंवतीं भराभर आवे लावून तिला मधें कुडतात. घोवाचं नांव घेतल्याशिवाय मग तिला ते आवे ओलांडून बाहेर येतां येत नाहीं. त्या वर्षी आमच्या शेतांत पैन्यांनीं भाग्याला असंच लावणी लावतांना कुडलं होतं व मग भाग्यानं लाजतमुरकत तुक्याचं नांव घेतलं होतं.

" उभी व्हतों सोवाष्णींच्या मेल्यांत, गुलाबाचा फुल माल्याच्या मल्यांत, नवरत्नांचा हार सासूबायच्या गल्यांत, सासूबायच्या पोटीं जनमले हिरे, मामाजींच्या मंदीलाला मोत्याचे तुरे, मी पुंजली तुलस, तींत गवसला कलस, अस्सा कलस शोभेचा, पाड पक्का अंबा ग्वाडीला जसा, नाजूक केलीचा गाभा, कचेरीला उभे, सभेला शोभे, काय नाकातोंडाची नग ? डाव्या पायावर पंजाची झोक, हसतात गालांतल्या गालांत, इचारतात महालांत, काय महालाची नवाई ? इसारलों बापूस आई, भयण-भावंडाची आठव न्हाई, असं श्याणपण किती ? बारा गावंद्यांचा कारभार हातीं. हातीं धरली माती, असं सोनं किती ? माय बापूस परीस पुरवले लाड, हवेली बांधली तीन ताड, परसांत काढला बांधीवाड, वर रामफलाचा झाड, पुढच्या दारीं अंबारीचा हत्ती, अंबारीच्या कलसास मोत्याचे वेल, तुकोजी भरतार बसले पूजेस मी देतों बेल—"

ज्या तुक्याला भागं क्षणभरहि आपल्या हारेम्होरे येऊं देत नसे त्याचंच तें कौतुकानं ओथंबलेलं, कुडवाळी पद्धतीचं लांबलचक नांव ऐकतांना सारीं-जणं कामधाम विसरून गेलीं.

हिरव्याचार दाढीच्या निथळत्या पेंढ्या हातांत घेऊन मी शेताच्या गडग्यावर उभी राहिलें होतें. आकाशाचं झाकळलेलं छत फोडून पाऊस शत-धारांनीं कोसळत होता. मी डोक्यावर घेतलेल्या इरल्याच्या पागोळ्या माझ्या डोळ्यांपुढून ओघळत होत्या. मी माझं काम विसरून गेलें होतें. भाग्यामागोमाग इतर सासरेवाशिणींनीहि आपआपल्या घोवांचीं नांवं घेतलीं आणि तीं सारीं नांवं मी जिवाचा कान करून ऐकत स्तब्ध उभी राहिलें. बघतांबघतां नांवं मागं पडून कोडेवजा उखाण्यांना सुरुवात झाली.

" काय मा, शेपटीनं किरडू बिळांत जातां ?—सांगा गो. "

" अगे ! नाकांतला मोती ( नथ ) "— उत्तर मिळलं.

" आराची कौठा बारा, सा सुकी नि सा वोली—सांगा गो." दुसरा उखाणा पुढं आला.

" हात्त्येच्या ! काय मा, वरीसाचे बारा मयने–सा वोले नि सा सुके."

हिरीरीनं उखाणे घातले जात होते व तितक्याच हिरीरीनं उत्तरंहि मिळत होतीं. हातांतली पेंढी संपवून शेवटीं भागं ताठ उभं राहिलं. आपली भेकऱ्यासारखी भिरभिरती नजर विजयानं एकदा सर्वांवरून फिरवून त्यानं उखाणा घातला—" सांगा गो, माझा बयाणा :

घरतीची केली आरती
सूर्यचंद्राच्या केल्या वाती
आनि शंकराला वोवाळाय गेली
तवा पार्वती उभी गो कशावर व्हती ?"

सर्व जणींनीं डोस्कीं खूप खाजवलीं पण उत्तर सांपडेना. बायकांतून उडालेला उखाणा जोत्यांच्या टकोऱ्यावर स्वार झाला. पण उत्तर गवसेना. दिवेलागणी होतां होतां लावणी आटोपली. विजयानं फुगलेलं भागं इतर पैऱ्यासंगं घरीं गेलं आणि इकडे माझं डोकं मात्र त्या उखाण्यानं पोखरायला सुरुवात केली.

रहस्य म्हटलं कीं माझी तहानभूक अजूनसुद्धां हरपते. एखाद्या अजाण, हट्टी मुलाला आवरावं तसं मी समजूं लागल्यापासून माझ्या मनाला आवरत आलें आहे, पण त्या वेळीं मात्र मी भाग्याच्या पुरतीच आहारीं गेलें होतें. भाग्यानंहि त्याचा चांगलाच फायदा घेऊन मला वर्ष सहा महिने तरी झुलवली होती.

भाग्याचा पायरव लागला रे लागला कीं मी प्राण पणाला लावून त्याच्याकडे धावत जायची. भागं मुद्दामच मला हुलकावण्या द्यायचं. मी अगदींच काकुळतीला आलें कीं म्हणायचं, " काय मा बाब्री, कालधरन गला सुकलाय गो, पोरग्या. जा, पल, चार पोफला नि बचाकभर पाना घेऊन ये—"

त्याच्या आज्ञेसरशीं मी त्याची मागणी पुरी करीत असे. वस्तु हातांत पडतांच कांहीं तरी बहाणा करून भागं पोबारा करी. मी कांहींहि कामं करीत

असलें तरी माझे कान डोंगरउतारावर वाजणाऱ्या पावरीचा वेध घेत असत. ही पावरी वाजवणाऱ्या गुराख्याच्या मागोमाग भाग्याचीं शेलडं येत. शेलडांच्या गळ्यांतील घुंगर किणकिणूं लागले कीं मी भाग्याची वाट आडवून व त्याची खंडणी घेऊन मोक्याच्या जागीं उभी राही. इतर जांगळी व शेलडं जरा पुढं गेलीं कीं भागं मला एका बाजूला भेटे. मी आणलेल्या वस्तु हक्कानं घेई व पुढील वेळेसाठीं वस्तूंची मागणी करी. त्याची प्रसन्न मुद्रा पाहून मी मला सुचलेलं उखाण्याचं उत्तर सांगण्याचा धीर करी—" सूर्याचे किरण फाकले होते, त्यावर उभी राहून पार्वती शंकराला ओवाळीत होती. होय ना गो भाग्या ?"

" काय मा बाबी ! अगो, धरती पार्वतीच्या हातांत नि त्यांत सूर्य चांद ठेवलेला. मग कशी गो ती किरणांवर उभी ऱ्हायेल ?" भागंच मला उलट प्रश्न विचारी व मी गोंधळलेली पाहून मला त्या उखाण्याचा इतिहास सांगे. " काय मा बाबी, मुंबईत आमी गिरणींत जायचों नव्हं ? तथं आपल्या सदूभटासारखे मोठमोठे भट पंचांग काढून बसले तवा या बयाण्याचा उत्तर सांपडला हाय ठावा."

भागं सांगत असलेला हा इतिहास ऐकतांना माझ्या डोळ्यांसमोर गिरणीचं चित्र उभं राही. तें असं—विशाल मंदिराच्या सभागृहाप्रमाणं—एखादं ऐसपैस दालन म्हणजे गिरणी. तिथं सदूभटाप्रमाणें विद्वान् शास्त्री-पंडित पोथ्यापुराणं घेऊन बसलेले असावेत. पण अशा या गिरणींत भागं काय काम करत असावं हा प्रश्न तसाच शिल्लक राही. भाग्याच्या तोंडून बाहेर पडणारं गिरणीचं वर्णन ऐकतांना आश्चर्यानं वासलेला आ मिटून त्याला प्रश्न विचारण्यापूर्वीच ते हातांतील निगडीची काठी हवेंतल्या हवेंत फटकारवीत, धूम ठोकी व दुरूनच ओरडून मला सांगे–" दुकानदारणीच्या समद्या वर्ण्यांचा शेलडांनीं फडशा पाडलेनी गो ऽऽ पोरग्या– "

माझ्या नादीं लागल्यामुळं भाग्याला दुकानदारणीच्या शिव्या कशा खाव्या लागल्या याचं वर्णन तें पुढील भेटींत रंगवून करी व माझ्याकडून दुप्पट वस्तु उपटी.

आईला हे सर्व दिसत होतं, कळत होतं, पण वळवतां मात्र येत नव्हतं. कोणत्याहि वस्तूला हात न लावतां स्वतःला हवी असलेली प्रत्येक वस्तु

भागं माझ्याकरवीं लांबवीत होतं. कुंपणानंच शेत खायला सुरुवात केल्यावर बिचारी आई तरी काय करणार? अखेर आईनं मुंबईला माझ्या वडिलांना पत्र लिहिलं कीं 'भाग्याच्या नादीं लागून बाबी बिघडत चालली आहे. पूर्वीप्रमाणं आतां ती माझ्या हातांत राहिलेली नाहीं. तरी तिला लवकर तिकडे घेऊन जा—'

आईच्या पत्राप्रमाणें वडील मला मुंबईला घेऊन आले. त्या वेळीं मुंबईत मी माझ्या आत्याकडे राहात होतें व भेटेल त्याला भाग्यानं घातलेला उखाणा घालून त्याचं उत्तर विचारीत होतें. माझ्या डोक्यांत शिरलेलं तें वेड काढून टाकायचा ताईनं अखेर निश्चय केला. कादंबरी वाचणं म्हणजे महापाप आहे, हा माझ्या मनांत पक्का झालेला समज तिनं हळूहळू काढून टाकला. तिच्या मार्गदर्शनाखालीं मीं कितीतरी उत्तम उत्तम कादंबऱ्या वाचल्या. समर्थ–सदनाच्या गच्चींत बसून कधीं संधिप्रकाशांत तर कधी रात्रीच्या चांदण्यांत ताईनंच मला रसाळ काव्यांनीं न्हाऊंधोऊं घातलं आहे.

घडलेल्या गोष्टीला आतां पंचविसांहून जास्त वर्षे होऊन गेलीं आहेत. पण तरी अजूनहि 'शंकराला ओवाळायला गेली तेव्हां पार्वती कशावर उभी होती ?' हें मला कळलेलं नाहीं. मी कोंकणाचा पर्या सोडून मुंबईच्या दर्याकिनारीं आलें. ताईच्या न्हाण्याधुण्यांनीं बरीच सुधारलेंहि, पण तरीसुद्धां या रहस्याचा मागोवा घेण्यासाठीं अजूनहि जीव आसुसतोच.

जी गत रहस्याची तीच गत भाग्याची. कांहीं कांहीं व्यक्तींचे दुर्गुण आपल्याला दिसत असले तरी त्या व्यक्तींचा मोह मात्र आपल्याला आवरतां येत नाहीं, नाहीं का ?

लग्न होऊन मी सासरीं गेलें तेव्हां भागं संसारांत चांगलंच गुरफटून गेलं होतं. माझं सासर खूप दूर असल्यामुळं वरचेवर माहेरीं येणं मला जमत नसे. पण मी गांवीं आल्याचं समजतांच, संसारांतल्या अडचणींत तें कितीहि गुरफटलेलं असलं तरी वेळांत वेळ काढून मला भेटायला धांवत यायचं. आई म्हणायची, "आगो, तूं त्याच्यासाठीं भेटीच्या मोटल्या आणतेस ना ? म्हणून तें तुझ्याकडे धाव घेतं हो ! आम्हांला मात्र सहासहा महिन्यांत तोंड दाखवत नाहीं."

आईचं म्हणणं खरं होतं. तें आशेनं मला भेटायला येई. पण रिकाम्या हातानं कधींसुद्धां येत नसे. तवस ( मोठी जून काकडी ), कोहाळा, कणगं, कारिंदं, जांभीच्या त्रिया– हाताशीं मिळेल ती भेट माझ्यासाठीं अगत्यानं घेऊन येई. मला व माझ्या मुलांना कुरवाळून कुरवाळून भोळ्याभावड्या, अडाणी प्रेमाचा माझ्यावर वर्षाव करी. त्या उमाळ्यापुढं मीं शहरांतून आठवणीनं त्याच्यासाठीं आणलेल्या भेटी थिट्या वाटूं लागत.

संसार करून करून भागं आतां थकलं होतं. म्हाताऱ्या तुकारामाला दम्याचा विकार जडला होता आणि मुख्य म्हणजे आपल्या ऐन जवानींतल्या लेकासुनेशीं भाग्याचं बनत नव्हतं. काडीला काडी जोडून उभा केलेला संसार भाग्यानं सनेच्या हवालीं केला व तें परत बामणवाडींतील जातळी, वायनावर खपू लागल. स्वतःच्या घरांतच वायली ( निराळी ) चूल करून मिळणारा कण्याकोंडा शिजवून आपलं व म्हाताऱ्या घोवाचं पोट भरूं लागलं. काबाडकष्ट उपसून त्याचं शरीर आतां थकलं होतं. आपलं व म्हाताऱ्याचं पोट भरतां भरतां दिवस अपुरा पडे. पण मी आलेली कळलं म्हणजे मात्र तें वठूं लागलेलं झाड पुन्हा एकदा आपसूक मोहरे, तारुण्यांतल्या जोमानं नाचे, गाई.

आत्तांहि तें हातांतल्या कामाचा खोळंबा करून माझ्याशीं मनसोक्त गप्पा मारीत बसलं होतं. अखेर मींच त्याला हटकलं—" अगो, आतां तोंड थांबव. हात चालूं देत. आईला सांच्याला तांदूळ हवे असतील. "

कोपऱ्यांतलं मुसळ घेऊन भाग्यानं करडीवर फार घालायला सुरुवात केली व मी विटाळलेलं लुगडं बदलण्यासाठीं माजघराकडे वळलें. तोंच आईनं मला खूण करून पडवींतच पत्रावळी लावत बसायला सांगितलं. पत्रावळी लावण्याच्या निमित्तानं भाग्यावर लक्ष ठेवायचं काम फार दिवसांनीं पुन्हा मला करावं लागत होतं.

• • •



यमदूत

९३०९९

# ७ : यमदूत

कोंकणचं नांव निघालं कीं लोकांना हापूसच्या आंब्याआधीं, काप्या, बरक्या फणसाआधीं, आठवण होते ती भुतांची आणि सापांची. शहरचे सरांस सारे लोक सगळ्याच जीवाणूंना साप म्हणत असले तरी सारेच कांहीं साप नसतात. जीवाणूंच्या कितीतरी जाती आहेत. आर (अजगर), अघेलं, नाग, सर्प, अक्करमाशी, घणस, वयाळा (पाणसाप), रात, कांडर, सर्पटोळी, मण्यार, फुरसं असे अनेक प्रकार आहेत. या सर्वांपासून माणसाला धोका आहे. यांतील बरेच जण धक्का लागला तर दावा धरतात. कांहींजण ठराविक वेळेपुरताच दावा धरतात. कांहीं जीव मर्यादित जागेपर्यंतच दावा धरतात. आघेलं आदित्यवारीं धक्का लागला तरच दावा धरतं. सगळ्यांत वाईट अक्करमाशी. हा जीव सर्प व अघेलं अशा विजातीय जोडप्यापासून जन्माला आलेला असतो. आर प्राण्यांना अख्खाच्या अख्खा गिळतो. त्यानं गिळलेला प्राणी त्याच्या पोटांत बेशुद्ध पण जिवंत असतो म्हणे !

अशाच एका आराची एक गोष्ट सांगतात ती फार मजेशीर आहे. एक शेतकरीण एकदां आपल्या दोन मुलांसह शेतावर गेली होती. शेताच्या कडेला असलेल्या खोपींत तिनं आपल्या दोन्ही मुलांना बसवलं. दोघांच्या हातांत एक एक भाकरीचा तुकडा दिला. थोरल्या चार वर्षांच्या चेडवाला धाकट्या दीड वर्षांच्या पोरग्याला सांभाळायला सांगून ती बाई बाजूच्या शेतांत काम करूं लागली. बाई दूर जाताच खोपीच्या वळचणीला लपलेला आर पुढें आला व त्यानें त्या धाकट्या पोराला पकडून हळूहळू गिळायला सुरवात केली. घाबरल्यामुळें तें मूल बेशुद्ध झालं. त्याला रडायलाहि फुरसत मिळाली नाहीं. जवळच असलेलं थोरलं चेंडू मात्र रडत रडत मोठमोठ्यानं ओरडत होतं. "आये! गिललान् गे गिललान्, समदाच गिललान्."

बाईला वाटत होतं कीं धाकट्या पोरग्यानं भाकरीचा सगळा तुकडा एकदम गिळलान्. ती जागेवरूनच ओरडून सांगत होती. " गिळलान् त गिळूं दे गो बाला. " पण चेडवानं रडून आकान्त केला तेव्हां हातचं काम टाकून ती काय प्रकार आहे तो पाहायला खोपींत आली. तोंपर्यंत आरानं सबंध पोरगं गिळून टाकलं होतं व सुस्तावलेला तो धीरे धीरे बाहेर पडत होता. झट् सारा प्रकार बाईच्या लक्षांत आला. तिनं पटकन् त्या धूडाच्या खालच्या जबड्यावर एक पाय भक्कम रोवला व वरचा जबडा दोन्ही हातांत पकडून टराटर शेपटीपर्यंत फाडत नेला. थोड्या उपचारानंतर त्या धाडसी बाईचं पोर शुद्धीवर आलं म्हणे. आरानं कोंबडी, बकरी गिळल्याच्या गोष्टी बरेच वेळां कानावर येतात. वरीलप्रमाणें धाडसाची बातमी क्वचितच ऐकावयाला मिळते. ऐकूं येते तेव्हां बहुतकरून धाडस व्यक्ति धनगर, धनगराचा पोर किंवा धनगरीणच असते. धनगर म्हणजे वनचा राजा. ही जात फार शूर, पण तितकीच अडाणी. कोंकणच्या भाषेंत ' धनगरी याड ' प्रसिद्ध आहे.

आर हा जीव मुळांतच फार सुस्त असतो. अवजड शरीरामुळें त्याला सर्पाप्रमाणें सणकन् जातां येत नसावें. मागें एकदां आमच्या गुदामांतल्या शेतांत भातकापणी चालली होती म्हणे. कापणीसाठीं आलेल्या पैऱ्यांना आराचं धूड एका मळींत पसरलेलं दिसलं, ती मळी वगळून पैरी नेहमींच्या संथपणानं इतर मळ्यांतील भात कापूं लागली. पैऱ्यांनीं दुपारीं भाकरी-तुकडा खाल्ला तरी आर आपला त्याच मळींत पडलेला होता. अखेर गांवकऱ्यांनीं बंदुकीच्या गोळ्या घालून त्याला ठार मारला. आराचं मेलेलं तें धूड पांच-सहा गड्यांना सुद्धां उचलवत नव्हतं. नंतर तो आर शिजत घालून त्याचं तेल काढण्यांत आलं. हें तेल इसाब ह्या त्वचेच्या रोगावर फार गुणकारी असतं असं सांगतात. मारलेल्या वाघाची जीभ मुद्दाम स्पिरिटमध्यें घालून ठेवतात. तीहि कोणत्या तरी असाध्य रोगावर असाच जालीम गुण देते. कुरल्याचं तेल लावलं असतां बरी न होणारी खरूज हां हां म्हणतां सुकते. कुरल्या म्हणजे खेकडे.

मालांडू, दुतोंडें हे जीव माणसांना चावल्याचं ऐकिवांत नाहीं. मांजरीचीं पिल्लें, उंदीर, बेडूक ह्यांच्यावर मात्र ह्या जीवांचा डोळा असतो. जीवाणूंचा मागोवा घेण्यांत व त्यांना आडवून मारण्यांत मांजर फार मदत करतं.

मांजरीचीं पिलं लहान असेपर्यंत त्यांना घारीपासून फार सांभाळावं लागतं. या घारी कोंबडीहि पळवतात. कोंकणांत हुमण नांवाचा एक पक्षी असतो. ह्या पक्ष्याला दिवसां मुळींच दिसत नाहीं. रात्र झाली कीं ह्याचं उजाडतं. ह्याला मांजरें फार आवडतात. हुमण मांजराचे प्रथम डोळे फोडते. एकदां आम्हीं एक मांजर हुमणाच्या तावडींतून सोडवलं. पण डोळे गेले असल्यामुळें बिचाऱ्याला पुढील सारं आयुष्य अगदीं असह्य झालं. त्यापेक्षां त्याच वेळीं हुमण त्याला खाऊन टाकता तरी बरं झालं असतं, असं मग आम्हांला वाटूं लागलं.

मालांडू, दुतोंडें हा जीव बघूनच माणसांची गाळण उडते. त्या मानानं कांडर हा जीव फारच लहान असतो. हा जीव चावत नाहीं तर लांबूनच नुसती फुंक मारतो. पण ही फुंकर इतकी विषारी असते कीं वेळेवर योग्य औषध न मिळाल्यास मृत्यु येतो. घणसहि प्राण्यांना फुंकतोच म्हणे. घणसांच्या दोन जाती आहेत. एक कांबळ्या घणस व दुसरा ढाण्या घणस. ढाण्या घणसाच्या अंगावर पांढरट-पिवळसर, तर कुठें पांढरट तपकिरी रंगाची ढाण म्हणजे चौकोन असतात. घणस जाड व लांबलचक असतात. मीं ढाण्या घणस पाहिलेला आहे; पण कांबळ्या घणस मात्र पाहिलेला नाहीं. हा जीव तेजःपुंज व भयानक गंभीर असतो. ह्याच्या सर्व अंगावर सोनेरी केस असतात. ह्याला दैवी अवतार समजतात. हा घराण्याचा मूळ पुरुष व वंशाचा राखणदार असल्याचं मानतात. हा सहसा कुणाला दर्शन देत नाहीं. फक्त पुण्यवान् लोकांनाच हा आढळतो. घणस सर्प ह्या जीवांनीं घातलेली शीळ कोंकणांत बऱ्याच वेळां ऐकूं येते. मला जीवाची शीळ ओळखतां येत नाहीं. त्याचप्रमाणें ती अमक्याच जीवाची आहे हेंहि कळत नाहीं. मग मी एस्वदाकाकूला सांगून ठेवतें, ' जीव शीळ घालायला लागला कीं मज सांग हो गे. '

आमची ही काकू जीवांचे प्रकार, आवाज ओळखण्यांत मोठी पटाईत आहे. जीव मारण्यांतहि तशीच धाडशी. तिच्या हातांतील काठीचा नेम कधीं म्हणून चुकायचा नाहीं.

रात हा जीव कांडरासारखाच लहानसर असतो. ह्याला मारल्यावर काकू तो उलटा करून त्याचे पोटावर असलेले प्रहर मोजते व मग हिशेब करून

तो चावल्यापासून किती प्रहरांनीं मृत्यु ओढवतो तें आम्हांला सांगते. कांहीं जीवांची टकली चेंचून, जबडे फाडून त्यांचे विषारी दांत, त्यांच्या नरड्यांत असलेली निळ्या जांभळ्या रंगाची विषाची पिशवी आम्हांला दाखवते. काकू सांगते, बहुतेक सारे जीव अंडीं घालतात. थोरले थोरले जीव झाडांच्या ढोलींतून अंडीं घालतात. ज्या वृक्षांच्या ढोलींत जीवांचीं अंडीं असतात त्यांवर पक्षी बसत नाहींत, घरटीं बांधत नाहींत. पक्ष्यांचीं घरटीं असलेल्या वृक्षांवर जेव्हां जीव चढतात तेव्हां पक्षी रात्रीं अपरात्रीं सुद्धां जो आक्रोश करतात तो ऐकवत नाहीं.

सर्पटोळी हा जीव अंगानं बारीक पण लांबलचक असतो. ह्या जीवाचा रंग पोपटी हिरवा असतो. हिरव्यागार झुडपांत अगर गवतांत बसला असतां हा जीव पटकन् ओळखतां येत नाहीं. सर्पटोळी शरीराला इतर कुठें दंश न करतां बरोबर टाळूवरच उडी घेते व टाळूला भोंक पाडते असं सांगतात. असा प्रकार कुठें प्रत्यक्ष घडल्याचं मात्र ऐकलेलं नाहीं.

एक कांबळ्या घणस सोडला तर बाकी सर्व जीव मी जवळून प्रत्यक्ष पाहिलेले आहेत. सर्वच जीवांचे डोळे पाणीदार नि तेजस्वी असतात. ते आपल्याकडे रोखून पाहूं लागले कीं त्यांच्या लुकलुकणाऱ्या तेजस्वी डोळ्यांचं आकर्षण वाटतं. सर्प, सर्पटोळी, मण्यार, घणस हे जीव मोहक असतात. रानावनांतून हे आपल्या समोर येतात तेव्हां आपण फार घाबरलेलों असतों. त्यांच्या आकर्षक सौंदर्याचं निरीक्षण करायच्या स्थितींत आपण त्या वेळीं नसतों. पण मागाहून त्यांचं रूप आठवलं कीं संधि दवडल्याची चुटपूट लागते.

सर्व जीवांत मण्यारीचं सौंदर्य अवर्णनीय असतं. मण्यारी विविध रंगांच्या असतात. अंगच्या मूळ रंगावर खुलून दिसतील अशा दुसऱ्या रंगाचे बारीक गोल ठिबके मण्यारीच्या साऱ्या शरीरावर असतात. इथें गुजरातेंत ‘बांधणी’ नांवाच्या एक प्रकारच्या साड्या मिळतात. त्या दिसल्या कीं मला पटकन् मण्यारीची आठवण होते. हा जीव जाडीला बेताचा व भरपूर लांब असतो. डोळे चुकचुकीत पाणीदार असतात. उन्हाळ्यांत आगराला पाणी लावल्यामुळें ज्या कोठ्या (मळ्या) गार झालेल्या असतात त्या कोठ्यांतून मण्यारी

दुपारच्या वेळीं विसांवा घेत पडलेल्या आढळतात. ह्या क्वचितच चावतात. पण ह्यांची सांवली पडायची भीति मात्र फार असते. आगर, परसूं, परडे ह्यांतून ह्यांचा वावर असतो. लांबलचक शरीरामुळें मण्यारी वृक्षावृक्षांवरून सतत फिरत असतात. अशा वृक्षांखालून जाणाऱ्या येणाऱ्यावर जर ह्यांची सांवली पडली तर तो ह्यांच्या छायेखालीं येणारा प्राणी कांहीं वेळांतच मरण पावतो. पण प्रथम त्याच्या पोटांत पेटका उठतो व उलट्या सुरू होतात. अनुभवी लोक समजतात कीं सांवली पडली असावी. खात्री होण्यासाठीं मग त्या व्यक्तीला कसल्याशा पाल्याचा रस काढून पाजतात. खरोखरच, सांवली पडली असेल तर तो रस ती व्यक्ति बिनतक्रार पिते व पचवते, पण सांवली न पडतां पोटांत दुखण्याचं व उलट्या होण्याचं दुसरंच कांहीं कारण असेल तर तो रस पिणं अशक्य असतं व बळेंबळें पाजलाच तर लगेच तो उलटून पडतो. मांजर, कुत्रीं अगर ढोर ह्यांच्यावर सांवली पडली असल्यास त्यांनाहि हाच रस चमच्यांनीं अगर घोट्यांतून ( घोटं म्हणून जें गुरांना औषध पाजण्यासाठीं बांबूच्या पोकळ पेराचं मुद्दाम बनवलेलं असतं ) पाजतात. अशा प्रकारें सांवली पडल्याची खात्री पटतांच योग्य तो औषधोपचार केला जातो व हळूहळू बाधा झालेल्या प्राण्याला उतार पडतो.

फुरसं हा जीव फार वाईट. ह्या जीवाचं नुसतं नांव घ्यायला सुद्धां शेतकरी लोक धजत नाहींत. ह्यानं दंश केला म्हणजे म्हणतात, " पायाखालीं लागलं." हा भयंकर जीव फारच लहान म्हणजे काडू ( गांडूळ ) पेक्षां थोडा मोठा असतो. रंगानेंहि काडवासारखाच मातट असतो. त्यामुळें पटकन् दिसूं शकत नाहीं. ह्याला धक्का लागला असतां त्याच शेतांत असेपर्यंत हा दावा धरतो. दुसऱ्या दिवसापर्यंत सर्वांच्या हातून सुटून जिवंत राहिलाच तर आदल्या दिवशींचं वैर विसरून जातो. हा आढळला तर कोणीसुद्धां त्याला जिवंत सोडीत नाहीं. हा चावला कीं मनुष्याचा पुनर्जन्म होतो. 'पायाखालीं लागलेली ' व्यक्ति जगली तरी पुन्हां पहिल्यासारखी ती सशक्त होऊं शकत नाहीं. दुबळीच राहते. 'पायाखालीं लागल्यावर' त्या व्यक्तीला डोलींत घालून घरीं आणतात. विकारापासून मुक्त व्हायला बरेंच दिवस लागतात. पथ्यहि फार असतं. विकार पूर्ण बरा होईपर्यंत घरांत दळाकांडायचं नसतं. न्हात्याधुत्या बाईनं समोर जायचं नसतं. कांकणांचा ( बांगड्यांचा ) आवाज

होऊं द्यायचा नसतो. तळसाण करायची नसते. त्या व्यक्तीच्या खाण्यांत तर खूपच पथ्य असतं म्हणे. 'पायाखालीं लागलं' कीं त्या व्यक्तीच्या साऱ्या अवयवांतून रक्त वहूं लागतं असं सांगतात. हगामुतायला रक्त होतं. थुंकींतून रक्त पडतं व अंगाला जो घाम येतो तोहि रक्ताचाच. ह्या विकाराला फार जपायचं असल्यामुळें जवळ जायला अगर दुरून बघायला ( पेशंटला ) परवानगी नसते. असल्या विकारांवर औषध देणारे–मंत्र घालणारे मांत्रिक ठरलेले असतात. हे सगळेजण अशिक्षित, कुडवाळीच असतात; पण ह्यांच्या हातगुणानं उतार पडल्यावांचून राहात नाहीं. आमच्या तिकडे असल्या विकारांवर डॉक्टर–वैद्यांचा सल्ला घ्यायच्या कुणी भानगडींतच पडत नाहीं. मांत्रिक झाडपाल्यांच्या मुळ्या देतात आणि त्यांनींच गुण येतो.

पावसाळा सुरू होऊन शेतीचीं कामें सुरू झालीं कीं गांवागांवांतून असे प्रकार बरेच घडतात. मांत्रिकांना बोलावण्यावर बोलावणीं येतात. निरोप आला कीं हातांत घांस असला तरी सुद्धां तो तोंडांत न घालतां मांत्रिक उठून बोलावल्या ठिकाणीं जातो. मांत्रिकानं कोणत्याहि प्रकारानं मोबदला घ्यायचा नसतो. अख्ख्या गांवांत मिळून एखाद दुसराच मांत्रिक असतो. मांत्रिकाला कडक अशीं बरींच पथ्यं जन्मभर पाळावीं लागतात. जो तीं पाळत नाहीं त्याच्या हाताला गुण येत नाहीं.

तशीं कांहीं हटकून गुण देणारीं आवश्यक पाळं, मुळं प्रत्येक शेतकऱ्याच्या चंची, बटव्यांत नेहमींच असतात.

नागाचं माणसाशीं असलेलं नातं जगप्रसिद्धच आहे. नाग काळपट, राखाडी रंगाचा असतो. नागाला पाहिल्यावर तो पोक्त, गंभीर व मायाळू असावा असं वाटतं. नाग, साप हे अंगानं थोडे जाडच; पण त्या मानानं लांबीला आंखूड असतात. नाग मंद गतीनं जातो, तर साप सणकन् नाहींसा होतो. हे दोघेहि गानलुब्ध असतात. दोघेहि फणा करतात. दोघांच्याहि फण्यावर आंकडा असतो. साप रंगानं पिवळाजर्द व नागापेक्षां रागीट असतो.

केव्हां कुठेंतरी धक्का लागल्याचा दावा धरून सर्प पाठलाग करत बरेच वेळां येतात. जीव असा पाठलाग करत असलेला आढळला कीं गांवच्या शंकराला नारळ बोलायचा असतो. दहींभाताचा नैवेद्य दाखवायचा असतो.

मांत्रिकाजवळून मंतरलेले तांदूळ घेऊन ते आपल्या धोतर, उपरणं, पदर ह्यांच्या शेवाला गांठ मारून जवळ बाळगायचे असतात. घरादारांत, परसूं-परड्यांत फेंकायचे असतात. असं केल्यानं सर्प नाहींसा होतो. म्हणजे वैर सोडून निघून जातो. नागा-सापाला सहसा कुणी मारीत नाहीं. कुणी मारला तर त्याचं भलं होत नाहीं.

केव्हां केव्हां घरांत वावरणाऱ्या उंदरा-बेडकांचा अगर इतर जीवांच्या लोभानंहि साप घरांत येतात. आपण एकटेदुकटे रानाशिवारांत गेलों असतांना आपल्याला आढळतात. त्यांना पाहून आपण भितों व आपल्याला ते भितात. दोघांनाहि आपआपला जीव हवा असतो. माणूस घाबरलेला दिसला किंवा सापाला मारणार असं वाटलं तर तो फणा उगारतो व ती नाहीं, नको अशा अर्थानं डोलवून आपल्याला अभय देतो. अशा वेळेला त्याची खोड न काढतां आपण त्याच्या मार्गांतून दूर व्हायचं असतं.

सापाला ब्राह्मण मानतात. कधीं काळीं त्याला मारलाच तर त्याला अग्नि द्यावा लागतो. अग्नि देतांना त्याच्या गळ्यांत जान्हवं व तोंडांत (जबड्यांत) तांब्याचा पैसा ठेवतात. शरीर जळून गेल्यावर राखेच्या ढीगांत सर्पाचीं हाडं (ह्यांनाच मणके किंवा मणी म्हणतात) सांपडतात; पण जळून गेल्यामुळें त्या मण्यांतील गुणदोष नाहींसे झालेले असतात. सर्पाच्या असल्या मण्यांची माळ, घशाला गंडमाळा हा रोग झाला असतां गळ्यांत घालायची असते. या औषधि माळेसाठीं मण्यांची जरुरी असते तेव्हां मारलेल्या सापाला न जाळतां बांबूच्या पोकळ फुंकणींत भरतात व ती फुंकणी खोल खड्डा काढून पुरून ठेवतात. वर्षानं फुंकणी बाहेर काढतात तेव्हां मांस सडून धुपून गेलेलं असतं व सर्व मणी एका रांगेंत सुरक्षित असतात. मग त्या मण्यांची माळ करून सांठ्यांत ठेवतात.

एक म्हातारा कुळवाडी आपल्या एकुलत्या एक तरण्या मुलासह आमच्या गांवांत राहत होता. एकदां काय झालं, पाणी आणण्यासाठीं विहिरीवर गेलेल्या पाणकरणीच्या मागें एक सर्प लागला. ही बातमी वाडींत कळतांच त्या सापाला मारण्यासाठीं सारे वाडकरी एकत्र गोळा झाले. त्या गड्यांना पाहून साप घाबरला व फणा नकारार्थी डोलवूं लागला. सर्पाला मारावा कीं

जाऊं द्यावा ह्याचा विचार जाणते वाडकरी करीत आहेत तोंच त्या म्हाताऱ्याच्या तरण्या मुलानं हातांतील सोट्यानं सापाला बडवायला सुरुवात केली. एकदां दुखवलेल्या सापाला जिवंत सोडणं शहाणपणाचं नसतं. सगळ्या वाडकऱ्यांनीं मिळून तो साप मारला व लाकडं, पातेरा, गवत घालून ते त्याला जाळूं लागले. पण अग्नि कांहीं केल्या पेट घेईना. धुमसणाऱ्या विस्तवाला फुंकर घालण्यासाठीं म्हाताऱ्याचा लेकच पुढें झाला; पण तोंडानं एखाद दुसरी फुंकर मारतो न मारतो तोंच त्याला झेंडू ( फीट ) फुटला. औषधोपचारासाठीं धांवाधांव करण्यापूर्वी त्याचा प्राण गेला. वाडकरी म्हणूं लागले, "दावा धरलेल्या सापानं आपला जीव कोंडून धरला होता. धुरा ( हें त्या मुलाचं नांव ) इस्तूस फुंक मारण्यासाठीं ओणावल्याबरोबर सर्पानं त्यास फुंकलान." सर्पाचं व धुऱ्याचं शरीर निरनिराळ्या ठिकाणीं पण एकाच वेळीं जळून खाक झालें. पुत्रशोकाच्या धसक्यानं म्हाताराहि लवकरच आटोपला.

एक दुसरीहि अशीच गोष्ट आहे. या गोष्टी सांगोवांगीच्या नसून मीं प्रत्यक्ष पाहिलेल्या आहेत.

आमच्या गांवीं असाच एक जुना चौसोपी वाडा आहे. जुना झाल्यामुळें त्याची सगळीकडे मोडतोड झालेली आहे. अशा निर्मनुष्य जागेंतून उंदरांचं राज्य माजलेलं असतं व त्यांच्या पाठोपाठ जीवहि फिरत असतात. एकदां त्या पडीक जागेंत सर्पानं ये-जा चालवलेली घरच्या मंडळींच्या नजरेंत आली. मनुष्य दिसतांच साप नाहींसा न होतां फणा नकारार्थी डोलवून त्यांना अभय देत असे. त्या घरची मंडळीहि वरकरणीं त्याला न मारण्याबद्दलच बोलत. मुलाबाळांच्या घरांत सर्पाचं सतत वास्तव्य त्यांना तरी कसं खपावं? पिवळाजर्द रंग, फणा, फण्यावर आंकडा. ह्या ठळक खुणा नसत्या तर त्या सापाला लोक आरच समजले असते. इतका हा मोठा होता. अखेर त्या घरच्या पुरुषानें गपचूप शिकाऱ्यांना बोलावणं पाठवलं व शिकाऱ्यांनीं त्याला बंदुकीची गोळी घातली. ती वेळ सकाळीं साडेनऊ दहाची असावी. सर्पानं नुकतंच भलंमोठं अधेलं मटकावलं होतं. या जड आहारामुळें त्याला सुस्ती व जडत्व आलं होतं. घरच्या मंडळींचा विश्वास पडल्यामुळें निर्धास्तपणें तो लाकडाच्या माचाखालीं विश्रांती घेत पडला होता. बंदुकीचा नेम

स्वतःवर रोखलेला पाहिल्यावर त्यानं पळायचा प्रयत्न गेला; पण तें जड जेवण त्याला भोंवलं; गोळी वर्मीं लागताच तो अर्धमेला झाला. लांब लांब दांडक्यांनीं त्याला ओढत ढकलत माचाखालून मग उघड्या खळ्यांत आणण्यांत आलं. ओढतां ओढतां गोळी लागून झालेल्या जखमेंतून अर्धमुर्धं अधेलं बाहेर आलं. अधेल्याच्या पोटांतून बेडकाउंदरांचे अवयव बाहेर पडले. त्या एवढ्या मोठ्या थोरल्या सापाला बघायला सारखे लोक येऊन जात होते. कुणी कुणी त्याला काठी, सोट्यानं बडवीत होते; पण दिवस धारेखालीं कलला, तरी त्याचा प्राण म्हणून जाईना. एकंदर हालचालीवरून त्याला त्या यातना असह्य होत असल्याचं दिसत होतं. त्याच्या साऱ्या शरीराचा चिखल झाला होता, तरी तो प्राण पणाला लावून सारी शक्ति एकवटे व फणा उभारून ती जमिनीवर कचाकचा आपटून घेई. शेवटीं दिवेलागणीच्या सुमाराला बिचारा पूर्ण शांत झाला. आणि देतेवेळेला त्याच्या तोंडांतून रक्त ठिबकलं. सगळे म्हणाले, हा अपशकुन झाला !

त्या सापाला मारण्यासाठीं ज्या ब्रामणानं शिकाऱ्यांना बोलावलं तो बामण चार वर्षांपूर्वीं हाल हाल होऊन मेला. मृत्युपूर्वीं तीन वर्षं त्याला रक्त पडत होतं. डॉक्टर-वैद्य सर्व थकले. पण गुण आला नाहीं. मरतांना तोच स्वमुखानें म्हणाला कीं, सर्पाचे हपाप मला नडले. त्याला मुलंबाळं आहेत; पण सर्व अधू, अर्धवट आणि खुळीं. त्याच्या संसाराची अशी वाताहत व्हायला दुसरंहि कांहीं कारण असेल; पण आम्हां अंधश्रद्धाळूंना मात्र वाटतं कीं त्यानं तो सर्प मारला नसता तर त्याचा संसार व तो सुखी झाला असता.

कोणताहि जीव चावला अगर त्यानं फुंकर घातली तरी त्याचं नांव घेऊन तसं म्हणायचं नसतं. कधीं कधीं साधा उंदीर चावल्यानं सुद्धां प्राणावर बेततं. तेव्हां म्हणायचं असतं, 'आढ्यांतला चावला.' सर्पानं दंश केला तर म्हणायचं–'थोरला चावला.' 'थोरल्यानं फुकलान' म्हणजे कांबळ्या घणसानं. 'मजवेल्यानं फुकलान' म्हणजे ढाण्या घणसानं आणि 'धाकट्यानं फुकलान' म्हणजे कांडरानं फुंक मारलीन. अशी ही सांकेतिक भाषा वापरायची असते. कोंकणांत जिथें तिथें या यमदूतांशींच संबंध येतो तर ह्यांना भिणार तरी किती ? आणि स्वतःला जपणार तरी किती ? ह्या

जीवांनीं टाकलेली आपली मेंग ( कात ) रानावनांत बरेच वेळां आढळते. एखादा जीव शिवारांत आपोआप मरून पडतो. मग त्याचं शरीर उंत्रील (एक प्रकारचे लाल मुंगळे) अगर कावळे खाऊन टाकतात. किंवा तें उन्हांत सुकून अगर पावसानं सडून जातं; व आंतील मणी इकडे तिकडे सर्वत्र पसरतात. ह्या मण्यांवर पाय पडला असतां विषबाधा होते. पुष्कळ वेळां जीव गवतावर, धोंडीवर असे कुठेंतरी गरळ (लाळ) ओकून ठेवतात. च्चार कापतांना अगर येतां-जातांना ती गरळ सहज आपल्या हातापायांना लागते. जिथें गरळ लागली असेल तो भाग मग फेणारतो. म्हणजे त्या भागावर मोठमोठे विषारी फोड येतात. पाय फेणारले तर आपणाला हालणं अशक्य होतं. सर्व व्यवहार जागच्या जागीं करावे लागतात. मंतरलेल्या पाण्यानं व झाडपाल्याच्या औषधानं लवकरच हे विकार बरे होतात.

कोंकणांत चोराचिलटाचं फारसं भय नाहीं. चोऱ्या होतात त्या शेता-भातांतून व आगराडोंगरांतून. शेतांतून धान्य, फळं, भाज्या चोरीला जातात. आगरांतून आंबे, फणस, सुपाऱ्याचीं शिपटं व फुलांची चोरी होते. डोंगरा-शिवारांतून झाडं तोडून पळवलीं जातात. सजीव प्राण्यांची चोरी पचत नाहीं. कोंबडीं, कुत्रीं, मांजर व ढोर हीं चोरून नेलीं तरी संधि मिळतांच पळून पहिल्या घरीं परत येतात. चोरी करण्यासारखं दरिद्री कोंकणांतील घरांत कांहींच नसतं. चांदी, सोनं, रतन, हिरा, माणिक हीं नांवं मुख्या जनावरानांच ठेवलेलीं आढळतील. क्वचित् कुठेंतरी एखाद्या सावकाराच्या घरावर दरोडा पडलेला ऐकिवांत येतो, इतकंच.

चोरादरोडेखोरांचं भय नाहीं तेव्हां मनुष्यानं अगदींच निर्भय, मोकाट जीवन जगूं नये, म्हणून देवानंच कोंकणच्या रम्य निसर्गात ठिकठिकाणीं ह्या यमदूतांची नेमणूक केली असावी.

• • •

# ८ : ‘ त्याचा संकोच ’

किलकिले डोळे करून मीं मच्छरदाणीच्या जाळींतूनच बाहेर पाहिलं. नेहमींप्रमाणेंच तो ऐटींत समोर उभा होता. एकदां वाटलं कीं मच्छरदाणींतून बाहेर यावं आणि त्याचं ओसंडून जाणारं सौंदर्य टक लावून टिपून घ्यावं. पण ...? पण मग तो जर संकोचून माझ्या समोरून निघूनच गेला असता तर माझा मानभंग व निराशा नसती का झाली?

पहिली जागा सोडून ह्या जागेंत राह्यला आल्यापासून नित्य नियमानं रोज सकाळीं आमच्या गांठीभेटी होत होत्या. चोरटे नेत्रकटाक्ष आम्ही एकमेकांकडे फेकीत होतों. आमच्या जीवनांत एकदां सुरू झालेला हा लपंडाव संपायचीं चिन्हं मात्र मुळींच दिसत नव्हतीं.

आम्ही राहात असलेल्या आमच्या पहिल्या जागेंत एक-दोनदां मला त्याचं ओझरतं दर्शन झालं होतं. आणि त्या चुटपुटत्या झालेल्या दर्शनानंच माझं चित्त हरण केलं होतं. पण त्याच्या अप्रतिम सौंदर्याचं आकंठपान करायची संधि त्या घरांत कांहीं मला लाभली नाहीं. ह्या नव्या जागेंत झाल्यापासून मात्र घरामागें असलेल्या बागेंत रोज न चुकतां आम्ही एकमेकांना भेटूं लागलों होतों.

सूर्यनारायणाच्या आगमनाबरोबरच सोनसळी वस्त्र परिधान करणारीं फुलझाडं आम्हां दोघांनाहि सारखींच प्रिय होतीं. हातांत पाण्यानं भरलेली झारी घेऊन मी जेव्हां फुलझाडांच्या आळ्याआळ्यांतून जलसिंचन करीत असें तेव्हां दूर आडोशाच्या जागीं उभा राहून तो जी आपली कौतुकानं ओथंबलेली नजर माझ्यावर रोखी ती माझ्या दृष्टींतून सुटत नसे. कधीं कधीं मी बागेंत पाऊल टाकण्याआधींच तो तिथें आलेला असे. स्वच्छंदानें बागेभर मनसोक्त हिंडत असे. पण माझी चाहूल लागली म्हणजे मात्र लगेच बागेंतून काढता पाय घ्यायचा. ‘ मेला पुरुषाच्या जातीला इतका लाजरेपणा



' त्याचा संकोच '

काय कामाचा ? माझ्या वाटेंत तर यायला हवं, चोरून चोरून तर पाह्यला हवं, आणि प्रत्यक्ष मीलनाचा क्षण जवळ आला म्हणजे मात्र अंऽहं!' अशा वेळीं मग मीच आडबाजूला उभी राहून त्याचं फिरणं संपेपर्यंत त्याला डोळे भरून पाहून घेत असे.

त्याला फक्त एकच वाईट खोड होती. फुलांनीं बहरलेल्या एकाहि झाडाला तो धक्का लावीत नसे. गरगरलेल्या हिरव्यागार डेरेदार तुळशीच्या कोवळ्या कोवळ्या टिक्षा, फुललेल्या मंजिऱ्या खुडून खायची त्याला संवय होती. कुणाकुणाला अशी सवंय असतेहि, नाहीं का ? त्याच्या आवडीनिवडी जाणून घेऊन, त्याला आवडणाऱ्या वस्तु पोटभर खायला द्याव्यात असं मला सारखं वाटे. पण हें लाजाळूचं झाड माझ्यापुढं उभं राहील तेव्हां ना ?

हळूहळू अहमदाबादच्या उन्हाळ्याला सुरुवात झाली आणि आम्ही आमच्या पथाऱ्या घरांतून उचलून गच्चींत पसरूं लागलों. पहाटेचा थंड वारा मुलांना बाधूं नये व रात्रभर आमचं रक्तशोषण करणाऱ्या डांसांपासून आमचं संरक्षण व्हावं म्हणून मी गच्चींतहि मच्छरदाणी बांधूं लागलें. अशा रीतीनं मी मच्छरदाणीच्या अवगुंठनांत असल्यामुळें सकाळच्या प्रसन्न समयाला तो गच्चींत येऊन निःसंकोचपणें शतपावली करीत असे व मला आडूनच कां होईना पण त्याचं निरीक्षण करायला वेळ व एकान्त भरपूर मिळत असे. सरावानं आस्ते आस्ते त्यानंहि आपल्या संकोचाला थोडी मुरड घातली. तो समोर दिसला म्हणजे उठल्याबरोबर आधीं खालीं घरांत जाण्याऐवजीं मी या नाहीं त्या निमित्तानं वरच घुटमळूं लागलें. कुठें पथाऱ्याच गुंडाळ, तर कुठें मच्छरदाणीचीच घडी करून ठेव. मग मी वर असेपर्यंत तोहि आपला वेळ माझ्या सहवासांत घालवूं लागला. रमून जाऊं लागला. पण विधात्याला कधीं कुणाचं सुख बघवलं आहे का ?

आकाशांत मेघ गर्दी करूं लागले. उन्हानं लखलखणारं वातावरण झांकळूं लागलं. दाही दिशा उदास उदास भासूं लागल्या. निसर्गाच्या उदासीनतेचं तो जणूं मूर्तिमंत प्रतिबिंबच बनला. पूर्वीप्रमाणें तो आनंदी, उत्साही दिसेनासा झाला. आपली शून्य नजर अंतराळांत कुठेंतरी लावून तो तासन्-तास एकाच जागीं उभा राह्यचा. कधीं कधीं आर्त स्वरांत एखादं अबोध

करुणागीत आळवतांना आढळायचा. खूप प्रयत्न करूनहि मी त्याच्या दुःखाचं कारण शोधूं शकलें नाहीं; किंवा त्याला उल्हसित करूं शकलें नाहीं. त्याचं दुःख पाहून माझ्या नयनांतून झरणाऱ्या अश्रुधारा त्याला सुखवायला असमर्थ ठरल्या. पण तेंच काम मेघधारांनीं मात्र सहज लीलेनं चुटकीसरसं केलं.

मेघगर्जना करून मुसळधार जलधारा पृथ्वीवर कोसळूं लागल्या. आणि उदास बनलेला तो एकाएकी अंगांत नवचैतन्य संचारल्याप्रमाणें आपला मनमोहक पिसारा फुलवून अत्यानंदानं थुईथुई नाचूं लागला.

●●●

...ख, डॉ. ...
३७०.५... वि: ...
...२५... नों. दि. १७-८-...

# १ : ‘कवि आणि त्याचें काव्य’

वियोगी होगा पहला कवि ।
आहसे उपजा होगा गान ।
उमड़कर आँखोंसे चुपचाप ।
वहि होगी कविता अनजान ।

सुमित्रानंदन पंत ह्या हिंदींतील सुप्रसिद्ध श्रेष्ठ कवीनें वरील चार ओळींतच कवि ह्या प्राण्याची व्याख्या सांगून टाकली आहे.

आधणावर झांकण ठेवलं म्हणजे वाफ कोंडून ज्याप्रमाणें पाण्याला लवकर व खळखळून उकळी फुटते त्याचप्रमाणें विरह झालेल्या प्रिय वस्तूचं पुनर्मीलन होणं अशक्य असेल, तिच्या बद्दलचं दुःख ओरडून आरडून व्यक्त करणं शक्य नसेल, त्या दुःखाचे कढ मनांतल्या मनांत कोंडून ठेवणं भाग पडत असेल, तरच त्या मुक्या कढांतून उत्स्फूर्त काव्य जन्माला येतं !

जन्मठेपेची शिक्षा झाल्यामुळें मायभूमीच्या विरहानें तळमळणारं वीर तात्याराव सावरकरांचं मन म्हणूनच सागराला सांगूं लागलं कीं

‘ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला.’

स्वतःला झालेल्या दुःखानं, विरहानं मुके प्राणीसुद्धां रडतात. आमच्या एका म्हशीचा रेडा जेव्हां पहिल्यानंच जोताला बांधला तेव्हां त्याची आई दीनवाणीपणानं रेंकत त्या शेताच्या भोंवतीं भोंवतीं जोत सुटेपर्यंत रेंगाळत राहिली. मोन्या कळ्या तोडल्या तर त्यांच्या विरहानं झाडं, वेली सुद्धां रडतात म्हणे. मग मनुष्यासारख्या भावनाप्रधान प्राण्याची गोष्ट काय विचारावी ? फरक फक्त इतकाच कीं, कांहीं माणसांना दुःख वेळींच ओकून टाकतां आल्यामुळं त्याची दाहकता कमी होते, पण ज्यांना असं करणं जमत नाहीं त्यांचं दुःख मात्र काव्यरूपानं प्रगट होतं. कांहीं कांहीं दुःखें अशीं



' कवि आणि त्याचें काव्य '

असतात कीं, त्यांची बोचणी कमी करणं काळासारख्या धन्वंतरीलासुद्धां अशक्य असतं.

राजकवि (आतां महाराष्ट्र कविसुद्धां) 'यशवंत' यांनीं आपली 'आई' ही कविता आईच्या निधनानंतर बऱ्याच वर्षांनीं लिहिली. मातृप्रेमाला मुकलेल्या लेकराचे कढ ह्या कवितेंतून इतके खदखदून वर आले आहेत कीं, ही कविता म्हणतांना अजूनहि प्रत्येक वेळीं स्वतः कवि तर गहिंवरतातच; पण श्रोत्यांचे डोळेहि आपोआप झिरपूं लागतात.

प्रत्येक वेळीं, प्रत्येक कवि स्वतःचा अनुभव, स्वतःचं सुख, दुःख, स्वतःच्या मनांतील भावनाच आपल्या काव्यांत रंगवतो असा कांहीं सिद्धान्त नाहीं. अनुभूति मिळवण्यासाठीं कांहीं महात्मे पहिल्या काळीं परकाया-प्रवेश करीत असत. कवीलाहि दुसऱ्याच्या मनांत असाच प्रवेश करावा लागतो. कवीचं मन फार नाजुक व भावनाप्रधान असतं. तें दुसऱ्याचा आनंद पाहून बेहोष होईल, तर दुसऱ्याच्या दुःखानं ढसढसा रडेल. ज्याला परक्याच्या सुखदुःखाबद्दल स्वतःच्या भावनेइतकीच आत्मीयता वाटेल तोच खरा कवि.

'हें कोण बोललें बोला, राजहंस माझा निजला' किंवा 'मनीं धीर धरी शोक आवरी जननी, भेटेन नऊ महिन्यांनीं' ह्या कवितेंतील भावना रंगवतांना पहिल्या कवितेंत पुत्राच्या मृत्यूनं वेड्या झालेल्या मातेच्या हृदयांत कवीनं प्रवेश केला आहे, तर दुसरींत कवि फांशी जाणाऱ्या मुलाच्या मुखानं आईची समजूत घालीत आहे. कवि असं न करील तर त्याला परस्पर विरोधी भावनांचा परिपाक आपल्या काव्यांत करतां येणार नाहीं. त्याच्या निरनिराळ्या थरांतील चाहत्यांना त्याच्या काव्यांतून अनुभूतीचा आनंदहि मिळणार नाहीं. कारण कुणी एखादा भक्तिरसाचा भोक्ता असेल, तर कुणा एखाद्याला वीररसच आकर्षित करील. फक्त शृंगाररसच असा आहे कीं, शेंकडा निदान नव्वद लोकांना तरी ह्या रसांत अनुभूतीचा प्रत्यय येतो. आणि म्हणूनच हा रस सर्व रसांचा राजा म्हटला गेला आहे. ह्या रसांतहि मीलन आणि विरह असे कमींत कमी दोन प्रकार तरी पडतातच. प्रत्यक्ष अनुभव घेतांना मिळणाऱ्या सुखापेक्षां कल्पनेंतील व आठवणींतील सुखाची गोडीच अवीट असते. त्यामुळें ह्या रसांतहि विरहगीतांचाच भरणा

जास्त आढळतो. अनेक कवींच्या काव्यांत शृंगाररसालाच बहर आलेला दिसतो. लोक मात्र त्या कवीकडे तो एक प्रेमवेडा, उल्लू प्राणी अशा दृष्टीनं पाहूं लागतात. मग त्या बिचाऱ्याच्या खिशांत रमणींच्या केसांतील सुकलेलीं फुलं, त्यांच्या वेणींतून गळून पडलेले आंकडे व त्यांच्या वाढवलेल्या बांगड्यांच्या कांचांचे तुकडे कोंबले जातात! पण खरोखरच हा प्राणी इतका लाळघोट्या व लोचट आहे का? आणि खरोखर तो तसा नसेल तर, मग आहे तरी कसा?

मागें एकदां एका मासिकांत एक व्यंगचित्र आलं होतं. आकाशांत उंच गेलेल्या विमानाच्या मार्गांत एक ढग आडवा आला. त्या ढगावर आरूढलेल्या कवीला वैमानिक म्हणतो आहे कीं, 'ए कवि! हट जाव यहाँसे'. ह्या व्यंगचित्रांतील अतिशयोक्ति सोडली तर ह्यांतून प्रतीत होणारा अर्थ अगदींच कांहीं खोटा नाहीं.

कवि हा प्राणी बहुतेक वेळां कल्पनेचे पंख लावून अंतराळांत भराऱ्या मारण्यांत रममाण झालेला असतो. तो पृथ्वीला पाय लावायला सहसा तयार नसतो. पण परिस्थिति त्याला जेव्हां खेंचून खालीं आणते तेव्हां तो वास्तव्य-तेशीं समरस होऊं शकत नाहीं. आपणांत असणारं हें न्यून त्याच्या लक्षांत येतं व मग तो अधिकच गोंधळतो. क्वचित् प्रसंगीं त्याच्याकडून हास्यास्पद वर्तणूक घडते. आपल्याकडे पाहून लोक हंसत असलेले दिसतांच तो प्रथम खट्टू होतो व मग हळूहळू एकलकोंडा व मितभाषणी बनतो. मुळांतच बुजरा असणारा हा प्राणी मग जास्तच बुजरा बनतो.

कल्पनेचा आधार घेऊन तो चराचराचे भाव उकलूं शकतो. हिरव्यागार वेलीवर बसून वाऱ्याबरोबर झोके घेणारीं फुलं आपल्याला जवळ बोलावून सांगत आहेत कीं, 'जवळ ये रे! आम्हांला खुडून प्रभूच्या पूज्य चरणावर चढव. रेशमी लड्यांसारखा वेण्यावर किंवा लोकरीच्या गुंड्याप्रमाणें दिस-णाऱ्या अंबाड्यावर तरी आम्हांला मिरवूं दे. तूं आम्हांला स्पर्श केला नाहींस तर उद्यां आम्ही येथेंच निर्माल्य होऊन धूळ खात पडूं. आमचं उमलणं एवढ्यासाठींच का आहे? पण आम्ही जाणतों कीं तुझ्यासारखा हळव्या मनाचा रसिक आमची कधींच उपेक्षा करणार नाहीं. ये, लवकर जवळ ये."

या किंवा अशाच प्रकारें विश्वाच्या प्रत्येक हालचालीचा अर्थ लावणाऱ्या ह्या प्राण्याला वाटतं कीं हरएक बाबतींत बोलायची आवश्यकताच काय?

जर मी समोरच्याची इच्छा त्याच्या हावभावावरून जाणतों तर त्यानं माझ्या मनांतील भाव माझ्या चेहऱ्यावर वाचून त्याप्रमाणें कां वागूं नये? पण समोरच्या व्यक्तीला असे भाव वाचण्याची कला अवगत नसेल किंवा त्याच्या प्रत्येक भावनेला इतकी किंमत द्यायची तिची तयारी नसेल तर ती व्यक्ती त्या मुखदुर्बळाशीं तुटकपणेंच वागते. बहुतेक ठिकाणीं हाच अनुभव आल्यामुळें हा प्राणी मग कुणाविषयींच विशेष जिव्हाळा बाळगत नाहीं. कारण जिव्हाळ्याच्या व्यक्तीचं तुटक वागणं ह्याच्या जिव्हारीं लागतं. तें सहन करणं त्याला जड जातं. कोणतीहि भावना नेहमींच ह्याच्या अंतःकरणाला तीव्रतेनं जाणवते व तिचा उद्रेकहि तितक्याच तीव्रतेनं होतो. दुसरं कारण म्हणजे देहानं हा ज्या वेळीं जिथें असेल त्या वेळीं त्याचं मन तिथें असेलच असं कांहीं सांगतां यायचं नाहीं.

चर्मचक्षू सताड उघडे ठेवून हा एखाद्या पंक्तींत बसून पंचपक्वान्नांवर ताव मारत असेल. आजूबाजूला ह्याच्या परिचयाचीच मंडळी हास्यविनोद करण्यांत रंगलेली असतील. ह्याचं मन मात्र त्याच वेळीं बाहेर उष्ट्या पत्रा-वळीसाठीं भांडणाऱ्या भिकाऱ्यांचं निरीक्षण करण्यांत गढलेलं असेल. तेथें दिसलेल्या प्रकारानं मन उद्विग्न झाल्यामुळें पंक्तींत चालू असलेल्या आनंदी वातावरणाला हा साथ देऊं शकत नाहीं. इतरांकडून मग साहजिकच ह्याला शिष्ट ही पदवी बहाल केली जाते.

नित्य सरावानंच ह्याचे अवयव रोजचे व्यवसाय बिनबोभाट उरकत असतात. पण त्याच वेळीं ह्याचे अंतःचक्षू काय काय टिपून घेत असतात, मन कुठल्या कुठल्या वाऱ्या करून येतं ह्याचा ह्याला स्वतःलाच पत्ता नसतो. अशा वेळीं विचारलेल्या प्रश्नांची हा उत्तरंच देत नाहीं. खरं म्हणजे ते प्रश्न ह्याला ऐकूंच येत नाहींत. ह्याच्याकडे पाहून समोरच्या व्यक्तीनं केलेलं स्मित हास्य ह्याला दिसत नाहीं. आणि मग हा तुसडा, गर्विष्ठ, माणूसघाण्या असा ठरतो. लोकांच्या मनांत आपल्याबद्दल असलेला गैरसमज कसा दूर करावा हें न समजल्यामुळें तो स्वतःलाच कोंडून घेतो. ह्या प्राण्याला विकत श्राद्ध घ्यायची जन्मजात खोड असते. स्वतः वाळ्याच्या पंख्यानं वारा घेत पराच्या गादीवर लोळत असला तरी रस्त्यावरून अनवाणी चालणाऱ्याला पाहून स्वतःचे पाय पोळल्याइतकं हा दुःख करून घेईल. ह्याला वाटतं अखिल जगाचा निर्माता एकच असल्यामुळें सर्वांनीं विश्वबंधुत्वाच्या नात्यानं एक-

मेकांशीं वागावं. " जीवो जीवस्य जीवनम् " ह्या नात्यानं विश्वाचा व्याप चाललेला पाहून हा बेचैन होतो. असल्या ह्या अन्यायी जगाचा त्याला तिटकारा येतो. असल्या ह्या जगानं वंदनीय मानलेल्या नीति–अनीतीच्या कल्पना पायदळीं तुडवून जगावर सूड उगवायला उतावीळ होतो. पण डोक्यांत राख घालून घेतलेलं हें स्मशानवैराग्य फार काळ टिकूं शकत नाहीं. दुसऱ्याला त्रास द्यायच्या नुसत्या कल्पनेनं सुद्धां ह्याला असह्य त्रास होतो. ह्याचा पिंडच मुळीं ' सत्यं, शिवं, सुंदरम् ' चा बनलेला असतो.

सर्वसाधारण समाजाला कवि-कवयित्रींबद्दल बरीच उत्सुकता असते. मात्र ह्या प्राण्याशीं प्रत्यक्ष जन्माची गांठ पडणाऱ्या व्यक्तीला " फसलें ग बाई, सुख कपाळीं माझ्या नाहीं ! " असंच म्हणायची पाळी येते. येथें " बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी " असते. प्रिय व्यक्तीवर होणारा प्रणयाचा मारा सुद्धां चार हात लांब राहूनच होतो. ह्या प्राण्याला " जवळ-पणाचें बंधन " सोसत नाहीं. एकान्तप्रिय असणाऱ्या ह्याला स्वतःला कोंडून घ्यावं लागतं किंवा रानावनांतून एकटं भटकावं लागतं असं मात्र मुळींच नाहीं. भरलेल्या बाजारांतील गोंगाटांत, चेंगराचेंगरी होत असलेल्या रेल्वेच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत किंवा एस्. टी. बसमधेंहि ह्याला एकान्त मिळूं शकतो. आजूबाजूचं वातावरणच नव्हे, तर स्वतःचं अस्तित्व कोणत्याहि परिस्थितींत, कोणत्याहि क्षणीं हा विसरूं शकतो. आपल्या आराध्याशीं इतकं तन्मय होणं मोठमोठ्या योग्यांना तरी जमतं कीं नाहीं देव जाणे !

सदैव असमाधानी असणाऱ्या ह्या प्राण्याला दुःखीकष्टी राहण्यांतच समाधान लाभतं. त्या दुःखांनीं हा स्वतःला रात्रंदिवस धुमसत ठेवतो. अखेर एका क्षणीं ह्याच्या पिचणाऱ्या भावनांचा उद्रेक होऊन नवीन कवितेचा जन्म होतो.

दुनियेच्या सुखदुःखाचं गांठोडं डोक्यावर घेऊन भारावलेल्या आपल्या ह्या लेकराला काव्यदेवता कल्पनेच्या रम्य पंखांवर बसवून जेव्हां अंतराळांत उंच उंच घेऊन जाते, जेव्हां ब्रह्मानंदसहोदर काव्यानंदाचा आस्वाद घेतांना ह्याला जो स्वर्गीय आनंद प्राप्त होतो व जी धून लागते, तिचं वर्णन करणं माझ्या शक्तीपलीकडचं काम आहे. त्यासाठीं ' जावें त्याच्या वंशा–तेव्हां कळे ! '

• • •

# १० : ' माझ्या स्फूर्तिदेवता '

" अहो विजयाबाई ! म्हटलं एखादे दिवशीं या कीं आमच्याकडे. "

" हो, येईन कीं, न यायला काय झालं ? "

" मग केव्हां येतां ? बोला. "

" असं नक्की नाहीं बाई सांगतां यायचं; यावंसं खूप वाटतं, पण वेळच मिळत नाहीं हो. "

" हो ऽऽऽ, कविता करण्यापुढें तुम्हांला कुठला आमच्यासारखा वेळ मिळायला ? "

अधून मधून कुणा ना कुणाशीं तरी असलं किंवा अशाच अर्थाचं बोलणं होतं, आणि मला आश्चर्य वाटतं तें ह्याचं कीं, हे लोक समजतात तरी काय ? कवि अगर कवयित्री कागद पेन्सिल घेऊन सारखे टेबला-जवळ बसून काय लिहीत राहतात ? कोणत्याहि सर्वसाधारण साहित्यिकाला असं करणं जमेल असं मला तरी वाटत नाहीं. दासीप्रमाणें सांगाल त्या क्षणीं राबायला स्फूर्ति दासी थोडीच आहे ? ती आहे एक लहरी स्त्री. ती येईल तेव्हां आपल्याला गोडी-गुलाबीनं तिच्याशीं जमवून घ्यावं लागतं. एखाद्या अलौकिक कवीकडे ती कदाचित् अष्टौप्रहर राबतहि असेल, पण म्हणून कांहीं एखादा कवि फक्त आपल्या लिखाणावर पैसे मिळवून लक्षाधीश होतो अशांतला भाग नाहीं. उदरनिर्वाहासाठीं त्याला इतर कांहींतरी व्यवसाय करावा लागतो किंवा अर्धपोटीं राहावं लागतं. ही झाली मोठ्या कवींची गोष्ट, मग माझ्यासारख्या सामान्य बाईचं हो काय विचारतां ?

अधून मधून भेटणारे संपादक माझ्याकडे कथेचीच मागणी करतात. मी म्हणतें " कविता नक्की देते, पण कथा देणं जमेलसं वाटतं नाहीं. "

" कां हो ! न जमायला काय झालं ? "

" कथा लिहायची म्हणजे तास दोन तास टेबलासमोर ठाण मांडून बसायला हवं. संसाराच्या अनेक व्यापांतून इतकी सवड मिळणं मला शक्य नसतं."

" आणि कविता करायला नाहीं वाटतं वेळ मोडत? ज्याला त्याला कविता द्यायचं कबूल करतां, मुक्त हस्तानं लुटायला कविता म्हणजे सत्य-नारायणाचा प्रसाद वाटतो कीं काय तुम्हांला ?"

खरोखरच कविता मला सत्यनारायणाच्या प्रसादाइतकीच वंदनीय आहे व मुबलकहि आहे. कधीं मधीं मीं कथा लिहिल्या तरी मुळांत माझा पिंड कवीचाच असावा.

खरं सांगायचं म्हणजे मी एक साधी संसारी स्त्री आहें. संसारहि मोठा आदर्श आहे अशांतला भाग नाहीं. आहे आपला दहा जणींसारखा. पण ह्या संसारांतहि सर्वांत कंटाळवाणी जर कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे पोळ्या करणं. सर्व स्वयंपाकांत जास्त वेळ संबंध येतो ह्या पोळ्यांशींच. तांदूळ, गहूं निवडण्याचं किचकट काम करणंहि असंच जीवावर येतं. पण गंमत अशी आहे कीं, ही किचकट, कंटाळवाणीं कामं करतांनाच मला काव्य स्फुरतं. माझ्या खऱ्या स्फूर्तिदेवता आहेत पोळ्या. हातानें मी हीं कामें करीत असतें. नेहमीं लहरी भासणारी स्फूर्तिदेवता अशावेळीं मातेच्या वात्सल्यानं मला खेळवत असते. बुद्धीला हेलकावे देत असते. काव्यानंदाच्या रंगांत मी दंग असतांना हातांतील कंटाळवाणीं किचकट कामं अपुरीं वाटूं लागतात. 'पाळणा करून दे, विहीण करून पाठव, डोहाळे तयार कर, मंगलाष्टकं बनव.' अशी मागणी नेहमींच असते. कधीं प्रसंगानुकूल पद अगर काव्य बनवून द्यावं लागतं. मग माझीं रामबाण कामं मी काढतें आणि बघतां बघतां "कसं बाई जमेल?" ही विवंचना दूर होऊन चुटकीसरशीं मन-पसंत कविता मानससरोवरांतून झुळूझुळूं लागते. कवितेचा जन्म हा असा होतो. ही कविता मग सवडीनं केव्हांहि कागदाला लावली तरी चालतं.

तसा माझा स्वभाव पहिल्यापासून छांदिष्टच. आयुष्यांतील माझी पहिली कविता वयाच्या आठव्या नवव्या वर्षी मीं र, ट, फ करीत रचिली होती. पण माझ्या काव्याला खरा बहर आला ४६, ४७ च्या सुमाराला. त्या काळीं

रेशन ऐन रंगांत होतं. तांदूळ नांवाला मिळायचा; त्यांत निवडाहि फार असायची. गहूं मिळायचा तोहि ऑस्ट्रेलियन. आणि स्वयंपाकांत मुख्य भर असायची ती पोळ्यांवर. ऑस्ट्रेलियन गव्हाच्या पोळ्या कितीहि लाटल्या तरी आक्रसायच्या. कशाहि लाटल्या तरी नीट आकार म्हणून यायचा नाहीं. एखादा कोपरा खंबायतच्या आखाताप्रमाणें आंत जायचा, तर दुसरा एखादा समुद्रांत घुसणाऱ्या भुशीराप्रमाणें टोक काढत पुढें यायचा. ह्या काळांत जन्मलेल्या माझ्या कविताहि त्यांच्या स्फूर्तिदेवतेप्रमाणेंच आकारहीन आहेत. एक ओळ एवढीशी तोकडी तर तिच्याच पुढची दुसरी खूप लांबलचक.

माझ्या अलीकडच्या कविता प्रमाणबद्ध असतात, पण त्यामागील गुह्य माझा अभ्यास हें नसून सध्यां पोळ्यांना मिळणारी दाऊदखानी गव्हाची सकस कणीक व तिच्या होणाऱ्या रेशमासारख्या मऊ लुसलुशीत पोळ्या हें खरं कारण आहे.

आतां गोष्टीवरून गोष्ट निघाली म्हणून एक गंमत सांगतें. १९५२ च्या मे महिन्यांत आम्ही सर्वजणं दरवर्षीप्रमाणें राजापूर तालुक्यांत असलेल्या आमच्या खेडेगांवीं गेलों होतों. परत यायच्या वेळीं त्या बाजूला नेहमींच पावसाळा सुरू व्हायच्या बेतांत असायचा. बोटी बंद झालेल्या असल्यामुळें अशा वेळीं आम्हांला कोल्हापूरवरून रेल्वेनं मुंबईला यावं लागे. मुंबई ते अहमदाबाद हा प्रवास तर नेहमींच रेल्वेचा ठरलेला आहे; व इतक्या सगळ्या प्रवासांत तेवढाच प्रवास सुखाचा व आरामाचा असतो. मी सांगतें त्या वेळीं राजापूर ते मुंबई सोडाच. पण राजापूर ते कोल्हापूरसुद्धां थेट (डायरेक्ट) मोटार सर्व्हिस नव्हती. त्यामुळें वनगुळ्यांतील आमच्या घरापासून दोन अडीच मैल पायीं अगर बैलगाडींतून प्रवास केल्यावर कुव्यांतून (कुवं हें गांवाचं नांव आहे.) धांवणारी मोटार सडक दृष्टीला पडायची. कर्मधर्मसंयोगानं राजापूरहून येणाऱ्या मोटारींत जागा मिळाली तर पालीपर्यंतचा चौदा मैलांचा प्रवास शक्य व्हायचा. रत्नागिरीहून येणाऱ्या मोटारींत नंबर लागेल त्याप्रमाणें कोल्हापूरच्या सीटस् रिझर्व व्हायच्या.

मोटार थांबविण्यासाठीं आम्ही आडव्या धरलेल्या हाताला न जुमानतां त्या वेळीं जेव्हां एक दोन मोटारी कुव्याच्या पुलावरून पुढें पळाल्या तेव्हां

आम्ही मालवाहू उघड्या ट्रकला शरण गेलों. बायकामुळं बरोबर असलेल्या ' पॅसेंजरला ' ट्रकसुद्धां फार करून भीक घालीत नाहीं. पण त्या दिवशीं तिन्हीसांजा होत आल्या होत्या. आभाळहि भरून आलं होतं. तेव्हां बिचाऱ्या ड्रायव्हरला आमची दया आली असावी. पालींत पोंचेपर्यंत चांगलीच रात्र पडली, पण पावसानं कृपा केल्यामुळें उघडया ट्रकमधून येऊन सुद्धां आम्ही कोरडे राहूं शकलों. ट्रकमधून कां होईना पण कुव्यांतून पालींत तर सुखरूप येऊन पडलों, पण पालींत आमचं घोडं जें पेंड खात पडलं तें लवकर पुढें सरकायचं चिन्ह दिसेना. आमच्याप्रमाणेंच आजूबाजूच्या खेडयांतून आलेले अडाणी कुळवाडी दंडेलशाही करून येणाऱ्या मोटारींत घुसत. आमच्या मागून येऊनहि आमच्यापुढें निघून जात. आम्ही पडलों सुशिक्षित, आम्हांला असा आडदांडपणा कसा शोभणार? त्यांतून आम्ही पडलों गुजराथचे रहिवाशी. म्हण आहे ना? कीं ' गवळ्याशेजारीं बांधला पवळा, वाण नाहीं पण गुण लागला ' तशी आमची तऱ्हा झालेली. " जवा दो भाई! जवा दो भाई " करत आम्ही आपला नंबर यायची व गर्दी कमी व्हायची वाट पाहात बसलों. प्रत्येक मोटारीला गर्दी वाढतच होती. शेवटीं तिथल्या एजंटालाच आम्हां अहिंसावादी प्रवाशांची दया आली व त्यानं दुसऱ्या दिवशीं रात्रीं आलेल्या स्पेशल मोटारींत आमची ब्याद कशीबशी कोंबली. पालींत पाय ठेवून बरोबर चोवीस तास झाल्यानंतर आमचीं पावलें मोटारीला लागत होतीं.

कोणत्याशा गांवांत बाजार भरला होता. तिथून ही मोटार आली होती. तिथून उठलेला बाजार आतां ह्या स्पेशल मोटारींत भरला होता. बाया किंचाळत होत्या, पोरं केंकाटत होतीं, बाप्ये खेंकसत होते. बोंबील, सुकटा, म्हावरं, बांगडे ह्यांचा दर्प मोटारींत कोंदला होता. आम्हां ब्राह्मणांना असलं कांहीं पाह्यची संवय नसतेच. आणि सोवळ्या गुजराथेंत वास्तव्य असल्यामुळें अधूनमधून घ्याव्या लागणाऱ्या असल्या वासांची संवयसुद्धां मोडलेली. इतर वेळीं दृष्टि बाहेर ठेवून कोंकणचं आंबेघाटांतील सृष्टिसौंदर्य तरी मनमुराद लुटतां येई. पण ह्या काळोख्या रात्रीं बाहेर काय कप्पाळ दिसणार? तोंड आपोआपच बंद झालं होतं. बळेंबळें डोळेहि बंद केले. नाक बंद करायची इच्छा अनिवार होत होती, पण मग तोंड उघडलं गेलं असतं ना? सगळं

कसं अगदीं असह्य झालं होतं. पोटांत कावळे कोकलत होते, डोळ्यांवर झांपड येत होती, शरीराला ग्लानि आली होती आणि......!

आणि मग माझी ही स्थिति सहन न झाल्यामुळें काव्यदेवता मला अलगद उचलून सह्याद्रीच्याकडे दऱ्यांतून विहरायला घेऊन गेली. तिची करांगुली धरून मी गगनबावड्याच्या दाट धुक्यांतून आंधळी कोशिंबीर खेळलें. कोकीसऱ्यांत ठाईं ठाईं पसरलेल्या जलाशयांतून पांढरीं, तांबडीं कमळं तोडलीं. कमळांत लपून मधुपान करणाऱ्या भुंग्यांना उडवून लावलं. शेताच्या बांधांवरून फिरतांना पात्यापात्यावरून ओघळणारे दंवबिंदूचें मोतीं ओंजळींत सांठवलें. निळ्या नभांत तोंड खुपसणाऱ्या डोंगर-शिखरांचे तलम बुरखे दूर सारले. एक ना दोन मन काव्यानंदाच्या मस्त धुंदींत मग्न झालं होतं. शरीर मोटारींत कसं पडलं होतं तें मात्र मोटारींतील इतर उतारूच जाणत असतील.

आम्ही कोल्हापूरच्या गंगावेस मोटार स्टँडवर उतरलों. तेव्हां रात्रीचा दीड वाजला होता. ह्या चार-पांच तासांच्या अवधींत मारलेल्या उड्डाणांत "मनीषा" ह्या माझ्या कवितेचा जन्म झाला. ह्या असह्य परिस्थितींतच माझ्या मरगळलेल्या मनाला चैतन्याचे ताजे कोंब फुटले.

नुकत्याच जन्मलेल्या मुलाचा आकार कांहीं अगदीं प्रमाणबद्ध नसतो. त्याचं वेडंवाकडं डोकं त्याला न्हाणतांना थोपटून थोपटून आईला अगर सुईणीला गोल करावं लागतं. मुलाच्या अंगाला तेल लावतांना मुलाचं बसकं नाक वर काढायचा प्रयत्न आईला करावा लागतो. अकल्पित जन्मलेल्या कवितेवरहि असेच थोडेबहुत संस्कार कवीला करावे लागतात.

माझी 'मनीषा' ही कविता बऱ्याच जणांना फार आवडली. त्यांतील जिवंत वर्णनामुळें ती पुष्कळांच्या लक्षांत राहिली. माझ्या लक्षांत मात्र तिचा जन्मकाळच पक्का राहिला.

निंदकाचा शेजार लाभला म्हणजे मन स्वच्छ राहतं, म्हणून तुकाराम, कबिरासारख्या संत कवींनीं देवाजवळ तसला शेजार मागितला आहे. मी मात्र देवाला सांगतें कीं 'मला सदैव कंटाळवाणी किचकट कामं दे.' असह्य परिस्थितींत माझा कोंडमारा कर, कीं जो विसरण्यासाठीं मला काव्य-देवतेची कास धरावी लागेल.

वाऱ्याची एखादी मंदशी झुळूकहि तळ्यांतील संथ जलाशयावर तरंगाचीं अनेक वलयें निर्माण करायला समर्थ ठरते. तेवढ्यासाठीं झंझावाताचीच आवश्यकता नाहीं. त्याचप्रमाणें कवीच्या हळव्या मनांत खळबळ माजवायला एखादा साधा पण उत्कट क्षणहि पुरतो. आपल्या आटोपशीर संसारांत जिवाचा कोंडमारा करणारीं दुःखं अपुरीं पडतात म्हणून मला विकतचीं दुःखं घ्यायचं व्यसन जडलेलं आहे. अशीं दुःखं मला स्वस्त दरानं मुबलक मिळतात. आणि मग माझा कोंडमारा होऊं लागला कीं मला रिझवण्यासाठीं स्फूर्ति आपोआप धावून येते. असह्य परिस्थितीच्या आंचेनं मन तडकूं लागलं तरच स्फूर्तीनं केलेल्या सिंचनानं काव्याचे अंकुर ह्या मनोभूमींतून उगवतात. नाहीं तर मी आपली खुशाल ऐषआरामांत डाराडूर झोपा तरी काढतें किंवा सुंदर सुंदर पुस्तकं वाचत लोळत तरी असतें.

●●●

## ११ : " सुगंधी माहेर "

लोव्हा म्हणजे, नाचणें ( नागली ) उन्हाळ्यांत पेरलें व पाटाच्या पाण्यावर पीक काढलं कीं त्याच नाचण्यांना लोव्हा म्हणायचं. पाटा, पर्याच्या आसऱ्यानं भर उन्हाळ्यांत डौलानं डोलणारीं हीं हिरवीं, पिवळीं शेतं रखरखीत उन्हानं जळजळणाऱ्या डोळ्यांना गारवा व मनाला मोठं सुख देतात. लोव्हा पेरतांना त्याच्याच बरोबर पालेभाजीचं बीं पेरतात. माठ, पोकळा, तांदुळजा, राजगिरा वगैरेंच्या जातींतील ही भाजी असते. हीच ती सुप्रसिद्ध लोव्ह्यांतली भाजी. पाटाच्या पाण्यावर काढलेलीं पिकं पावसाळी पिकांपेक्षां दिसायला रातड, पण चवीला गोड असतात. वायंगण्याचा भातहि असाच रंगानं तांबडा, आकारानं बटबटीत पण गोडीला चविष्ट असतो.

दूरदेशीं दिलेल्या माहेरवाशिणी दारचीं सुखं दूर लोटून दर वर्षी उन्हाळ्याच्या रजेंत, दगड, धोंडे तुडवीत ह्याच रातड अन्नासाठीं कोंकण जवळ करतात. डोंगराळ कोंकण माहेरवाशिणी फुलवतात, नोकरीनिमित्तानं शहरवासी झालेले चाकरमानीहि त्यांना हातभार लावतात. ज्या पर्या डोंगरावरून फक्त कुडवाळी, कुडवाळणीच नेहमीं दृष्टीला पडतात, त्याच ठिकाणीं चैत्र वैशाखी गुलजार तरुण–तरुणी, निसर्गसान्निध्यासाठीं हपापलेलीं मुलं, पांढरपेशा प्रौढ वर्ग उत्साहानं विहार करतांना आढळतो. चैत्रगौरीबरोबर माहेरपणाला आलेल्या माहेरवाशिणी आपला सासुरवाशीणपणा विसरून पोरकट बनतात. वर्षभर काबाडकष्ट करून शिणलेल्या हातांना विसावा देण्यासाठीं जिवाचं रान करतात.

झुंजूमुंजू होतं न होतं तोंच चिवचिवणाऱ्या पांखरांबरोबर जागं व्हावं. गंधवती पृथ्वीवरून विविध सुवास घेऊन येणाऱ्या मंद शीतल वाऱ्यानं धुंद व्हावं. ह्या धुंदींतच खळीं लोटावीं. आगरांतून आंबे गोळा करून आणावेत. कुठें फणस पिकला आहे कीं काय ? ह्याचा मागोवा घ्यावा. फुलं

काढून आणावीं आणि मग जावं धरणावर पाणी आणायला. पाटाचं पाणी बांधून आणण्यासाठीं पर्याला बांधलेल्या धरणावरच जावं लागतं. धरणावर जायची वाट पाटाच्या कडेकडेनं उभ्या असलेल्या नारळी-पोफळीच्या आगरांतून गेलेली असते. आगरं रंगीबेरंगी फुलांनीं फुललेलीं असतात. हातांतील केगऱ्यानं ( फावड्यानं ) आगरा-आगरांतून फुटलेली बांधणी बांधत बांधत थेट धरणापर्यंत जायचं. धरणाला पडलेलं घळ नीट शेणामातीनं लिंपून पाणी एकदां पाटाला लावून दिलं कीं मग आगरांच्या खालच्या अंगानं पसरलेल्या लोव्ह्यांतनं खुशाल रमत गमत सावकाशीनं घरीं परत फिरावं. मात्र दारच्या फोंडांत पाणी पोंचायच्या आंत आपण घरीं पोंचायला हवं.

लोव्ह्यांतून फिरायची खरी मजा सकाळपेक्षां संध्याकाळींच असते. दिवस घारेच्या दिशेनं कलला कीं खळ्यांतील साटा, आमसुलांचीं सुकवणं घरांत आणून टाकावीं. आईच्या हातचं रातांब्याचं पन्हं चांगला वाडगा भरभरून प्यावं, आणि मग रोवळ्या घेऊन करवंदें आणायला डोंगरावर निघावं. रात्री काळोख्या असल्या तर पिकलेल्या करवंदांनीं जाळ्या कशा अगदीं काळ्याभोर झालेल्या असतात. चांदण्या रात्री असतात तेव्हां मात्र पिकलेलीं करवंदं शोधून शोधूनच तोडावीं लागतात. सकाळीं धरणावर जातेवेळीं वाटेंत लागणाऱ्या घरीं निरोप ठेवलेला असतो. निरोपाप्रमाणं मित्र-मैत्रिणी रोवळ्या, झोळ्या घेऊन करवंद काढायला येतात. कधीं मर्डीवर तर कधीं चिंदरवनांत, कधीं आल्याच्या भाटल्यांत तर कधीं सड्यावर, अशीं करवंदीच्या भरपूर जाळ्या असलेलीं ठिकाणं निवडावीं लागतात. डोंगर चढतांना मज्जा येते. चढतांना एक अट असते. 'ढोपरांवर अगर जमिनीवर हात टेकायचे नाहींत. कसलाहि आधार न घेतां ताठ्यांत अख्खा डोंगर चढायचा.' पूर्वी शरीरं निगडीच्या काठीसारखीं लवचिक होतीं. तेव्हां ह्या साऱ्या अटी जमायच्या; पण अलीकडे पोसलेल्या केळीच्या खांबासारख्या सतेज पण बोजड बनलेल्या शरीरांना ह्या अटी पार पाडणं शक्य होत नाहीं. उभा डोंगर ताठ्यानं चढायचा. ताठा आतां संपुष्टांत आलेला असतो. वर चढतांना कोण कोण ढोपरांवर हात टेकतात इकडेच प्रत्येकाचं लक्ष असतं. मनाच्या बेसावधपणाचा फायदा घेऊन नकळत आपलेच हात कशाचा तरी चटकन् आधार घेतात आणि आपलीच शिकार होते. कुणाची प्रथम तर

कुणाची शेवटीं. डोंगरमाथ्यावरचं सपाट माळरान गांठेपर्यंत प्रत्येकजण एकाच माळेंत गोंवला जातो.

वर पोंचल्यावर मात्र अवघड डोंगर चढल्याचे श्रम क्षणांत नाहींसे होतात. भणभणणारा थंडगार वारा घामेजलेल्या अंगाला येऊन बिलगतो. शिवाराच्या उग्र वासांत फुललेल्या कुड्यांचे मळकट पांढरे झुबके आपला मंद गंध मिसळून देतात. करवंदीच्या जाळ्या तर इतक्या असतात कीं, प्रत्येकानं स्वतंत्र जाळी घेतली तरी पुरून उराव्यात. मग काय ? डोंगरचा मेवा पोटभर खावा नि मोटभर घरीं न्यावा.

घराकडे परत फिरतांना वाकडी वाट करून जांभांत जावं, बोंडू पाडावे, ठेंगण्या बैठ्या कलमांवर चढून आंबे काढावेत. एकमेकांच्या खोड्या कराव्या. लहानपणच्या पोरकटपणाला उजाळा द्यावा. बालपणांतील आठवणी काढून वठूं पाहणाऱ्या मनाला पुन्हां एकदां मोहरायला लावावं.

मग जावं पर्यावर. पावसाळ्यांत गांवाला पुराचा तडाखा देणारा पर्या ह्या दिवसांत अंग चोरून झुळझुळत असतो. पात्रांत गोटे व रेवा पसरलेला असतो. ऐसपैस पाथरी अधून मधून हव्या तितक्या पडलेल्या असतात. पाण्यांत पाय सोडून ह्या पाथरींवर आरामशीर बसावं. बरोबर शिदोरी आणली असली तर इथेंच तिचा समाचार घ्यावा. एकीकडे गप्पा झोडाव्या, गाणीं म्हणावीं, चप्पट दगड घेऊन पाण्याच्या पृष्ठभागावरून बेडकुळ्या उडवाव्या. पर्याकांठीं फुलणारीं श्रावडं तोडावीं. पर्यांत ऐसपैस मांडी ठोकून बसलेल्या असोगीवर फुललेले तांबड्या पिवळ्या फुलांचे गुच्छ काढावे. मात्र हे गुच्छ काढतांना जपावं लागतं हं. असोगीच्या पानांफुलांतून उंबीलाचीं घरटीं असतात. घरट्यांना धक्का लागला तर हे माहेरचे माधारी आपल्याला कड-कडून डसतात. असोगीच्या गर्द सांवलींत नागोबाची स्वारी विसावा घेत बसलेली बरेच वेळां आढळते. गोड गळ्यानं गाइलेलं गाणं अमर पावरींतून श्रवणारे मधुर सूर ऐकून धुंदावलेली नागोबाची स्वारी क्वचित् प्रसंगीं देह-भान विसरून डोलायलाहि लागते. ही स्वारी आपल्यापासून चार हात दूर असेपर्यंत चिंता नाहीं, पण जर का तिला धक्का लागला तर मग मात्र आली पंचाईत.

इतकं सगळं झाल्यावर डुंबायची लहर आली तर जवळपास असलेल्या कोंडीवर जावं. पर्याच्या शीतल पाण्यांत अर्धा, पाऊण तास खुशाल धुडगूस घालावा. मग ओलेत्यानेंच घरची वाट धरावी. ओलेतीला न्याहाळण्यासाठीं आसुसलेले डोळे इथें नसतात. इथें ओलेतीचं कौतुक कोणाला नाहीं. कोंकणचीं लेकरं बारा महिने तेरा काळ अर्धनग्नच असतात.

घरच्या वाटेवर लोव्हे असतात. कुठें शिंपणं चाललेलं असतं तर कुठें तें झालेलं असतं. मखमालीच्या गालिच्यावर कलाबतूंतून कशिदा काढल्याप्रमाणें पाण्याचे चंदेरी पाट पाचूच्या पिकांतून चमचमत असतात. आडमुठा वारा भणभणत वाहूं लागला कीं, शिस्तींत अंथरलेल्या या मखमाली गालीच्याला ठिकठिकाणीं सुरकुत्या पाडतो. मग अधून-मधून उभ्या असलेल्या लोव्ह्यांतल्या भाजीचे तांबडेलाल तुरे व हिरवींगार पानं खुलून दिसतात. लोव्ह्याच्या भोंवतीं गडगा अगर कांटेरी वई असते. अधेंमधें मोठया थोरल्या धोंडी असतात. धोंडीवर, वईवर, गडग्यावर तरारलेल्या मोगऱ्याचा पसारा असतो. मोगरीच्या हिरव्यागार वेली पांढऱ्याशुभ्र कळ्यांनीं नटलेल्या असतात. प्रथम थोरल्याशा धोंडीवर चढून लोव्ह्याची शोभा डोळे भरून पाहावी. लोव्ह्यांत शिंपणं करीत असलेल्या मित्रमैत्रिणीबरोबर मोठमोठयानं गोष्टी कराव्यात. त्यांनीं खेळ्यांतील किंवा तमाशांतलीं गाणीं गावीं, आपण कविता अगर भावगीतं म्हणून दाखवावींत. लोव्ह्याचीं पिकलेलीं कणसं वेंचणाऱ्या आयाबायांना वाईच पानाचा कपटा, सुपारीचं खांड वा तंबोकाचं ढेकूळ द्यावं, त्यांनीं अगत्यानं दिलेली लोव्ह्यांतली भाजीची जुडी प्रेमानं घ्यावी. एकमेकांना उखाणे घालून कोड्याच्या भाषेंत बोलावं. यावेळेपावेतों सूर्यदेव धारेखालीं गेलेला असतो. घरीं परतायची वेळ झालेली असते. पण दरवळूं लागलेल्या मोगरीचा मोह आवरतां आवरत नाहीं. पायांत वईचे कांटे मोडले, लुगडयांना घस लागले तरीसुद्धां ओचे, पदराचे झोगले भरभरून कळ्या तोडल्याच जातात. करवंद, जांभ दिसले कीं मुलांना ऊत येतो आणि सुगंधी फुलं पाहिलीं कीं लेकी-सुना वेडया होतात.

घरीं यावं तों दिवेलागणी झालेली असते. देवापुढच्या चौरंगावर कुणीतरी आणून ठेवलेलीं गुलबाक्षीचीं रंगीबेरंगी फुलं माळेंत गुंफलीं जाण्याची वाट पाहात असतात. शेजारींच आमणीच्या पानावर ठेवलेलीं बकुळीचीं

शुभ्र टपोरी फुलं खिदळत असतात. दुपस्त्यावर पडल्या पडल्या समोर दिसणाऱ्या सुंदरीकडे पाहून खिदळणाऱ्या गुटगुटीत बाळाप्रमाणें तीं भासतात.

तुळशीच्या खळ्यांत पानं मांडलेलीं असतात. फणसाची भाजी, लोन्ह्यां-तली भाजी, कुळथाचं पिठलं, करवंदाचं लोणचं, गुरगुट्या भात, असा जेवणाचा बेत मस्त असतो. मागच्या पडवींत मेंढाला आंखडलेलं वासरूं हंबरत असतं. कासंडींत काढल्या जाणाऱ्या दुधाच्या झुरूझुरू धारेला किण-किणणाऱ्या काकणांचा ताल असतो. दूध काढणाऱ्या आजीच्या भोंवतीं शहरवासी नातवंडांचा घोळ असतो. वासराला बोलावणाऱ्या गाईची व दाव्याला हिसडे देऊन गाईकडे ओढ घेणाऱ्या वासराची त्यांना गंमत वाटते. आजी मधूनच हातांत धरलेला गाईचा आचूळ वाकडा करून नातवंडांच्या अंगावर धारोष्ण दुधाचा कारंजा उडवते. मुलं प्रथम ई ऽ ऽ करून किंचाळ-तात व मग खिदळायला लागतात. गाईला मात्र हा चावटपणा आवडत नाहीं. ती लाथ उचलते. 'हो ऽ ऽ, तांबू!' म्हणून सुद्धां ती आवरत नाहीं. मुलं घाबरून पळतात व पुढच्या ओटीवर, झोंपाळ्यावर बसून परवचा म्हणूं लागतात. आंखडलेलं वासरूं लुचायला सोडून आजी दुधानं फेसाळ-णारी कासंडी घेऊन घरांत येते.

रात्रीं कुणाकडे खेळे नाचायचे असतात, तर कुणाकडे तमाशा असतो. अधून मधून एकमेकांकडे इस्पिकांचा अगर सोंगट्यांचा डाव बसायचा बेत नक्की झालेला असतो. पर्‍यापलीकडे राहणारे लोक चुडी, कंदिलाच्या उजेडानं अलीकडे येतात. येतांना केवड्याचं पिवळंधमक गंधानं घमघमणारं कणीस आणून देतात. खालच्या वठारच्या अक्कांकडून दरवळणाऱ्या सोनचांफ्याच्या फुलांचा पुडा येतो. दंव पडून फुलं टुपटुपीत राहावीं म्हणून परडी भरून तीं तुळशीच्या वृंदावनाभोंवतीं ठेवलीं जातात. तिथें सुगंधी फुलांचं संमेलनच भरतं. दरवळणाऱ्या सुगंधाची धुंदी मग तनुमनावर चढूं लागते.

ओटीवरच्या तसबिरींना घालण्यासाठीं पोरीबाळी पेंगणाऱ्या डोळ्यांनीं मोगरीचे हार ओंवत बसतात. प्रौढा खळ्याच्या कोपऱ्यांत पडलेल्या ढिगांतले रातांबे काथवटींत फोडून आमसुलं तयार करण्याच्या उद्योगाला लागतात. म्हातारी कोतारी बांबूच्या कामट्यांच्या चोया तयार करत बसतात अगर

पत्रावळी लावतात. हातांनीं कामं चालतात. तोंडांनीं गोष्टी, गाणीं, भेंड्या, उखाणे, ओव्या यांना बहर येतो.

आंबे, गऱ्यांचे दिवस असल्यामुळें सुस्ती मी म्हणत असतें. कामं आटोक्यांत आलीं कीं, दोघांचौघांनीं जमावाजमावांनीं आसपासच्या आंब्याखालून कंदिलाच्या उजेडानं आंबे निवडून आणावे.

पुढच्या उघड्या खळ्यांतच थोरलं जाजम पसरलं जातं. पेंगळून अर्धेमधें आडवीं झालेलीं मुलं जाजमावर नीट निजवलीं जातात. कंदील बारीक डोळ्यांना उशाशीं पहारा देत बसतात.

चांदोबाच्या आकाशांत चांदण्या फुललेल्या असतात. ढोलक्याच्या तालावर म्हटल्या जाणाऱ्या गावठी गाण्यांचे अस्पष्ट सूर दुरून ऐकूं येतात. जाजमावर पडल्या पडल्या कुजबुज चाललेली असते. दबलेल्या आवाजांतच मधून हास्याचे फिस ऽ ऽ कन तुषार उडतात. मग आई घरांतून रागावते. "निजा गो आतां, एवढ्या थोरल्या झालांत तरी अजून समज गो कधीं यायचा ? काय हा सुवास, घरदार कोंदलेन ह्या दरवळानं. एखादे वेळेस नाग, साप यायचा. मिटा डोळे नि निजा गपचिप."

आई घरांत अंथरुणावर तळमळत असते. खळ्यांत कुणी घोरूं लागतात. कुणाचा श्वासोच्छ्वास तालावर मंद गतीनं सुरू होतो. माझ धुंदावलेलं मन मात्र फणा उभारतं. झरणाऱ्या चांदण्याचं अमृत पिऊन तुळशीच्या खळ्यांत उडत जातं. केवड्याच्या कणसाला विळखा घालतं. उमलत असणाऱ्या मोगरीच्या कळ्यांत मध शोधूं लागतं. बेभान होऊन नाचत गाऊं लागतं.

अस्सं माहेर सुगंधीबाई, नागीण होऊन डुलावं.
अस्सं माहेर गा ऽ र बाई, मोगरीवाणी फुलावं.

० ० ०

# १२ : “ पऱ्या ”

नदीचं मूळ आणि ऋषीचं कूळ शोधूं नये म्हणतात. पण आमचा पऱ्या म्हणजे कांहीं नदी नव्हे. लहानसा ओढा, ओहोळच तो. अवघ्या दोन अडीच मैलांचाच त्याचा प्रवास. सतेश्वराच्या गर्द राईत त्याचा उगम आहे. राईत एक काजऱ्याचं झाड आहे. झाडाखालीं बेडकीच्या आकाराची एक भली थोरली धोंड आहे. त्या धोंडीखालून पऱ्या झुळझुळत उगम पावतो. बसलेल्या बेडकीच्या पोटाखालून पाण्याचा ओघळ आल्याचा भास होतो.

अवघ्या मनगटाएवढ्या जाडीचा हा प्रवाह. वाटचाल करतां करतां फोंफावत जातो. मार्गांत त्याला लहानमोठे अनेक झरे मिळत असावेत. त्याचा सारा प्रवास लहानमोठ्या दगडधोंड्यांतून सतत चाललेला आहे. कुठें मोठ्या थोरल्या जांभ्या धोंडीखालून वाट काढ, तर कुठें निसुळत्या कातळा-वरून उडी घे. सरळ संथ अशा मार्गांतून पऱ्याला फारसं वहायलाच मिळत नाहीं, दगडधोंड्यांशीं सतत संघर्ष करावा लागल्यामुळें अवखळ बनलेला हा पऱ्या नेहमीं खळखळ करीत पळत असतो. आकाराच्या मानानं ह्याला ओढ फार. ह्याची सारी कर्तबगारी सांगितली तर हा इतका लहान आहे हें सांगूनसुद्धां खरं वाटणार नाहीं.

ह्या खडकाळ पऱ्याच्या दोन्ही कडेनं दाट छाया देणारे कितीतरी वृक्ष आनंदानं नांदत असलेले दिसतील. रातांब्या, आंबे आणि फणस हे तर अगणित आहेत. अधून मधून चिंच, आवळी, नीव, जांभळी अशीं हंगामी फळं देणारीं झाडं विपुल आहेत. पऱ्याकडेनं होरलेल्या दरडींतून पांढऱ्या पानांच्या श्रावडांनीं वस्ती केली आहे. धीट असोगी तर पऱ्याच्या प्रवाहांत मधोमध खुशाल आपली अंतराअंतरावर मांडा ठोकून बसलेली आढळेल.

उगमापासून संगमापर्यंत पऱ्यामधूनच चालत जायचं ठरवलं तर ऊन थेंड लागेल आणि सावलीच जास्त मिळेल. मात्र कुठें मोठमोठ्या धोंडी-



" पर्या "

वरून उड्या माराव्या लागतील तर कुठें शेवाळलेल्या कातळावरून पाय निसरेल. हा खडतर मार्ग तुडवीत असतांना हंगाम असेल त्याप्रमाणें पिकलीं फळं पुढ्यांत येऊन पडतील. फुललेलीं फुलं वाऱ्याहातीं आपला सुगंध धाडून आपल्याला जवळ बोलावतील. अवखळ पर्या खळाळणारं गीत गात आपल्याला सुरवातीपासून शेवटपर्यंत सोबत करील. पर्याकडेच्या झाडांवर राहणारे व पर्यावर आंघोळीसाठीं आलेले हरतऱ्हेचे पक्षी आपलं मन प्रसन्न करतील. सायाच्या मजबूत झाडावर आपली बळकट चोंच आपटून 'टक् टक्' आवाज काढणारा सुतार पक्षी आपलं घरटं बांधण्यांत गढलेला आढळेल. तर पांढराशुभ्र बगळा एखाद्या पाथरीवर बकध्यान लावून एकाच पायावर उभा असलेला दिसेल. तो डोळे मिटून उभा असला तरी पर्याच्या पाण्यांत चंदेरी माशांची चाललेली चमकती चुळबूळ त्याला अंतर्ज्ञानानं समजते आणि मग तो चटकन् चोंच मारून एखाद दुसऱ्या माशाला सद्‌गति देतो. लहानमोठीं रंगीबेरंगी पांखरं पर्यावर इतकीं आढळतात कीं, त्यांचे मनहारी चाळे बघतां बघतां वेळ कसा निघून जातो तेंच कळत नाहीं. पर्याच्या पाण्यांत सूरकांड्या मारणाऱ्या माशांची धांवपळ पाहात बसलं तरी वेळेचं भान राहात नाहीं. कोळ्याच्या आकाराचा एक लहानसर प्राणी पर्याच्या पाण्यावर आपल्या त्रिकोणी तंगड्या नाचवत सतत तरंगत असतो. कोंकणांत ह्या प्राण्यालां गौळण म्हणतात. ह्या गौळणीचं पर्याच्या पाण्यांतील घुसळण अविरत चालूच असतं. धोंडी, पाथरीच्या आसऱ्यानं कुरल्या राहतात. कुठें कुठें वयाळे (पाणसाप) हि आढळतात. पण आपला जास्त संबंध येतो माशांशींच. पर्यांत उभं राहून आपण पाथरीवर धुणं धुवूं लागलों कीं ते आपल्या पायांना चावतात, गुदगुल्या करतात. अखेर आपणाला पाण्याबाहेर निघावंच लागतं. खरकटीं भांडीं घासतांना, तांदूळ धुतांना पाण्यांत पडणाऱ्या शिता-तांदुळासाठीं ते अशी कांहीं धांवपळ करतात कीं वाटतं कामं तश्शींच टाकून रोवळींतले सगळे तांदूळ हळूहळू पाण्यांत सोडावे आणि त्यांचा तो खेळच बघत बसावं.

पर्या जिथं उंचावरून उडी घेतो तिथं पाणी फेसाळतं. साखरेचा पाक होत आला म्हणजे जसा फेस येतो, तशा फेसाची आठवण हा फेस पाहून होते. अशा ठिकाणच्या पाण्याला पर्याची साखळी म्हणतात. ह्या एवढ्याशा

पर्याला एक दोन ठिकाणीं भोवरेमुद्दां आहेत. भोवरे महाभयंकर असतात. एकदां वस्तु भोवऱ्यांत सांपडली कीं मग तिची सुटका म्हणून व्हायची नाहीं. पावसांत पर्याला हौर आला म्हणजे भोवरे कुठें कुठें आहेत तें नीट हेरून सावध राहावं लागतं.

इतर दिवसांत साळसूदपणें वाहणारा पर्या पावसाळ्यांत हवा तसा धागडधिंगा घालतो. धोंडी, पाथरी एका ठिकाणाहून उचलून हव्या तिकडे नेऊन फेकतो. पात्रांतील रेव्याची ढवळाढवळ करतो. खड्डा असेल तिथें उंचवटा निर्मितो आणि उंचवट्याच्या जागीं खोल खड्डा निर्माण करतो. म्हणून पाणी गढूळ असतांना नेहमींच्या भरंवशानं पर्या ओलाडणं फार धोक्याचं असतं. अशा वेळीं मोठ्या थोरल्या सोट्याच्या आधारानं गढूळ पाण्यांतील वाट रापीत, अंदाज घेत पुढें जावं लागतं.

गांवाला ह्या पर्यापासून कांहीं म्हटल्या कांहीं लपवतां येत नाहीं. पापकर्म असो कीं सत्कर्म असो, अखेर सर्व पर्यार्पण करावं लागतं. थोरांपासून पोरांपर्यंत ह्याची सर्वांवर सारखीच माया आहे. भेदभाव कसा तो ह्याला माहीतच नाहीं. तो स्वतः दुजाभाव जाणत नसला तरी गांवकऱ्यांनीं ह्याला निरनिराळीं नांवं ठेवलीं आहेत. हा जिथून वाहतो तिथलं नांव त्याला पडतं. वरल्या वठारचा पर्या, खाल्या वठारचा पर्या, म्हारवडाचा पर्या. पर्या तोच, पण प्रत्येक वळणावर ह्याला आपलं विशेषनाम प्राप्त झालं आहे. एकच देव अनेक नांवांनीं ओळखला जातो ना? तस्संच ह्याचं आहे. एखाद्या शुचिर्भूत ब्राह्मणाच्या गळ्यांतील पवित्र यज्ञोपवीतामुळें त्याच्या अंगच्या तेजाची प्रभा ज्याप्रमाणें फाकून दिसावी, त्याप्रमाणेंच सृष्टिसौंदर्याचा वरदहस्त लाभलेल्या आमच्या गांवाला ह्या पर्याच्या पडलेल्या वेढ्यामुळें एक आगळीच शोभा प्राप्त झाली आहे.

हा असा वठारावठारांतून गांवाला वेढा घालून वाहात असला तरी गांवापासून कांहींसा अलिप्त, एकलकोंडाच आहे. त्यामुळें ह्याच्या सहवासांत एकान्त, विश्रांती लाभते. एखाद्याशा कामानिमित्त हवा तेवढा वेळ काढतां येतो. थोरल्याशा धोंडीच्या आडोशाच्या आधारानं एखाद्याला चांगलं मनसोक्त कुबलून काढतां येतं. पण म्हणच आहे ना? कीं, ‘पाण्यांत चेपलेलं

पाप आज ना उद्यां वर हें येणारच.' पर्याच्या कुशींत एखाद्यानं पाप लपवायचा प्रयत्न केल्यास पर्या तें साऱ्या गांवासमोर आणून उघडं करून दाखवतो. असं असलं तरी अखेर तो आमचा सर्वांचा मायबापच आहे. गांवांतील कितीतरी दुःखी जिवांचे खारट आसूं ह्यानं हूं कीं चूं न करतां पचवले आहेत. गळा मोकळून रडण्याचा रुदनस्वर आपल्या खळखळाटांत सामावून घेतला आहे. एकमेकांची थट्टामस्करी, हजर नसलेल्या व्यक्तींच्या चहाड्या, कुटाळक्या, टोमणे मारत चालणारी कुजकीं नासकीं बोलणीं ह्या पर्याच्या साक्षीनेंच बोललीं जातात. प्रेमी जिवांच्या चोरट्या गांठीभेटी इथेंच होतात. पुढील गांठीभेटींचे संकेतहि इथेंच ठरवले जातात. अख्ख्या गांवातील एकहि व्यक्ती ह्याला परकी नाहीं. त्याचप्रमाणें गांवांत येणाऱ्या प्रत्येक प्राण्याला ह्याचं आकर्षण हें आहेच. गांवातलीं सारीं गुरंवासरं ह्याच पर्यावर पाण्यासाठीं आणलीं जातात. गांवांतील सारीं हिरवींगार आगरं आणि केळीच्या बागा ह्याच्याच जीवनावर डौलानं डोलतांना दिसतात. उन्हाळी आळीं, वावरी, भाज्या, पाले, लोव्हे, ठाकऱ्या, वायंगणी ह्याच्याच पाटामुळें पोसतात. ह्या एवढ्याशा पर्याला दोन–तीन ठिकाणीं धरणं बांधून पाट काढलेले आहेत. एकेका पाटावर ठराविक आगरांचा हक्क आहे. मग हे आगरवाले आपापसांत पाण्याचे पालट ठरवून घेतात व पालटाप्रमाणें आपलीं आगरं शिंपून दबदबीत गार राखतात.

अशा तऱ्हेनं पाटाच्या पाण्यानं पर्या आमच्या दारांत येतो. जणूं गांवाच्या हृदयांतच शिरतो. धरणापासून आमच्या फोंडांत पाणी पडेपर्यंत त्याला निम्माशिम्मा गांव तुडवावा लागतो. इतकीं आगरं, परसवं ओलांडून येतांना तो माझ्यासाठीं अनेक गुप्त गोष्टी घेऊन येतो. लवंगांच्या आकाराचीं बदामी रंगाचीं रातांबीचीं फुलं. आंब्या, जांभांचा मोहर, फणसाच्या कुवऱ्या, उंडली, नागचांफा ह्यासारख्या फुलांचं घमघमत पिवळं धमक केशर. कुठून उकडंब्याच्या साली तर कुठून लोणच्याचा तवंग. इतक्या दिवसांच्या सरावामुळें ह्या वस्तु नेमक्या कुठच्या व कुठून आल्या हें मी अचुक ओळखतें. अपरिहार्य अडचणीमुळें मी फार दिवसांत पर्यावर जाऊं शकलें नाहीं, तर तो हें असें पाटाकरवीं मला निरोपावर निरोप पाठवतो. अखेर मला माझं मन आवरणं अशक्य होतं व मी पर्याच्या वाटेनं धांवत

सुटतें. पर्यांत डुंबतांना खूप मजा येते. ह्या पर्याला पोहण्यासारखी थोरली कोंड अशी नाहींच. धरण बांधलेल्या कमरेभर पाण्यांतच डुबक्या मारायच्या. त्यामुळें बुडण्याची, मरण्याची मुळींच भीति नाहीं. मात्र आपण डुंबायच्या ऐन रंगांत आलों असतांना कुणीतरी हळूच मागून येतं आणि आपला बुचडा धरून आपल्याला पाण्यांत दाबतं. नाकातोंडांत पाणी शिरल्यामुळें मग आपला जीव घाबरतो. त्यानंतरचे निदान दोन--चार दिवस तरी अंग धुण्यासाठीं धरणावर न जातां झुळझुळत्या प्रवाहाशेजारच्या कातळावर बसूनच मी तांब्या, तपेलीनं मनसोक्त अंग धुवून घेतें.

आम्हां गांवकऱ्यांना हा पर्या प्राणप्रिय आहेच, पण गांवांत येणाऱ्या पाहुण्यांनासुद्धां प्रथमदर्शनींच ह्याचं आकर्षण वाटतं. हा पर्या ओलांडल्या-शिवाय कुणालाहि गांवांत येतांच येत नाहीं. नंदीचं दर्शन केल्याशिवाय जसा शंकर भेटायचा नाहीं, त्याचप्रमाणें पर्याच्या पाण्यानं पाय धुतल्याशिवाय आपलं घर, आपलीं आवडतीं माणसं दृष्टीला पडायचीं नाहींत. चार दिवसांच्या सहवासांतच पै-पाहुण्यांना ह्या पर्याबद्दल घरांतील माणसांइतकाच जिव्हाळा, आपलेपणा वाटूं लागतो. येथील गांवकऱ्याइतकीच त्याच्या मनांतहि पर्याविषयीं ओढ उत्पन्न होते. गांवांतून परत जातेवेळीं इतरांप्रमाणें पाहुण्यांचे अश्रूहि पर्याच्या पाण्यांत ओघळतात.

कडक थंडींत आपल्या कोमट पाण्यानं ऊब देणारा, वाऱ्याच्या मंदशा झुळुकीनेंहि शहारणारा, रखरखीत उन्हांत तळपणारा, उबलेले जीव आपल्या थंडगार पाण्यानं शांत करणारा हा पर्या संध्याकाळ होऊं लागली कीं निराळंच रूप धारण करतो.

पर्याच्या गुळगुळीत काचेवरून घसरणारे काळे निळे ढग अंधुक होऊं लागतात. पर्याच्या आयन्यांत आपलें रूप न्याहाळत बसलेल्या वृक्षवेली ध्यानस्थ होतात. पर्याच्या आसमंतांत एक प्रकारची भयाण, गूढ, रहस्यमय शांतता पसरते. पाण्यावर धुरकट रंगाच्या जाळ्याचं आवरण पडतं. वाटतं, आतां आपण जास्त वेळ इथें थांबलों तर ह्या जाळ्यांत गुरफटून अडकून पडूं. अवखळ पर्याच्या खळखळाटांत गंभीरता येते. घडंचीच्या गर्द छायेंत, एक ऐसपैस पाथर पर्यांत पहुडलेली आहे. तिन्हीसांजेल्या कातरवेळेला, पुसटत्या उजेडांत कुणीतरी धाबळी पांघरलेला शुचिर्भूत पुरुष पाथरीवर बसून संध्या करीत

असल्याचा भास होतो. कुणी म्हणतात कीं तो ब्रह्मसमंध आहे. कुणी म्हणतात कीं, तो ह्या गांवचा मूळपुरुष म्हणून. बापडा कुणी का असेना, तो कुणाला त्रास देत नाहीं. त्याच्या वाटेलाहि कुणी जात नाहीं.

सारा दिवसभर आम्ही पर्यावर रेंगाळत असतों. दिवेलागणीनंतर मात्र तिकडे जायला आम्हांपैकीं एकाचासुद्धां जिव धजावत नाहीं. पर्याचं पाणी पिण्यासाठीं आणि तिथल्या बेडक्या, बेडूक खाण्यासाठीं रात्रीं वाघा-सर्पाचाहि पिशाच्च्याच्या जोडीनं तिथें वावर असतो म्हणे.

चंद्रग्रहण सुटल्यावर किंवा नर्कचतुर्दशीच्या पहाटे आम्ही जमावाजमावानं पर्यावर अंग धुवायला जातों. पण त्या पहाटं फुटायच्या वेळेचं वातावरण मोठं उत्साहकारक असतं. एकट्या–दुकट्याला भय वाटेल, पण त्या शीतल सुगंधी पर्यांत एकत्र बागडायला मोठी गंमत वाटते. त्या वेळचं पर्याचं तें धूसर दर्शन नेहमींपेक्षां अगदीं वेगळं आणि विलोभनीय असतं.

असा हा आमच्याशीं समरस झालेला, आम्हांला सांभाळणारा पर्या, जेव्हां पटवाच्या पर्याला मिळतो तेव्हां आमच्याशीं असणारे आपले सारे लागेबांधे विसरून जातो. पटवाचा पर्या कुठें उगम पावतो हें जसं मला माहीत नाहीं, तसंच तो कुठें कुणाला मिळतो हेंहि मी जाणत नाहीं. मिळत असेल असाच दुसऱ्या एखाद्या पर्याला आणि शेवटीं सगळे मिळून मुचकुंदी नदीलाच मिळत असणार. पटवाचा पर्या आमच्या पर्याच्या मानानं दुप्पट तिप्पट मोठा आहे. पोहणारा चांगला तरबेज असल्याशिवाय त्याच्या कोंडीवर कुणी पोरांबाळांना एकटं दुकटं पाठवणार नाहीं. ह्या पर्यावर चाळेगतीहि फार. भर दुपारच्या बारा वाजतां, रात्रीं-अपरात्रीं तिथें कुणाकुणाला झपाटल्याचं ऐकूं येतं.

गांवाच्या खालच्या अंगानं आमचं गदम नांवाचं शेत आहे. आमचीं इतर सारीं शेतं एकीकडे आणि हें एकटं शेत एकीकडे. इतक्या हंगामी दोन पिकं देणाऱ्या ह्या गुणी शेताजवळ आमच्या पर्याचा पटवाच्या पर्याशीं संगम होतो. खरं पाहतां आमचा पर्या गदमाला समांतरच वाहतो. पटवाचा पर्या मात्र समोरून वाहात येतो. पावसाळ्यांत आमचा पर्याहि गढूळलेल्या तांबूस पाण्यानं बेफाम फुगतो. मोठमोठ्यानं गर्जना करत हवा तसा धुमाकूळ

घालतो; पण कुणाचंहि कांहींसुद्धां नुकसान करत नाहीं. संगमानंतर मात्र तो क्रूर बनतो. पैराच्या पाण्यानं गदमाच्या मळ्या बुडवून टाकतो. दर वर्षी घालावा लागणारा गदमाचा बांध धडाके मारून वाहवून टाकतो. आम्हांला नेहमीं हंसत ठेवणारा आमचा पर्या पर्टवाच्या पर्याला मिळाल्यावर आम्हांला अशीं आसवं गाळायला लावतो. कुसंगतीचा परिणाम म्हणतात तो हा असा. माझ्या मतें मात्र ह्या दुष्कर्मांत आमच्या पर्याचा हात नसावा. मी त्याला लहानपणापासून ओळखतें आहे ना? असं न करण्याबद्दल तो पर्टवाच्या पर्याची मनधरणीच करत असेल. पण सर्वस्वीं आपणांत सामावून घेतलेल्या त्याचं तो उन्मत्त ऐकणार आहे थोडंच!

आमच्या गदमाजवळ आमचा पर्या परस्वाधीन होतो. त्याचं स्वतंत्र अस्तित्व नष्ट होतं. आणि म्हणूनच पर्टवाच्या पर्याबरोबरीनं दोषारोपाचं खापर त्याच्या माथींहि फोडलं जातं. माझी मात्र खात्री आहे कीं तो तसा नाहीं.

❁ ❁ ❁

# १२ : मनी


दूऽध !

पहाटेच्या साखरझोंपेचं खोबरं करणारी ही रुक्ष हांक कानीं पडतांच मी रोजच्याप्रमाणें नाखुशीनंच दुलईच्या उबदार मोहांतून स्वतःची सोडवणूक करून घेतली.

पूर्वीच्या स्त्रिया पहाटे उठून 'उठी गोपालजी' ही भूपाळी आळवायच्या, तर आजकालच्या आम्हां स्त्रियांना उठवायला येणारा हा गोपाल क्षितिजावर होणाऱ्या उषेच्या आगमनाबरोबरच आमच्या दारांत येऊन धडकायचा.

नित्याच्या सरावाप्रमाणें दार उघडून दुधाची पातेली पुढें धरायची कसरत हातांनीं आपोआप केली. झोंपमोड झाल्यामुळें डोळे चुरचुरत होते.

दूध घेऊन हॉलमध्यें प्रवेश करतांच माझ्या पावलांत रेशमी चुळबुळ सुरू झाली. गेला महिना सव्वा महिना माझ्या ह्या लोकरीच्या शुभ्र गुंड्याला सांभाळतां सांभाळतां माझी पुरेवाट झाली होती. हातांतील दुधाची पातेली आणखीच उंचावून माझ्या पायांना गुदगुल्या करणाऱ्या त्या कापसाच्या लडीकडे मी कौतुकानें पाहूं लागलें. आपले निळे निळे डोळे माझ्यावर रोखून आपली मान क्षणांत डाव्या बाजूला तर क्षणांत उजव्या बाजूला कलती करून, गुबगुबीत पंजांत लपलेलीं तीक्ष्ण नखं माझ्या ओचांत अडकवून माझ्या हातांतील दुधापर्यंत आपली झेंप पोंचविण्याची धडपड तो इवलासा गोजिरवाणा जीव करूं लागला. त्याच्या अशा चाळ्यांना सुरुवात झाली कीं आमचा किती वेळ जात असे हें आमच्या लक्षांतसुद्धां येत नसे. मनीचं तें पिल्लूं म्हणजे आम्हां सर्वांना एक खेळणंच झालं होतं. बाहेरून आल्याबरोबर तें दिसलं नाहीं तर प्रत्येकाला चुकल्याचुकल्यासारखं वाटे. साऱ्या घरादाराचा जीव त्या पोरावर जडला होता. टेबलाखालीं असलेला पिंगपॉंगचा चेंडू मी पायानं ढकलतांच माझे ओचे सोडून पिल्लू बॉलमागोमाग धांवलं व मी



मनी

दूध कपाटांत ठेवण्यासाठीं स्वयंपाकघरांत गेलें. मॉऽव ! मॉऽव ! करत मनीहि माझ्या पाठोपाठ आंत आली. दूध ठेवलेल्या फडताळाकडे आशाळभूतपणें पाहात, माझ्या पायांना घांसत तिचं ओरडणं चालू होतं. इतक्यांत हॉलमधें पिल्लानं क्यां ऽ कू केलं. हृदयाला पीळ पाडणारं तें क्यां ऽ कू ऐकून मी व मनी पिल्लाजवळ धांवत गेलों. पिल्लू आ वासून रक्ताच्या थारोळ्यांत पडलं होतं. पिल्लाला माझ्या स्वाधीन करून त्याच्यावर झडप घालणाऱ्या बोक्याचा मनीनं पाठलाग केला. मांजरांच्या आरडाओरडीनं जागे झालेल्या ह्यांनीं आधीं पाणी आणून पिल्लाच्या अंगावर शिंपडलं. पिल्लाच्या पोटाला बोक्याच्या तीक्ष्ण दांतांच्या दोन खोल जखमा झाल्या होत्या व त्यांतून रक्ताचे उमडे लागले होते. कातचुना कालवून मीं त्या जखमांत भरला. बोक्यानं ओरबाडलं होतं तिथं तिथं पेनिसिलीन् मलम चोळलं. भिजलेलं अंग कोरडं करून त्याला लोकरीच्या मफलरवर ठेवलं व चमच्यानं थोडं थोडं दूध पाजलं. यापूर्वींहि अशीच बोक्याच्या तोंडांतून सुटलेलीं एक दोन पिल्लं मी जगवलीं होतीं. त्यामुळें ह्या पिल्लानंहि दोन चार चमचे दूध पिऊन क्षीण आवाजांत मॉऽव् करतांच आतां हेंहि जगूं शकेल अशी मला आशा वाटूं लागली. आम्ही त्याला दिवसभर तर एकटं पातवतचं नव्हतों. सतत त्याच्या आजूबाजूला कोणी ना कोणी असेच. रात्रीं मात्र आम्हीं त्याला मनीसह हॉलमधें कोंडून ठेवत असूं. पण अत्तांमात्र कांहीं सेकंदांतच त्या यमदूतानं डाव साधला होता. बोक्याच्या तोंडांतून सुटलेलं पिल्लूं पूर्ण बरं होईपर्यंत त्याची आई त्याला शिवत नसे, असा माझा अनुभव होता. पण हें पिल्लूं मोठं असल्यामुळं मी त्याला वरच्या दुधावर जगवूं शकेन ह्याबद्दल माझी खात्रीच होती.

थोड्याच वेळांत बोक्याला चीत करून मनी परत आली. ती अगदीं दमलेली दिसत होती. म्हणून आम्हीं तिला चांगलं बशी भरून दूध घातलं. नंतर मी तिला बळेंबळेंच पिल्लाजवळ आणलं. इतर मांजऱ्यांप्रमाणें पळून न जातां ती पिल्लाला चाटूं लागली. दुखावलेलं वासरूं गाईकडून आम्ही असंच चाटवून घेत असूं. आईनं प्रेमानं चाटल्यामुळें त्याला लवकर आराम पडतो असा आमचा अनुभव होता. मनीनं पिल्लाला चाटायला सुरुवात करतांच माझी त्याच्या जीविताबद्दलची आशा दुणावली. पिल्लाला चाटतां चाटतांच तिनं आजूबाजूला सांडलेलं रक्तहि चाटून पुसून साफ केलं.

त्या दिवशीं शनिवार असल्यामुळें मुलांची शाळा सकाळची होती. तेव्हां पिलूं मनीच्या स्वाधीन करून, मी नित्यनियमाप्रमाणें चहा-कॉफी केली व मुलांनीं ती भरलेल्या डोळ्यांनीं व दाटलेल्या कंठानं कशीबशी घशाखालीं लोटली तोंच पिलूं पुन्हां एकदां क्षीणपणें क्यांकदिशीं ओरडलं. आम्ही सर्वजण एकदमच पिल्लाजवळ धांवत गेलों. मनीच पिल्लाला चाटत होती. मग पिल्लूं कां ओरडलं? 'बये! त्याला चावलीस कीं काय?' मीं विचारलं. 'तिचा कांहीं विश्वास धरूं नका हो. वाघाच्याच जातीची ही. एकदां का रक्ताची चटक लागली कीं पोटच्या गोळ्यालासुद्धां ओळखायची नाहीं. वाघीण आणि मांजरी स्वतःच्या पिल्लांना खातात म्हणे.' आमच्या शेजारीणबाईंनीं मला धोक्याची सूचना दिली.

'तें मला माहीत आहे हो. मांजरी व्याल्याबरोबर आपलं एक पिल्लूं खाते. एवढ्या मोठ्या पिल्लाला नाहीं कांहीं खात.' मी त्यांना विश्वासानं सांगितलं खरं, पण मनांत म्हटलं विषाची परीक्षा कशाला पाहा? एक तडाखा देऊन मनीला बाजूला केली आणि पिल्लाचा बिछाना उचलून जाळीच्या कपाटांत ठेवून दिला. मनीनं चाटल्यामुळें त्याच्या जखमांतून परत रक्त वाहायला सुरुवात झाली होती. मी त्या जखमांत परत कातचुना भरला. पिल्लाला परत दोन चमचे दूध पाजलं, व नाइलाजानं कामाकडे वळलें. सकाळच्या रामप्रहरीं बोक्याचं रूप घेऊन आलेल्या काळपुरुषानं माझ्या घरांतलं मूर्तिमंत चैतन्यच जणूं हिरावून नेलं होतं.

पिल्लाची नीट काळजी घेण्याबद्दल मला वारंवार बजावून मुलांनीं व ह्यांनीं जड अंतःकरणानं शाळेचा रस्ता धरला.

मी कितीही धपाटे घातले तरी मनी कपाटाखालून हलेना. तिथें बसून ती सारखी पिल्लाला हांका मारूं लागली, व त्या ऐकून तें तिच्याकडे जाण्यासाठीं प्राणांतिक धडपड करूं लागलं. मोडलेल्या कण्यानं कपाटभर फरफटूं लागलं व त्या श्रमामुळें त्याच्या जखमांतून परत रक्ताचे उमडे वाहूं लागले. आतां काय करावं हा मला पेंच पडला. पिल्लूं मनीच्या पुढ्यांत दिलं तर ती त्याला अपाय करील काय? माझ्या मनानं ह्या प्रश्नाला नकारात्मक उत्तर दिलं. आजपर्यंत तिनं आपल्या पिल्लावर केलेलं प्रेम मला आठवलं.

हें पोर तिला किती त्रास द्यायचं म्हणून सांगूं. लांबून धांवत येऊन तिच्या मानेला चावायचं काय, उंचावरून नेम धरून तिच्या अंगावर उडी काय मारायचं, खेळाच्या ऐन रंगांत आलं कीं हलणाऱ्या तिच्या शेपटीचे ते असे कांहीं वाभाडे काढी कीं बिचारी मनी शेवटीं त्याच्यावर गुरगुरे व मुकाट्यानें जरा दूर जाऊन बसे. पण तें लबाड तिच्या अशा रागाला मुळींच भीक घालीत नसे. तिचं गुरगुरणं थांबतं न थांबतं तोंच त्याच्या चाळ्यांना पुन्हां ऊत येत असे. त्याच्या खोड्या किती सांगाव्या ? एक कां दोन ? पण बिचारी त्याचे सारे लाड मुकाट्यानं सहन करायची. आम्हीं कोंडून ठेवल्यावर शिकारीची आशा सोडून रात्र रात्र पिल्लाजवळ राहायची. नाहींतर ही शिकारी मांजरी रात्रभर चारी दिशांना टेहळणी करत फिरत असायची. हल्लीं हल्लीं तिनं उंदराचीं लहान लहान पिल्लं आणून आपल्या पिल्लाला शिकारीचे पहिले वहिले धडे द्यायला सुरवात केली होती, बशींतलं दूध पहिल्याप्रमाणें अधाशीपणानं न पितां हल्लीं ती तें पिल्लाच्या बरोबरीनं सावकाश पीत असे व वेळप्रसंगीं त्याच्यासाठीं थोडं दूध शिल्लक ठेवून आपण बाजूला होत असे. तिच्या प्रत्येक कृतींतून वात्सल्य ओसंडतांना मीं पाहिलं होतं. मग आत्तां तिचं बाळ जखमी झालं असतांना, त्याला तिच्यापासून दूर ठेवणं किती कृतघ्नपणाचं झालं असतं, नाहीं का ? शिवाय सारखं रक्त वाहात राहिल्यामुळें आतां तें फारच अशक्त झालं होतं. चमच्यानें तोंडांत घातलेलं दूध आतां तें सकाळप्रमाणें गिळूं शकत नव्हतं. मधून मधून तें आपलं डोकं ताडदिशीं आपटूनहि घेई. आशेऐवजीं आतां मला त्याची चिंताच वाटूं लागली. म्हटलं माय–लेकराची ताटातूट केल्याचं पाप तरी निदान लागायला नको.

कपाट उघडून पिल्लाचा बिछाना उचलतांच मनी केविलवाणा स्वर काढून पिल्लाला मागूं लागली. मला वाटलं ती म्हणतीय ‘ पशु असलें तरी मी सुद्धां आईच आहे म्हटलं. ’ हॉलमधल्या एका कोपऱ्यांत पिल्लूं ठेवून मी तिला उद्देशून म्हणालें, ‘ हें घे बाई तुझं पोर, तूंच त्याला जन्म दिला आहेस, आतां त्याला मारणं किंवा तारणं तुझ्याच हातीं आहे.’ मी तिचंच पिल्लूं तिच्या स्वाधीन केलं होतं, पण तें करतांना मला हुंदका मात्र आवरतां आला नाहीं. एक अशुभ कल्पना मनाला घोरपडीसारखी चिकटून बसली होती, ती कांहीं केल्या दूर होईना. तिथलं दृश्य बघायला नको म्हणून मी

दांडीवरचं लुगडं ओढून अंग धुण्यासाठीं बाथरूममध्यें निघून गेलें. पण अंग धुतांना मी देवाला सारखी आळवीत होते कीं, 'देवा! मला कांहीं विपरीत बघायला लावूं नकोस. तें बघण्याची माझ्या अंगांत ताकद नाहीं.'

थरथरत्या पायांनीं मी हॉलमध्यें डोकावून पाहिलं, तर मनी उंबऱ्यांतच ताणून निजलेली दिसली. तिला अशी डाराडूर निजलेली पाहतांच माझ्या पोटांत धस्स झालं. धडधडत्या हृदयावर दोन्ही हात दाबून मी कोपऱ्यापर्यंत कशीबशी गेलें. पिलूं बिछान्यावर ताठ होऊन पडलं होतं व त्याचं शीर धडापासून दूर झालेलं होतं. रडण्याऐवजीं मला माझा संताप आवरणंच कठीण झालं. कोपऱ्यांतली काठी घेऊन मनीला मी झोडपत सुटलें.

आतां साडेनऊ वाजतील. मधल्या सुटींत माझीं बाळं चिंताग्रस्त चेहऱ्यांनीं घरीं येतील, त्यांना मी काय उत्तर देऊं? खरा प्रकार सांगितला तर मातेच्या वात्सल्यावरचा त्यांचा विश्वास डळमळणार नाहीं का? त्यांना काय सांगूं? कटु असलं तरी सत्य तेंच त्यांना सांगितल्याशिवाय मला चैन पडणार नाहीं, हें मला लवकरच कळून चुकलं. पण त्या आधीं हा इथला अवतार आवरणं मला भाग होतं. त्यांच्या कोवळ्या निष्पाप नजरेला असलं कांहीं पडणं योग्य नव्हतं.

भंग्याला बोलावून तो बिछाना मी त्याच्या स्वाधीन केला, तोंच माझ्या शेजारीणबाईंनीं मला विचारलं, 'काय हो?' गळ्यांत हुंदके दाटले असल्यामुळें त्यांना मी हाताच्या खुणेनंच कारभार आटोपल्याचं सांगितलं व उदास मनानं घरांत गेलें.

• • •

# १४ : दिवाळी, दिवाळी आऽऽली

नवरात्र संपलं नि घरोघर पोह्यांचं भात भिजत पडलं. दिवाळी अगदीं तोंडावर आली तेव्हां पोहे कांडल्याशिवाय गत्यंतरच नव्हतं. नवरात्रांत देवीच्या नैवेद्यासाठीं लागणारे सोवळ्यांतले पोहे देव बसण्यापूर्वीच कांडून ठेवावे लागतात. पण त्या पायली कुडवाच्या पोह्यांनीं काय पार येणार ? दिवाळींत 'फोव्ह्यां'साठीं सारा गांव दारांत लोटणार, त्यासाठीं ऐपतीप्रमाणें मणा अर्धा मणाचे तरी पोहे कांडावेच लागतात. शेताशेतांतून कापणीची धांदल सुरू होते. आणि घराघरांतून उखळीशीं हुतुतू खेळणारीं मुसळं प्रश्न विचारूं लागतात, 'भाजपीण कोण, कांडपीण कोण ? भाजपीण कोण, कांडपीण कोण ?'

भाताच्या पिकलेल्या केसरांचा धुंद सुवास रानोमाळ कोंदलेला असतो, त्यांतच भाजक्या भाताच्या खमंग वासाची सरमिसळ होते. हे पोहे बाहेरचे असतात. म्हणजे ते कांडायला कुडवाळणी–कांडपिणी येतात. अख्ख्या गांवाला वांटायचे हे पोहे नाजुक–साजुक हातांनीं कांडणं जड जातं. कुडवाळणी सबंध दिवस शेतांतल्या कामांत गुंतलेल्या असतात. वरकस धान्याची पिकलेलीं कणसं वेंचायचीं असतात. भात, वरी, हरीक ह्यांची कापणी करायची असते. दिवस असा कामांत सरला तरी रात्रीचा दिवस करून वाडकरणी बामणीचे पोहे जागून कांडून देतात. हे पोहे कांडायची अळंटळम केली तर चाव दिवसाच्या दिवशीं बामणीच्या दारांत येणाऱ्या आपल्या पोराबाळांच्या पदरांत ती काय टाकील ह्याची काळजी त्यांनाच करावी लागते.

नव्याच्या पूर्णिमेला शेतांत तयार झालेल्या नव्या धान्याचीं तयार केलेलीं नवीं दारांदारावर लावलीं जातात. आंब्यांच्या पानाच्या अवगुंठणांत धान्याची केसरं, लोंब्या लांब देठाच्या कुरडूच्या तुऱ्यासह गुंफल्या जातात. खालींवर कोंड्यांच्या कामट्या ठेवून मधें हे गुच्छ अंतरा–अंतरानें नीट बसवतात.



दिवाळी, दिवाळी आऽऽली

कामटीच्या वरच्या अंगाला हळदीकुंकवाचे टिपके देतात. अशी हीं तोरणं दारावर लटकतात आणि नैवेद्याला नव्या तांदळाचा भात करावा लागतो.

शेवाळलेल्या हिरवट गडग्या, खळांवर शरदाच्या चांदण्यांची मोहक माया फिरूं लागते. पौर्णिमेपासून दिवाळीची चाहूल लागूं लागते. वसुबारसेला तिची ठळक पावलें जाणवूं लागतात.

पर्याला बांधलेलं धरण पावसाळ्यांत वाहून गेलेलं असतं. तें पुन्हां बांधायला अजून अवकाश असतो, त्यामुळें दारांतला पाट चिखलानं नुसता होरलेला असतो. भर पावसाळ्यांत पावसाचं पाणी देणारा पन्हळहि आतां सुकलेला असतो. पाण्यासाठीं रोज पर्याचीच प्रार्थना करावी लागते.

चाव दिवसाच्या (नरकचतुर्दशी) दिवशीं भल्या पहाटेलाच सुवासिक तेलानं चांगलं आंग रगडून घेऊन गरम गरम पाण्यानं मनसोक्त आंघोळी करायच्या असतात. साऱ्यांच्या आंघोळी कावळा ओरडायच्या आंत आटपायला हव्यात. मनसोक्त-आंघोळीसाठीं लागणारं पाणी उभ्या दरडीचा चढ-उतार करून पर्यावरून आणणं जड जातं. मग पर्याच्या पात्रांतच तीन धोंडे मांडून हंगामी न्हाणी मांडली जाते. सतेलाऐवजीं तोंड कापलेले रॉकेलचे डबे न्हाणीवर चढवले जातात. पूर्वी तांब्याची सतेलंच ठेवत असत. पण एका वर्षी कुणाच्या ध्यानींमनीहि नसतांना एकाएकी मुसळधार पाऊस आला. संथ बनलेल्या पर्यांत चोहों बाजूंनीं आलेल्या लोंढ्यांनीं लाल गढूळ पाणी आणून ओतलं आणि पर्याच्या पात्रांत मांडलेल्या पानचुलीवरचीं सतेलीं, हंडे वाहून गेले. तेव्हांपासून न्हाणीवर पत्र्याचे डबे चढूं लागले.

पावसाळाभर हौराचं पाणी पिऊन तृप्त झालेला पर्या दिवाळींत फुगलेला असला तरी संथ वाहात असतो. मंत्र म्हणावा तशी कांहीं तरी दबक्या आवाजांत त्याची बडबड चाललेली असते. पात्र पाण्यानं भरलेलं असलं तरी अधेंमधें वर आलेल्या रेंव्याचे उंचवटे खडखडीत सुके असतात. ह्या उंचवट्या-वर न्हाणी केली कीं, तिच्या शेजारीं पर्यांत पडलेली एखादी ऐसपैस पाथर आणून ठेवली जाते. न्हाणींत नारळीपोफळीच्या साऊळा, काटक्या, टोणकी असं भरपूर जळण घातलं जातं. ह्या पाथरीवर बसून आंघोळ करतांना न्हाणी-वरच आधण आलेलं पाणी विसावण्यासाठीं मुळींच कष्ट घ्यावे लागत नाहींत. पर्याचा प्रवाह आपल्याला वेढा घालून वाहत असतो.

पहाटेच्या गुलाबी थंडींत, कंदिलाच्या व न्हाणींतील जाळाच्या अंधुक प्रकाशांत, पर्याच्या तलम प्रवाहांत ऊन ऊन पाण्यानं अंग धुतांना एक आगळाच आनंद होतो. सभोंवारचा काळोख वितळायचा विचार करत असतो. हिंवाळ्याच्या थंडीची चोरटी चाहूल जाणवत असते. वाटेंतील झाडं, रानं मधूनच दवाच्या थेंबाचे तुषार अंगावर उडवतात. टवटवलेल्या शरीरानं आणि मोहरलेल्या मनानं घरीं यावं तों देवांची पंचामृती पूजा चाललेली असते. चुलीवर पोहे फोडणीला पडत असतात. तुळशीपुढें, पुढच्या दारीं अशी एखाद दुसरीच पणती लागलेली असते. मग पर्यावरून आलेल्या पोरीबाळी हव्या तितक्या पणत्या लावून रेज्यारेज्यांमधून त्यांची आरास करतात. कुठें कुणाच्या चाकरमान्यानं शहरांतून दारूसामान पाठवलं असलं तर तें थोडं फार उडवलं जातं. बाहेर दिसूं लागतं न लागतं तोंच फराळाचीं पानं बसतात. उसळे पोहे, दूध पोहे, ताक पोहे पोटभर मिळतात. बाकीचं आपलं असेल त्या मानानं पानांत पडतं.

फराळ करून उठावं तों फोव्ह्यासाठीं येणाऱ्यांची गर्दी उसळूं लागते. लहानथोर झाडून सारीं येतात. सारींजणं न्हाऊन–माखून निर्मळ झालेली असतात. प्रत्येकाच्या अंगावर नवं कापड असतं. ज्याला नसेल त्याचा म्लान म्होरा पाहतांना पोटांत तटतट तुटतं. प्रत्येकाच्या कपाळाला कडू कारिटाच्या बिया चिटकवलेल्या असतात. कारिटाला नरकासूर मानून कुडवाळी लोक आंघोळ झाल्याबरोबर कारीट पायाखालीं दाबून फोडतात व त्यांतील बिया सर्वांच्या कपाळाला लावतात. आणि मग फोव्ह्यासाठीं घराबाहेर पडतात. दारीं येणाऱ्या प्रत्येकाच्या पदरांत मूठपसा पोहे टाकले तरी चालतात. पण घरोब्याच्या व्यक्तीच्या पदरांत मात्र फोव्ह्याबरोबर एखादी लहानशी लाडवाची गोळी किंवा एखादं कडबोळं, कांहींच नसलं तर निदान गुळाचा खडा टाकून तरी त्या व्यक्तीचा मान राखायचा असतो. आपल्या दारांत रोज राबणारीं माणसं ह्या दिवशीं आमंत्रणाशिवाय आपल्या दारांत येणार नाहींत. त्यांना फराळासाठीं अगर फोव्ह्यांसाठीं बोलावणं केलं नाहीं तर पुढें बरेच दिवस यांचे टोमणे ऐकून घ्यावे लागतात.

दुपारीं बारा वाजेपर्यंत फोव्ह्यांसाठीं येणारी सारी मंडळी येऊन जातात. मग पूजा, फराळाचं घेऊन गांवच्या देवांना जाऊन आलं कीं, दिवाळीच

९३०१०१

अर्धा अधिक दिवस उत्साह संपतो. सर्वांनी एकत्र मिळून देवाला जातांना मात्र थोडीफार गंमत येते. नवरात्रानंतर निघालेली देवांची कापडं देवांना परत लागलेली असतात. पूजा, आरतीच्या वेळीं ढोलांतून बोल निघतात. 'धूप दाव, गंध दाव.'

कुठं कुणाच्या चाकरमान्यानं कांहीं दारूसामान पाठवलं असलं तर दारा-पुढं तेवणाऱ्या पणत्यांवर पोरंबाळं तें उडवतात. एकंदरीनं कोंकणात ह्या सणाचं महत्त्व चाव दिवसाच्या फोव्ह्यापुरतंच. कुण्या एखादीचा भाऊ परगांवाहून भाऊबीजेसाठीं आलाच तर त्या घरीं नवी नवलाई घडते. इतर घरीं मात्र एकच एक अधेली किंवा रुपया ओवाळणीच्या ताम्हनांतून पाटावर बसलेल्या भाऊरायांच्या हातांत पुन्हां पुन्हां फिरत राहतो व भाऊबीज साजरी होते.

माणसांच्या दिवाळीपाठोपाठ देवदिवाळी येते. देवळांतल्या देवांना परत कापडं लागतात. ढोलाच्या तालावर घंटेच्या निनादांत त्यांची पूजा–आरती होते. देवळांत गांव जमतो. गांवकी होते. देवाला गाऱ्हाणीं घातलीं जातात. देवाचे मानकरी गुरव घरोघरीं नैवेद्याचे हारे व पोखरलेले कोव्हाळे घेऊन फिरतात. दुपारीं वाढून ठेवलेले गांवच्या देवांचे नैवेद्य गुरवांजवळच्या त्या हाऱ्यांत टाकावयाचे असतात. देवांच्या दिव्यांसाठीं द्यायचं तेल त्या पोखरलेल्या कोव्हाळ्यांत ओतायचं असत.

देवदिवाळीच्या आदल्या रात्रींच उडीद, तांदळाच्या भरड्याचे उंडे उकडून ठेवलेले असतात. स्वतःच्या वाड्यांत ( गोठा ) जितकीं गुरं असतील तितके उंडे उकडून ठेवलेले असतात. देवदिवाळीच्या पहाटेलाच घरचा कारभारी गडी अगर जांगळी उंडे व पूजेचं साहित्य घेऊन वाड्यांत जातो. प्रत्येक गुराचे पाय धुतो. त्यांच्या शिंगांना व कपाळाला हळद-कुंकू व अक्षता वाहून त्यांना निरांजनानें ओवाळतो. आरती ओवाळतांना तोंडानें 'चांग भला, चांग भला' असें म्हणतो व शेवटीं चांद्याच्या पानांत उकडलेला उंडा सोलून प्रत्येकाच्या तोंडांत देतो. ह्या दिवशीं गाई-वासरांना काठी लावत ( मारत ) नाहींत. बैल-रेड्यांना जोताला अगर गाडीला जुंपत नाहींत.

दिवाळी किंवा देवदिवाळीपेक्षां खरी मज्जा येते कार्तिकीच्या उत्सवांत. कोंकणांत आपल्या दिवाळीला धाकटी दिवाळी व देवदिवाळीला थोरली

जेवणांत आमटी वरणापेक्षां मुख्य भार असतो लाल भोपळ्यांची भाजी, वडे व भात ह्यावरच. त्या दिवशींच्या स्वयंपाकाकरितां मुद्दाम एक पर्णकुटी तयार केलेली असते तिला 'कावण' काढलय असं म्हणतात. स्वयंपाक करतांना आणि सोनार, सुतार व पंचक्रोशींतल्या जमलेल्या ब्राह्मणांना वाढतांना खूप उत्साह वाटतो. हा सोहाळा एखाद्या वनभोजनासारखा भासतो. इतर लोकांचीं जेवणं, वाढणीं देणं वगैरे गुरव लोक बाहेरच्या बाहेरच उरकतात. सारा गांव जेवतो. प्रत्येकजण आपआपल्या कुंवतीप्रमाणें कामं करतो. तरी सुद्धां कामकऱ्यांना मागचं सारं उरकून घरीं यायला दिवेलागणी होते. बाहेर दाटूं लागलेल्या काळोखाची छाया आपल्या मनांत पुसटकी पसरूं लागते.

गांवांत होणाऱ्या मोजक्या उत्सवांत कार्तिकीचा उत्सव मोठा असतो. तो उरकला कीं जीवाला उगीचच चुटपुट लागते आणि मन बेचैन होतं.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ३७०५५ दि: १०।०।६५
क्रमांक ९५२० नों दि: १७-८-६८
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३७०५५

REFBK-0013099